अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्टयूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा
दृष्टी साजरी करा
Help line 9112288611 / 8888982222




# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

गावरान तुपाचे व्हेज पराठे
आरोग्यदायी नाष्टा
THE TEA HOUSE
न्यु टिळक रोड, अहिल्यानगर
9102485656

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २९.०४.२०२५ | अंक नं. २५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Discount सर्वत्र आहे,
Designs मात्र आमच्या जवळच !






अनुभव घ्या.. नव्या रुपाचा...! नव्या कलेक्शनचा...!



अक्षय्य तृतीयेची सोने खरेदी लक्ष्मी अखंड वास करी
साडेतीन मुहूर्तापैकी एक अक्षय्य तृतीया.
या मुहूर्तावर सोने खरेदी करा आणि सुवर्णसौख्याचा लाभ घ्या.

आमची वचनबद्धता

सोन्याच्या सर्वात कमी किमती | घडणावळीचे सर्वाधिक वाजवी दर | 100% समाधान | अद्वितीय कलाकुसरीचे विश्व | एक्सचेंजवर* मिळवा पूर्ण किंमत
वाजवी किंमत धोरण | संपूर्ण पारदर्शकता | मोफत सोनेशुद्धता तपासणी | बायबॅकची हमी | जीवनभरासाठी मोफत देखभाल*

शुभ मुहूर्त अक्षय्य तृतीया - दि. 30 एप्रिल 2025 • शोरुम वेळ : सकाळी 10:00 ते रात्री 10:00 पर्यंत

जळगांवचे
R S Bafna Jewellers
१३, सावेडी नाका, सावेडी, इंपल्स हॉस्पिटल जवळ, अहिल्यानगर
Customer Care Number : +91 9175915644 • Customer Care E-mail : rsbjcare@gmail.com • All Days Open
जळगांव | नाशिक | अहिल्यानगर
Shop online at : www.jewelroof.com | Follow us at | # BE VEGETARIAN - BE HAPPY

दैनंदिन सोने व चांदीच्या किमतीतील अपडेट्स, नवीन कलेक्शन्स, एक्सक्लुझीव ऑफर्स आणि सवलतीच्या सूचनांसाठी आमच्या व्हॉट्सअॅप चॅनेलला जॉइन करा.
SCAN QR CODE
www.malhar.org_04/25

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने १२ (६+६) | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २९.०४.२०२५ | अंक नं. २५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226 | नारायणगाव (02132) 242132
अ. नगर (0241) 2999299 | श्रीरामपूर (02422) 220090

अक्षय्यतृतीया
सुवर्णखरेदीचा सुवर्णमुहूर्त..
खास अक्षय्यतृतीयेनिमित्त वेढणी व लक्ष्मीचे क्वाईन उपलब्ध
0.5gm / 1gm / 2gm / 5gm / 10gm / 15gm / 20gm / 25gm / 50gm
99.50 शुध्दतेमधील प्रत्येक वजनामध्ये वेढणी, क्वाईन उपलब्ध.
22 कॅरेट सोन्याचा सर्वात कमी दर
दागिन्यांच्या मजुरीवर 20%* पर्यंत सूट
ठुशी, कुंदन ज्वेलरीच्या मजुरीवर 50%* पर्यंत सूट
आपला जुना दागिना एक्सचेंज करा आणि मिळवा 100%* किंमतीचा परतावा.
नवीन भव्य अद्ययावत शोरूममधुन सुवर्णखरेदीचा आनंद घ्या.
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# नगरमध्ये एकाच रात्रीत तीन ठिकाणी चोऱ्या; दागिन्यांसह रोकड लंपास

## गॅस कटरने तोडली दरवाजाची कुलुपे



विनायकनगर परिसरात चोरट्यांनी केलेली उचकापाचक दिसत आहे.

नगर - मध्यरात्रीच्या सुमारास ३ घराच्या दरवाज्याचे कडी, कोयंडा, कुलूप गॅस कटरच्या सहाय्याने तोडून चार चोरट्यांनी आत प्रवेश करुन घरातील रोख रक्कम, सोन्याचे दागिने असा ऐवज चोरुन नेला. ही घटना विनायकनगर परिसरात २९ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास घडली. चोरटे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले आहेत.

नगर-पुणे रोडलगत असलेल्या विनायकनगर येथील आनंदबाग येथे राहणारे अमोल तुकाराम जाधव हे त्यांच्या कुटुंबासह त्यांच्या मूळ गावी कर्जत येथे यात्रेनिमित्त गेलेले असताना त्यांच्या बंद घराच्या मुख्य दरवाज्याची कडी, कोयंडा, कुलूप चोरट्याने तोडून आत प्रवेश केला. घरातील सामानाची उचकापाचक करुन सामान असताव्यस्त फेकले. बेडरूममधील कपाटाचे लॉकर तोडून आतील रोख रक्कम, कानातील सोन्याची रिंग, चांदीचे पैंजण असा ऐवज चोरुन नेला. जाधव यांनी बाहेरगावी जाताना घरातील किमती दागिने व रोख रक्कम घरात ठेवली नसल्याने मोठी रक्कम व किमती दागिने असा ऐवज चोरट्यांच्या हाती लागला नाही.

त्यानंतर चोरट्यांनी जवळच राहत असलेल्या मयूर मनदुया बोकरिया (पटेल) यांच्या घरात चोरी केली. पटेल हे काही कामानिमित्त कुटुंबासह त्यांच्या गावी गुजरात येथे गेले असल्याने त्यांचे राहते घर बंद असल्याचा फायदा घेत चोरट्यांनी त्यांच्या बंद घराच्या दरवाज्याचे कडी, कोयंडा, कुलूप तोडून आत प्रवेश केला. आतील सामनाची उचकापाचक करुन बेडरुम मधील कपाटाच्या लॉकरमध्ये असलेली सुमारे १२ हजार रुपयांची रोकड, कानातील सोन्याची बाळी, चांदीचे पैंजण असे २५ ते ३० हजार रुपये किमतीचे दागिने असा ऐवज चोरुन नेला. त्यानंतर चोरट्यांनी जवळच असलेल्या सुजाता बिहाणी यांच्या बंगल्यामध्येही चोरी केली. सुजाता बिहाणी या परदेशात राहत असल्याने त्यांच्या बंद बंगल्याच्या वरील खोलीत भाडेकरु राहत आहे. चोरट्यांनी भाडेकरूच्या रुमच्या दरवाजाची कडी बाहेरुन लावून बिहाणी यांच्या बंद बंगल्याच्या दरवाजाचे कडी कोयंडा कुलूप तोडून आत प्रवेश करुन चोरी केली. परंतु बिहाणी या विदेशात असल्याने त्यांच्या बंगल्यात नेमकी किती व कशाची चोरी झाली हे समजू शकले नाही.

### ४ चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद

४ चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले. त्यांनी त्यांची तोंडे बांधलेली होती. त्यांनी तेथील ए बिल्डिंगमधील भोगे यांचा भाडेतत्त्वावर दिलेला फ्लॅट फोडून चोरी केल्याचे समजले परंतु त्याबाबत दुपारी उशिरापर्यंत अधिक माहिती मिळाली नाही. घटनेची माहिती मिळाल्यावर कोतवाली पोलिसांनी सकाळी घटनास्थळी भेट देत पाहणी केली.

### चोरट्यांनी पाळत ठेवून केली चोरी

चोरट्यांनी पाळत ठेवून बाहेरगावी गेलेल्या कुटुंबाच्या बंद घरात चोरी केली असे दिसून येते. हा परिसर शहरापासून थोडा बाजूला असल्याने तसेच एका बाजूने नगर पुणे महामार्ग तर पाठीमागील बाजूस बुरुडगाव परिसरातील मोकळी शेतजमीन तसेच सीना नदीकडील भाग असल्याने पळून जाण्यास चोरट्यांना सुरक्षित जागा असल्याने या परिसरात चोरीच्या घटनात वाढ होत आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम दुपारी उशिरापर्यंत सुरु होते.

# सावेडीत पुन्हा चेन स्नॅचिंग, महिलेचे दागिने पळविले

## गुलमोहर रोडवरील घटना, तीन अनोळखी चोरट्यांवर गुन्हा दाखल

नगर - सावेडी उपनगरात पुन्हा एकदा चेन स्नॅचिंगची घटना घडली आहे. गुलमोहर रोड येथे मंदिरात दर्शन घेवून रस्त्याने पायी घराकडे जाणाऱ्या वृद्ध महिलेच्या गळ्यातील २ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण तसेच दीड तोळा वजनाचे चेन मधील सोन्याचे गंठण असे दागिने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या तिघांपैकी एकाने हिसका मारून तोडून नेले आहे. २७ एप्रिल रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास आनंद शाळेसमोरील किराणा दुकानासमोर ही घटना घडली.

या बाबत शांताबाई रावजी सोनवणे (वय ८५, रा. आनंदनगर, गुलमोहर रोड, सावेडी) यांनी २८ एप्रिलला दुपारी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या २७ एप्रिल रोजी सायंकाळी आनंदनगर येथील विठ्ठल मंदिरात दर्शनासाठी गेल्या होत्या. तेथून घराकडे परतत असताना सायंकाळी ७ च्या सुमारास त्या पायी चालत आनंद शाळेसमोरील किराणा दुकानासमोर आल्या. त्यावेळी रस्त्याच्या कडेला तिघे जण उभे होते. ते तेथीलच रहिवासी असावेत असे समजून फिर्यादी या पुढे जायला निघाल्या असता त्यातील एक जण फिर्यादी यांच्या दिशेने आला.

त्याने त्यांच्या साडीचा पदर बाजूला करत गळ्यातील २ तोळे वजनाचे सोन्याचे गंठण तसेच दीड तोळा वजनाचे चेन मधील सोन्याचे गंठण असे दोन्ही दागिने हिसका मारुन तोडले, अचानक झालेल्या प्रकाराने फिर्यादी घाबरून गेल्या व त्यांना चक्कर आली. त्यामुळे त्या तोंडावर हात ठेवून काही वेळ तेथेच उभ्या राहिल्या, त्यावेळी आसपास इतर कोणीही नव्हते. त्यामुळे दागिने हिसकावणारा व त्याचे अन्य दोन साथीदार असे तिघे तेथून पसार झाले.

काही वेळाने फिर्यादी शांताबाई यांनी घरी जावून घडलेला प्रकार आपल्या मुलास सांगितला. त्यानंतर त्यांनी २८ एप्रिल रोजी तोफखाना पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली.

या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०९ (४), ३ (५) नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# शेजाऱ्यानेच केला तरुणावर चाकू हल्ला

## नागापूर येथील घटना, चौघांवर खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

नगर - किरकोळ वादातून चौघांनी लाथा बुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण करत चाकूने पोटात वार करुन तरुणाच्या खुनाचा प्रयत्न केल्याची घटना नागापूर येथील कातोरे वस्ती येथे २८ एप्रिलला रात्री १० वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत राजीवकुमार हरेंदर सहा (वय ३०, रा. कातोरे वस्ती, नागापूर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्याचा भाऊ चंदन कुमार असे घरात बसलेले असताना घराजवळ राहणारे दिलीप कुमार रामजस याचे चंदन कुमार यांच्यासोबत किरकोळ कारणावरुन वाद झाले. त्यात त्यांनी शिवीगाळ करुन मोबाईल फोडला. त्यानंतर थोड्यावेळाने पुन्हा वाद घालून दिलीपकुमार रामजस याने त्याचे मित्र आदेशकुमार मलखान कौल, आशिष शिवकलेश कौल, अरुणकुमार बिंदूवासनीप्रसाद कौल, हंसराज मलखन कौल (सर्व रा. कातोरे वस्ती, नागापूर) यांना बोलावून चंदन कुमार यास लाथाबुक्क्यांनी व लाकडी दांडक्याने मारहाण केली. त्यावेळी फिर्यादीमध्ये सोडवण्याकरता गेले असता फिर्यादीस ही मारहाण केली. आशिष कौल व अरुणकुमार कौल यांनी चंदन कुमार यांचे हात धरले व हंसराज मलखान कौल याने चंदनकुमार यांच्या पोटात चाकू खूपसुन वार केले व इतरांनी लाकडी दांडक्याने मारहाण केली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात राजीवकुमार सहा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चौघाविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०९, १८९, २९१ (२) (३), १९०, ३५२ प्रमाणे गुन्हा दाखल केला. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करीत आहे.

अहमदनगर क्लब लि.
कॅम्प भिंगार, भुईकोट किल्ला जवळ, अहिल्यानगर.
स्विमिंग कोच
त्वरीत जागा भरणे आहे
महिला कोच - वेळ दु. ३.०० ते ६.३० जागा ०१
पुरुष कोच - वेळ सकाळी ७.३० ते ११, सायं. ६.३० ते ९.०० जागा ०१
तरी इच्छुकांनी अर्ज करावेत, उमेदवारांना योग्य मानधन दिले जाईल.
मॅनेजर
अहमदनगर क्लब लि., अ.नगर
मो. ९४२२३९४९४७

अहिल्यानगर मधील सर्वोत्तम चाट / प्रिमियम क्वालिटी मिठाई
* मिठाई * नाष्टा * चाट
३ किलोमीटरच्या अंतरावरील होम डिलिव्हरी १० मिनिटात
अहिल्यानगरचे सुप्रसिद्ध...
ओम स्विटस
* ब्रँच - दौलत हाईट्स, पुणेरी अमृततुल्य शेजारी, चाणक्य चौक, अहिल्यानगर
* मेन ब्रँच - गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर
आयुष खंडेलवाल - 8169595041 । दिपक खंडेलवाल - 9423793012

3 दिवस आनंदाचे, भरघोस फायद्याचे..
सुवर्णलंकार.. संस्कृती व नात्यांचे बंध जपणारे..
22 कॅरेट सोन्याच्या दागिन्यावर प्रतीग्रॅम मिळवा. रू. 251/-सूट
ऑफर 29 एप्रिल ते 1 मे 2025 पर्यंत लागू
सुवर्ण योजना 150% बोनस
DIGI GOLD
चंदुकाका -ज्वेलर्स-
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512 | बेलापुर रोड, श्रीरामपुर 02422-221512 | धामणगांव रोड, कडा 02441-239538
आमच्याकडे खरेदी केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांची मोडतेवेळी घट धरली जात नाही.

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
* सर्व आजारांसाठी ऍडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# जलसंधारणासाठी अब्जावधी रुपये खर्च करून सुद्धा ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर का सुरू?

नगर - जलसंधारणासाठी अब्जावधी रुपये खर्च करून सुद्धा ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर का सुरू करावे लागत आहेत याची शासनाने चौकशी करावी अशी मागणी माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी केली आहे.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर अब्जावधी रुपयांची जलसंधारणाची कामे ग्रामीण भागांमध्ये करण्यात आली. या कामांसाठी कृषी विभाग, पाटबंधारे विभाग, वनविभाग आणि सामाजिक वनीकरण विभागावर जबाबदारी देण्यात आली होती. या विभागांमार्फत अब्जावधी रुपयांचा खर्च होऊनही ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवरच अवलंबून राहावे लागत आहे.

माती अडवुन पाणी जिरविण्याऐवजी या योजनांमधील पैसा अक्षरशः मातीत गेला. दुर्दैवाने योजना भ्रष्टाचारासाठीच तयार करण्यात आल्या होत्या की काय अशी शंका येते. अहमदनगर जिल्ह्यामध्ये जलयुक्त शिवार योजनेच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरकारभार झाल्यामुळे मी स्वतः या कामांसाठी एस. आय. टी. चौकशी स्थापन करण्याची मागणी केली होती. एसआयटी चौकशी स्थापन झाली. कामांची चौकशीही झाली मात्र अद्याप एसआयटी चौकशीचा अहवाल जाहीर केला जात नाही. चौकशी होऊन दोषींवर कारवाई न झाल्यामुळे गैरकारभार करणारांचे मनोबल वाढते असे सुधीर भद्रे यांनी स्पष्ट करून संबंधितांवर कारवाईची मागणी केली आहे.

जलयुक्त शिवार योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी टँकर बंद व्हावे, शेतीसाठी पाणी उपलब्ध व्हावे हा उद्देश होता. मात्र हा उद्देश अजिबात साध्य झालेला नाही. यानंतर ग्रामीण भागातील टँकर बंद करण्यासाठी जलजीवन मिशन योजना राबविण्यात आली. या योजनेमध्ये प्रत्येक गावातील प्रत्येक वाडी वस्तीवर पिण्याच्या पाण्यासाठी तरतूद करण्यात आली. मात्र सध्या जलजीवन मिशन राबविलेल्या गावांमधुन टँकरचे प्रस्ताव येत असल्यामुळे जिल्हा प्रशासनही आश्चर्यचकित झाले आहे.

आजपर्यंत जलसंधारण कामावर खर्च झालेला पैसा कामे न करता बँकेत ठेवला असता तर त्या रकमेच्या व्याजातून ग्रामीण भागातील जनावरांना आणि माणसांना बिसलरी चे पाणी पिण्यासाठी आणि वापरण्यासाठी देता आले असते असे गणित श्री. भद्रे यांनी मांडले आहे.

सध्या आवश्यकता असेल त्या गावांना अति तातडीने टँकर मंजूर करावेत अशी विनंती करून कृषी विभाग, पाटबंधारे विभाग, वन विभाग आणि सामाजिक वनीकरणाकडून झालेल्या चुका टाळून भावी काळामध्ये त्रुटी राहणार नाही अशा योजना तयार कराव्यात आणि ग्रामीण भागामध्ये किमान पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध होईल अशी व्यवस्था करावी अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, सुनील टाक, बबलू खोसला, पोपटराव साठे, रईस शेख, वीरबहादुर प्रजापती व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी शासनाकडे केली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...





### अक्षय्य तृतीया आणि गंगास्मरण

विचित्र आवडीनिवडी जोपासणारे कलियुगातील माणसाचे जीवन रागद्वेषाच्या उसळ्या घेत खळखळाट करीत मोठे थैमान घालत आहे. एकूणच माणसाच्या जीवनाला सुखदु:खाच्या प्रवाहाची सुद्धा उपमा दिली जाते. त्यातूनच जीवनगंगा हा सुद्धा एक शब्दप्रयोग त्याचा अर्थ न समजता वापरला जातो. माणूस मिरवूनही घेत असतो.

गीता सांगते, माणूस ज्यावेळी निरपेक्ष होतो, अर्थातच त्रिगुणरुपी मायेच्या पलीकडे जातो, त्यावेळीच रागद्वेष जाऊन जगात नांदणाऱ्या प्राचीन अशा प्रेमजाणिवेशी जवळीक साधत आपले जीवन अमृत सागराकडे वाहत जाणाऱ्या गंगाप्रवाहाप्रमाणे करतो. सध्याच्या भयाण कलियुगात माणसाची सुख भोगण्याची व अनुभवण्याची रीत मोठी विचित्र होत चालली आहे.

त्यामुळेच तो अक्षय्य सुखाची अनुभूती घ्यायची गोष्टच सोडा, तो सुखाचे समजून सध्या जे अन्न घेतोय, ते सुखाचे अन्नच जणू भयंकर यातनांना, दुःखांना किंवा विषाणूंना खाद्य पुरवल्यासारखेच होत आहे.

सदासर्वदा अक्षय्य सुख-समाधानाचा दिन अक्षय्य तृतीया आणि शनिवारी होणारी गंगोत्पत्ती अथवा गंगावतरण हाच संदेश देत आहे की, अक्षय्य सुखाचे धनी होण्यासाठी गंगेचे स्मरण करत सुखदुःखाच्या खाईत जणू नरकयातना भोगणारे आपले जीवन अमृतमयी करू या - (ज्योतिषतज्ज्ञ-श्रीराम भट)

यावर्षी ३० एप्रिल बुधवारी अक्षय्यतृतीया आहे. या दिवशी केलेले धार्मिक तप, ध्यान, दान इ. क्षय होत नाही. या शुभदिनी कोणत्याही शुभकार्याचा श्रीगणेशा करता येतो. विविध ठिकाणी त्या त्या भागातील रितीरिवाजानुसार हा शुभदिन साजरा केला जातो. याच दिनी महर्षी व्यासांनी श्रीगणेशाला महाभारत लिहिण्यास सांगितले. विष्णुअवतार परशुरामांचा जन्मही याच शुभदिनी.

या दिवशी जैन धर्मातील तप आराधनेच्या वर्षी तप समापन होते तर संत तुकडोजी महाराज, बसवेश्वर जयंती असते. ब्रह्मदेवाने याच दिवशी सृष्टीची रचना केल्याचेही म्हटले जाते. आपल्या अक्षय्य सुख समृद्धीसाठी शुभकामना आहे.



पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून पहेलगाम घटनेचा हिंदुत्ववादी संघटनांच्यावतीने निषेध करण्यात आला

# पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून पहेलगाम घटनेचा हिंदुत्ववाद्यांकडून निषेध

नगर - चितळे रोड येथे हिंदू राष्ट्र सेना, श्रीराम नवमी उत्सव समिती, राधाकृष्ण मित्र मंडळ, महाकाल ग्रुप व सचिन पळशीकर मित्र मंडळाच्या वतीने पाकिस्तानी अतिरेक्यांनी पहेलगाम येथे गोळीबार करून हत्या केलेल्या हिंदू बंधू भगिनींना श्रद्धांजली वाहण्यात आली. पाकिस्तानचा झेंडा पायदळी तुडवून पाकिस्तान मुर्दाबाद... पाकिस्तान मुर्दाबाद...., भारतमाता की जय...., जय श्रीराम अशा घोषणा दिल्या. तसेच पाकिस्तानचा झेंडा लाखो लोकांच्या पायदळी तुडवला जावा. यासाठी भर रस्त्यात चिटकवण्यात आला. याप्रसंगी सचिन पळशीकर, उत्कर्ष गीते, सुमित धेंड, रवी दंडी, मयूर देशमाने, आतिष अष्टेकर, संजय कुलकर्णी, पिंटू अंकाराम, श्रीकांत भीमनाथ, दिनेश दगडे, सोनू कोमाकुल, ऋषिकेश सामल, आनंद नोमूल, बंटी अंकाराम, ओंकार भोसले, भैय्या भगत, सुरज गोंधळी, परेश खराडे आदी उपस्थित होते.

यावेळी उत्कर्ष गीते म्हणाले, काश्मीरमधील पहेलगाम येथे पाकिस्तानी धर्मांध अतिरेक्यांनी फक्त हिंदू धर्माच्या पर्यटकांनाच धर्म विचारून बेछूट गोळीबार करून त्यांची अमानुषपणे हत्या केली. इस्लामिक आतंकवाद्यांनी धर्माची विचारणा करून निष्पाप हिंदूंची हत्या केली. याचा आम्ही निषेध करीत आहोत. हिंदू धर्मियांनीही खरेदी विक्री करताना हिंदू व्यवसायिकांकडूनच खरेदी करावी, व व्यवहार करावा. भारत सरकारने या दहशतवाद्यांना शोधून लवकरात लवकर फाशी द्यावी. अशी मागणी यावेळी केली.

रवी दंडी म्हणाले, काश्मीर खोऱ्यात इस्लामी अतिरेक्यांकडून हिंदू पर्यटकांवर केलेला हल्ला हा माणूसकिला काळीमा फासणारा आहे. आता भारत सरकारने पाकिस्तानला कायमचा धडा शिकवावा.

# जिल्हा मराठा पतसंस्थेतर्फे पहलगाम हल्ल्याचा निषेध

नगर - पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने २७ एप्रिल रोजी काळ्याफिती लावून निषेध करण्यात आला. तसेच मृत पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पतसंस्थेच्या वतीने मार्केट यार्ड शाखेत बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या घटनेचा निषेध व्यक्त करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

याप्रसंगी संस्थापक अध्यक्ष विजयकुमार ठुबे, व्हाईस चेअरमन बाळकृष्ण काळे, शाखाध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, संचालक लक्ष्मण सोनाळे, किशोर मरकड, संचालिका राजश्री शितोळे, संचालक सतीश इंगळे, प्राध्यापक किसन पायमोडे, यशवंत शिंदे, एडवोकेट काशिनाथ डोंगरे, उदय अनभूले, इंजिनिअर संभाजी मते, द्वारकाधीश राजेभोसले, इंजिनिअर बाळासाहेब सोनाळे, डॉ. कल्पना ठुबे, अॅड. राजेश कावरे, निवृत्ती बबन रोहकले, सुनील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, उपकार्यकारी अधिकारी बबनराव सुपेकर, शाखा संचालक अनुपमा भापकर यांसह पतसंस्थेचे पदाधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



पहलगाम येथे पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा जिल्हा मराठा नागरी सहकारी पतसंस्थेच्या वतीने २७ एप्रिल रोजी काळ्याफिती लावून निषेध करण्यात आला.

## बोल्हेगाव येथे गळफास घेऊन एकाची आत्महत्या

नगर - राहत्या घरात छताला गळफास घेऊन एका इसमाने आत्महत्या केल्याची घटना बोल्हेगाव येथे २९ एप्रिल रोजी पहाटे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. पोपट गणपत नांगरे (वय ५५, रा. बोल्हेगाव) असे मयताचे नाव आहे.

नांगरे यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांचा मुलगा सुशांत याने त्यांना तातडीने जिल्हा शासकीय रुग्णालयात औषधोपचाराकरीता दाखल केले. तेथील डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले.

याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. वाघ यांच्या अहवालावरून आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून अधिक तपास महिला पोलीस हवालदार शोभा सोनवणे या करीत आहेत.

## धारदार कोयता घेवून दहशत करणाऱ्यास पकडले

नगर - धारदार कोयता बाळगून मोठमोठ्याने शिवीगाळ करुन दहशत करणाऱ्या एकास तोफखाना पोलिसांनी २८ एप्रिल रोजी मोरया पार्क येथील स्वप्नसाकार सोसायटी येथे पकडले आहे. जालिंदर आप्पासाहेब लहारे (रा. स्वप्नसाकार सोसायटी, मोरया पार्क, अ.नगर) असे या आरोपीचे नाव आहे.

तोफखाना पोलिसांना फोनवरुन माहिती मिळाली की जालिंदर लहारे हा हातामध्ये कोयता घेऊन त्याच्या पत्नीला मोठमोठ्याने शिवीगाळ करुन परिसरात दहशत करीत आहे. अशी माहिती मिळाल्याने तोफखाना पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन, हातात कोयता घेऊन मोठमोठ्याने शिवीगाळ करणाऱ्या लहारे यास ताब्यात घेतले. त्याच्याकडील एक लोखंडी धारदार कोयता जप्त केला. याप्रकरणी पो.कॉ. बाळासाहेब भापसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिस ठाण्यात जालिंदर लहारे यांच्या विरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने मारहाण करत दोघांच्या खुनाचा प्रयत्न; ९ जणांवर गुन्हा दाखल

नगर - बसस्टँडच्या आडोशाला लघुशंका करण्याच्या कारणावरुन नऊ जणांनी दोघांना लोखंडी रॉड, लाकडी दांडके, दगड व लाथाबुक्क्याने बेदम मारहाण करून गळा दाबून खुनाचा प्रयत्न केल्याची घटना नगर तालुक्यातील वाटेफळ येथील सर्विस रोडवर बसस्टॅन्ड येथे २७ एप्रिल रोजी सायंकाळी घडली.

याबाबत प्रशांत बापू चौधरी (वय २२,रा कुंटेफळ, ता. आष्टी, जि. बीड) यांनी दिलेले फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादीचा भाऊ भाऊसाहेब चौधरीसह फिर्यादी वाटेफळ येथील सर्विस रोडवरील बसस्टँडवर दीपक कराळे याची वाट पाहत असताना फिर्यादी यास लघूशंका आल्याने ते बसस्टँडचे आडोशाला लघु शंका करण्याकरिता गेले. बसस्टँडच्या आडोशाला लघुशंका करण्याच्या कारणावरुन नारायण कोळेकर, बाळासाहेब कोळेकर, सोमनाथ चितळकर, सुशील चितळकर, सोन्या उल्हारे, धरम महारनवर, अजय साबळे, नारायण कोळेकर यांची पत्नी (नाव माहित नाही) यांनी फिर्यादी व भाऊसाहेब चौधरी यांना ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचा गळा दाबून खुनाचा प्रयत्न केला. यावेळी त्यांना सोडवण्याकरता आलेले वेदांत चौधरी, दीपक कराळे यांना लोखंडी रॉड, लाकडी दांडके, दगड व लाथाबुक्क्याने बेदम मारहाण केली. तसेच शिवीगाळ करुन फिर्यादीच्या हातातील सोन्याची अंगठी बळजबरीने काढून घेतली आणि मोबाईल फोडून नुकसान केले. मारहाणीत फिर्यादी व त्यांच्या भाऊ गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात प्रशांत चौधरी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ९ जणांच्या विरुद्ध भा. न्या. सं. २०२३ चे कलम १०९, ११५, ११८ (१) (२), ११९ (१) ३२४ (४), ३५१ (२) (३) ३५२, १८९, १९०, १९१ (१) (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक उमेश पतंगे करीत आहेत.


## सुनील चिलका यांचे अल्प आजाराने निधन



नगर - पद्मानगर अहिल्यानगर येथील पद्मशाली समाजाचे मार्गदर्शक सुनील विठ्ठल चिलका (वय ६८) यांचे २८ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर २९ एप्रिल रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## रत्नाकर महामुने यांचे अल्प आजाराने निधन



नगर - चिचोंडी पाटील येथील रहिवासी रत्नाकर पंढरीनाथ महामुने (वय ८०) यांचे २९ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या २ मुले, १ मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. प्रदीप व विजय महामुने यांचे ते वडील होत.

## रत्नाकर जगधणे यांचे अल्प आजाराने निधन



छत्रपती संभाजीनगर - कासारी बाजार येथील रहिवासी रत्नाकर दत्तात्रय जगधणे (६९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कैलासनगर, स्मशाभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, सुन, जावई नातवंडे असा परिवार आहे.

## कमलबाई मुथा यांचे वृद्धापकाळाने निधन

श्रीरामपूर - येथील श्रीमती कमलबाई गणपतलालजी मुथा



(वय ८२) यांचे २८ एप्रिल रोजी दुपारी १:३० वा. वृद्धापकाळाने निधन झाले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, ३ मुली, सून, दिर, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे. सुभाष व प्रकाश मुथा यांच्या भावजई, स्वप्नेश मुथा यांच्या चुलती, विजय मुथा यांच्या मातोश्री होत.

## सर्जेपुरा चौकात आढळला मृतदेह

नगर - शहरातील सर्जेपुरा चौकातील साईदीप बेकरी समोर, रस्त्याच्या कडेला एका अंदाजे ४८ वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह २७ एप्रिल रोजी आढळून आला आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून या मयत इसमाची ओळख पटविण्याचा प्रयत्न पोलिस करत आहेत.

साईदीप बेकरी समोर, रस्त्याच्या कडेला एक इसम बेशुध्द अवस्थेत मिळुन आला होता, त्यास १०८ चे अँम्ब्युलन्सचे चालक गोविंद थोरात यांनी उपचाराकरीता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना तपासून ते उपचारापुर्वी मयत झाले असल्याचे घोषीत केले आहे.

मृत व्यक्तीची ओळख पटण्याइतपत कोणतीही चिज वस्तु आढळुन आलेली नसल्याने पोलिस त्याची ओळख पटविण्याचे किंवा त्याचे नातेवाईकाचा शोध घेत आहे. या व्यक्ती बाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी पुढील क्रमांकावर ०२४१ २४१६११८, किंवा सहाय्यक फौजदार तनवीर शेख मोबाईल नं. ९९२३७०७१७० या फोनवर संपर्क करण्याचे आवाहन तोफखाना पोलिसांनी केले आहे.

# आ. अरुण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थाकरीता नगरमधील उद्योजकांचे तिरुपती बालाजीला साकडे

नगर - माजी आमदार अरुण जगताप यांच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, त्यांच्या समर्थ नेतृत्वाचा आश्रय पुढेही मिळावा. या करिता अहिल्यानगर शहरातील उद्योजकांनी तिरुपती बालाजी चरणी आर्जव केले. पुण्यातील रुबी हॉल क्लिनिक येथे सुरू असलेल्या उपचारांदरम्यान काकांची प्रकृती सुधारण्यासाठी आर्ततेने प्रार्थना करण्यात आली. काकांचे नगरच्या जनतेवर असलेले प्रेम, त्यांच्या कार्याची तळमळ आठवतच, काकांचा आशीर्वाद आमच्यावर सदैव राहावा... अशा भावना व्यक्त करत उद्योजकांनी बालाजी चरणी डोळ्यांत श्रद्धेचा ओलावा घेऊन प्रार्थना केली.



अहिल्यानगरच्या उद्योजकांनी, बारा बलुतेदार महासंघाच्यावतीने अरूण जगताप यांच्या प्रकृती स्वास्थ्याकरीता थेट तिरुपती बालाजी मंदिरात प्रार्थना केली आहे.

या भावनिक क्षणी चाय मस्का समूहाचे रोहित कोडम, विठाई उद्योग समूहाचे विनायक गाडळकर, मल्हार प्रेम कलर वर्ल्डचे राहुल गायकवाड, बारा बलुतेदार महासंघाचे जिल्हाध्यक्ष व उद्योजक माऊली मामा गायकवाड उपस्थित होते.

प्रत्येकाने आपल्या मनापासून काकांच्या आरोग्यासाठी दिव्याच्या तेजात सामावलेली प्रार्थना अर्पण केली. औषधोपचार सुरू आहेतच, पण दवांच्या जोडीला दुवा लागतेच, या श्रद्धेने या उद्योजकांनी बालाजी चरणी नतमस्तक होत त्यांच्या आरोग्यासाठी सातत्याने प्रार्थना केली.

तिरुपतीच्या पवित्र वातावरणात, घंटानादात, त्यांच्या प्रार्थनांचे स्वर आकाशाला भिडले, संपूर्ण नगरकरांच्या हृदयातूनही काकांसाठी सदिच्छांचा पूर चालू आहे. त्यांना लवकर बरे होण्यासाठी सर्व स्तरातून प्रार्थना होत आहे.

# बसस्थानकातून तरुणाच्या आयफोन मोबाईलची चोरी

नगर - गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने पॅन्टच्या खिशात ठेवलेला ॲपल कंपनीचा आयफोन १३ प्रो हा चोरून नेल्याची घटना स्वस्तिक चौक येथील पुणे बसस्थानक येथे २७ एप्रिल रोजी सायंकाळी घडली

याबाबत विजय पुरुषोत्तम रोहिडा (वय २१, रा. मिस्किन रोड, आय व्ही वाय ब्लासम, प्लॅट नंबर ब ६०१, ओस्तवाल किचनचे पाठीमागे,अ.नगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे त्यांच्या घरी आलेले पाहुणे यांना २७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजण्याचे सुमारास पुणे बस स्टॅण्ड येथे सोडवण्यासाठी गेले व नगर पुणे बस आली त्यावेळी तेथे मोठी गर्दी होती. गर्दीत वाट काढत त्यांना बसमध्ये बसविले. त्यावेळी फिर्यादी यांचा फोन पॅन्टचे उजव्या खिशात होता. बस निघुन गेल्यानंतर फिर्यादी त्यांच्या पार्क केलेल्या वाहनाकडे जात असताना त्यांनी खिशातील ३० हजार रुपये किमतीचा निळ्या रंगाचा आयफोन १३ प्रो मोबाईल पाहिला असता तो मिळुन आला नाही. फोनचा बस स्टॅण्डवर शोध घेतला तो मिळुन आला नाही. त्यावेळी खात्री झाली की पाहुण्यांना गर्दीत बसमध्ये बसवित असताना कोणीतरी अज्ञात इसमाने पॅन्टच्या उजव्या खिशातील मोबाईल गर्दीचा फायदा घेवुन चोरुन नेला.

या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी विजय रोहिडा यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास महिला पोलीस नाईक साळवे या करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# अहिल्यानगर जिल्ह्यात ३० एप्रिल रोजी महाराष्ट्र स्वाभिमान मंगल कलश यात्रा

**रथयात्रेचे जल्लोषात करणार स्वागत, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ताकदीने लढवणार : आ. काशिनाथ दाते**

नगर – राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने संपूर्ण राज्यात स्वाभिमान मंगल कलश यात्रेला सुरुवात झाली असून उत्तर महाराष्ट्रातील जळगाव येथे शुभारंभ झाला आहे. ३० एप्रिल रोजी शिर्डी येथे आगमन होणार असून याबाबत पक्षाची नियोजनाची बैठक जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, प्रा. माणिक विधाते, अण्णासाहेब शेलार, प्रशांत गायकवाड, संजय कोळगे, क्षितिज घुले, संतोष धुमाळ, सुरेश बनसोडे, दत्तात्रेय पानसरे, आशाताई निंबाळकर, सचिन डेरे, अकुंश गर्जे, साईनाथ भगत व जिल्ह्यातील सर्व संघाचे जिल्हाध्यक्ष, महिला पदाधिकारी, शहराचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, राज्यात महायुतीचे सरकार असून शासनाच्या योजना जनतेपर्यंत घेऊन जाण्याचे काम केले जात आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली आपण सर्वजण काम करत असून पक्षवाढीचे काम आपल्या सर्वांना करावे लागणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आता लवकर होतील, यासाठी पक्षाची ताकद अहिल्यानगर जिल्ह्यात वाढवायची आहे. महायुती म्हणून एकत्रित निवडणुका लढवल्या जातील किंवा नाही हे आता आपल्याला सांगता येणार नाही, प्रत्येकाला पक्ष वाढविण्याचा अधिकार आहे आपली ताकद वाढली तर पक्षाला फायदा होईल. तरी पक्षातील कार्यकर्त्यांनी आपसातले मतभेद बाजूला ठेवून पक्ष वाढीचे काम करावे. महाराष्ट्र स्वाभिमान मंगल कलश यात्रा ३० एप्रिल रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात येणार असून पक्षाच्या वतीने जल्लोषात स्वागत केले जाणार असल्याचे ते म्हणाले.



महाराष्ट्र स्वाभिमान मंगल कलश यात्रेचे अहिल्यानगर जिल्ह्यात आगमन होणार असून याबाबत राष्ट्रवादी काँग्रेसचे नियोजन बैठक जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार काशिनाथ दाते यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. (छाया – लहू दळवी)

अशोक सावंत म्हणाले की कलश यात्रा ३० एप्रिल रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डी येथे आगमन होणार आहे. या ठिकाणी प्रवरा व गोदावरी नदीतील पाणी कलश मध्ये टाकले जाणार असून, श्री शनिशिंगणापूर येथील माती कलशामध्ये टाकली जाणार आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या कार्यालयाजवळ कलश यात्रेचे स्वागत जिल्ह्याच्या वतीने करण्यात येणार आहे. त्यानंतर कलश यात्रा पारनेरकडे रवाना होणार असून, पारनेर येथे रथयात्रेचा समारोप होणार आहे. यावेळी राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री नरहरी झिरवाळ, माजी आमदार अनिल भाईदास उपस्थित राहणार आहे. पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून स्वागत उत्साहात करायचे आहे असे ते म्हणाले.

संपत बारस्कर म्हणाले की अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली स्वाभिमान कलश रथयात्रा सुरू झाली असून, नगर जिल्ह्यात येणार आहे. माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर पुणे येथे खाजगी हॉस्पिटल येथे उपचार सुरू असल्यामुळे वाजत गाजत रथयात्रेचे स्वागत केले जाणार नाही, मात्र आमदार संग्राम जगताप यांच्या कार्यालयात जवळ नगर शहरातील पदाधिकारी कार्यकर्ते स्वागत करतील असे ते म्हणाले.

यावेळी अनेक पदाधिकाऱ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी संजय कोळगे यांनी आभार मानले.

विधान परिषदेचे माजी आमदार अरुण जगताप यांच्यावर पुणे येथे खाजगी हॉस्पिटल मध्ये उपचार सुरू असून त्यांची प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून परमेश्वराकडे प्रार्थना केली आहे ते लवकर बरे होऊन जनतेमध्ये यावे व त्यांच्या हातून समाजाची सेवा हवी अशी अपेक्षा अशोक सावंत यांनी व्यक्त केली.

# आरोग्य सेवा ही देखील ईश्वर सेवाच

**संजय सपकाळ यांचे प्रतिपादन; भिंगारच्या सौरभनगर येथील हरिनाम सप्ताहात भाविकांची मोफत आरोग्य तपासणी, आरोग्य सेवा आणि भक्तिभावाचे अनोखे संगम**

नगर – आरोग्य सेवा ही देखील ईश्वर सेवाच आहे. गंभीर आजार होण्यापूर्वीच विविध तपासणी करुन ते आजार ओळखणे गरजेचे आहे. वेळेवर तपासणी केल्यास गंभीर आजारांपासून बचाव होतो. अशा उपक्रमांमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही आरोग्यसेवेचा लाभ मिळत असल्याचे संजय सपकाळ यांनी सांगितले.

भिंगार, सौरभनगर येथील श्री साई मंदिराच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात पार पडला. सप्ताहाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत स्नेहालय संचलित केरिंग फ्रेंड हॉस्पिटलच्या रिसर्च सेंटरच्या वतीने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचा लाभ पंचक्रोशीतील भाविकांनी घेतला. यंदा सप्ताहाचे ३० वे वर्ष होते.



भिंगारच्या सौरभनगर येथील हरिनाम सप्ताहात भाविकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

आरोग्य शिबिराच्या पार्श्वभूमीवर ह.भ.प. रेखाताई मडावी, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे अध्यक्ष संजय सपकाळ, मनोज देशपांडे, साजन शेंडे, डॉ. गणपत वसवे, डॉ. अतुल मडावी, पूजा मडावी, श्रध्दा गायकवाड, शितल धोंगडे, ह.भ.प. अनावडे महाराज आर्दीसह ग्रामस्थ उपस्थित होते.

रेखाताई मडावी यांनी आपल्या भाषणात सांगितले की, धार्मिक कार्यक्रमासह आरोग्यसेवेचा उपक्रम जोडल्यामुळे नागरिकांमध्ये आरोग्याबद्दलची जागरूकता वाढते. स्वतःहून तपासणी न करणाऱ्या नागरिकांसाठी हे शिबिर आधार ठरत आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्यावरच त्याचे आयुष्य आणि समाजाची उन्नती अवलंबून असते. त्यामुळे अशी आरोग्य शिबिरे म्हणजे प्रत्येकाच्या जीवनाला नवसंजीवनी देणारा उपक्रम असल्याचे स्पष्ट केले.

या शिबिरात शारीरिक तपासणी, नेत्र तपासणी, कान–नाक तपासणी, स्त्रीरोग तज्ज्ञांच्या सल्ल्याने महिलांची आरोग्य तपासणी, बालकांची तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर प्रमाण, रक्तगट व हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली. गरजूंना मोफत औषध वाटपही करण्यात आले.

या सप्ताहात ह.भ.प. मुक्ताई महाराज धाडगे, संगीताताई कापसे, पूजाताई अळकुटे–माने, शंकर महाराज गणपे भक्तिमय वातावरणात कीर्तन झाले. ह.भ.प. विलास महाराज मदने यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची भक्तिमय सांगता झाली. भाविकांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. सुहास ढोरजे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री स्वामी समर्थ संगीतालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या तबलावादन जुगलबंदीने कार्यक्रमाची रंगत वाढवली.

हा धार्मिक सोहळा व आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी मडावी परिवार, ह.भ.प. ऋषिकेश महाराज कराळे, अनिताताई सुडके, मायाताई गोरखा, रामेश्वर महाराज वाघमोडे, म्हस्के सर, कांबळे महाराज, गीता सत्संग मंडळ, तपेश्वर भजनी मंडळ, विठ्ठल रुक्मिणी भजनी मंडळ, ओंकार भजनी मंडळ, श्री साई सोहम परिवार, श्री साईबाबा मंदिर राधानगरी, साईदास परिवार, भृंगऋषी भजनी मंडळ, हरी ओम माऊली भजनी मंडळ पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# कल्पना घडेकर यांना पीएचडी पदवी जाहीर

**अबॅकस मध्ये केले संशोधन**



नगर – येथील रक्षिता महिला मंचच्या संस्थापिका कल्पना अशोक घडेकर–कारले यांना भारत सरकारच्या नीती आयोग, कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय तसेच सूक्ष्म व लघु उद्योग मंत्रालय आणि आयर्लंड अॅक्रेडेशन फोरमच्या वतीने प्रमाणित लिंकेंड्री पीस अवॉर्ड कौन्सिल या शैक्षणिक विद्यापीठाची अबॅकस या गणितीय संकल्पनेतील मोजणीमधील हातच्याची अडचण सोडवणाऱ्या क्रांतीकारी संशोधनाबद्दल केवळ भारतातीलच नव्हे तर जगातील पहिली पीएचडी प्राप्त करण्याचा मान प्राप्त झाला आहे.

येत्या आठवड्यात नवी दिल्ली येथील कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे समारंभात घडेकर यांना ही पदवी प्रदान केली जाणार असून, अबॅकसमधील विस्तृत नवसंशोधन कार्य हे सुमारे ३७ नाविन्यपूर्ण संकल्पनांचे संशोधन त्यांनी विद्यापीठीय समितीला सादर केले होते. गेल्या पंचवीस वर्षांपासून भारतासह सुमारे ४५ देशांमध्ये शाखा असणाऱ्या एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅमीसाठी सौ.घडेकर अबॅकस मार्गदर्शिका म्हणून काम करत आहेत.

विद्यार्थ्यांना आकडेमोड करत असताना होणाऱ्या चुकांची अनेक कारणे शोधून उलटी गुणाकार करण्याची पद्धत, भागाकाराची क्लिष्ट पद्धत, अबॅकस पाटीवर मधल्या रॉडवर बेरीज आणि वजाबाकी करण्याची पद्धत यामध्ये घडेकर यांनी संशोधनातून विविध उपाय करून विविध बदल केल्यानंतर विद्यार्थ्यांचे आकडेमोड करण्याची गती वाढवली. शिवाय संख्या वाचण्यात गफलत होत होती. त्यापासून विद्यार्थ्यांना सुटका मिळाली. या संशोधनामुळे कमीत कमी वेळात विद्यार्थी अचूक उत्तरे देऊ लागली. अबॅकसवर आकडेमोड करताना पूर्वी जो गोंधळ होत होता तो गोंधळ पूर्णपणे थांबला. क्लिष्ट पद्धती नष्ट होऊन विद्यार्थी हसत खेळत अबॅकसचा उपयोग करू लागले. परिणामी पालकांचा व विद्यार्थ्यांचा अबॅकस वरील विश्वास वाढला. अबॅकसवर आकडेमोड करण्याच्या वरील पद्धती सर्वमान्य होऊन राज्य, देश तथा जगभरातील विविध अबॅकस अॅकॅमींनी वरील पद्धतीचा स्वीकार केला. या सर्व संशोधनांचा समितीने सखोल अभ्यास केला.

भारतातील अबॅकसमधली पहिली पीएचडी मिळवताना गेल्या दोन ते तीन दशकांच्या मेहनतीला यश आले आहे. भारतीय शिक्षण पद्धतीतील गणितासाठी अबॅकस महत्त्वाची संकल्पना असल्यामुळे त्यातील माझे नवसंशोधन हे निश्चितच शिक्षक, पालक, विद्यार्थी यांच्यासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. या संशोधनामध्ये एव्हरेस्ट अबॅकस अॅकॅमीच्या शिक्षिका व विद्यार्थी यांची मोलाची मदत झाली. देशातील १०० टक्के शाळांमध्ये अबॅकस शिकवले जावे. असे प्रतिपादन घडेकर यांनी केले.



अहमदनगर महाविद्यालयातील कु. शुभांगी उत्तम भांड आणि यश गायकवाड या दोन्ही विद्यार्थ्यांना मायक्रोबायोलॉजी सोसायटी, इंडीया या संस्थेमार्फत 'उत्कृष्ट विद्यार्थी' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# अहमदनगर महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना 'उत्कृष्ट विद्यार्थी' पुरस्कार

नगर – जैवतंत्रज्ञान विभागातील पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या कु. शुभांगी उत्तम भांड आणि पदवी शिक्षण घेणाऱ्या यश गायकवाड या दोन्ही विद्यार्थ्यांना मायक्रोबायोलॉजी सोसायटी, इंडीया या संस्थेमार्फत 'उत्कृष्ट विद्यार्थी' पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विद्यार्थ्यांचे विविध अंगी कौशल्य, शैक्षणिक गुण इत्यादी लक्षात घेवून हा पुरस्कार विद्यार्थ्यांना देण्यात आला.

दरवर्षी जैवतंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांना कॅम्पस मुलाखतीमधुन नोकरीच्या संधीही उपलब्ध केल्या जातात. सिरम लाईक सायन्सेस, बातार कॅन्सर जेनेटिक्स, रिलायन्स लाइफ लायन्ससेस यासारख्या उच्च दर्जाच्या संशोधन करणाऱ्या कंपन्यांमध्ये मुलांना नोकरीच्या संधी उपलब्ध होतात.

जैवतंत्रज्ञान क्षेत्र हे भविष्यातील एक महत्वाचे क्षेत्र ठरणार आहे. ज्यामध्ये विविध आजारांवर नवीन संशोधन करून उपचार तसेच उपचार पद्धतीचे संशोधन करण्यात येते. बारावी शिक्षणानंतर मुलांनी बी.एस. सी बायोटेक्नॉलॉजी हा कोर्स घेणे करिअरसाठी उत्तम राहील असे. जैवतंत्रज्ञान विभागाचे समन्वयक डॉ. सनी रूपवते यांनी सांगितले. दोन्ही विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे यांनी केला. या यशासाठी विभागातील प्रा. राजश्री भोपे, प्रा. प्रशांत कटके, प्रा. आधीता गव्हाने, प्रा. ज्योत्स्ना गलांडे यांचे मार्गदर्शन लाभले.

# भगवान महावीर चषक क्रीडा स्पर्धा खेळाडूंसाठी हक्काचे व्यासपीठ

**उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन; वाडिया पार्क येथे स्पर्धेचे उद्घाटन**

नगर – भगवान महावीर चषक क्रीडा स्पर्धा ही खेळाडूंसाठी एक पर्वणी असून त्यांना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. अशा स्पर्धा आयोजित करणे हे शहराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे या माध्यमातून चांगल्या विचारांची देवाणघेवाण होत असते, एकमेकांमध्ये एकोपा निर्माण होतो आजचा युवक मैदानी खेळांपासून लांब चालला असून त्याला मैदानी खेळाची गोडी निर्माण करून दिली जाते, वाडिया पार्क मैदान भगवान महावीर चषक क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून अक्षरशा प्रकाशमय झालेले पाहवयास मिळाले, महावीर चषक परिवाराचे सदस्य एकत्रित येऊन शहरात सुरु करण्यात आलेला क्रीडा स्पर्धेचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.



वाडियापार्क येथे भगवान महावीर चषक कप स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. (छाया – लहू दळवी)

वाडियापार्क येथे भगवान महावीर चषक कप स्पर्धेचे उद्घाटन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते झाले. यावेळी डॉ. विलास गुंदेचा, माजी नगरसेवक संजय चोपडा, अमित मुथा, अतुल शिंगवी, गिरीश अग्रवाल संतोष बोरा, सीए सनित मुथा, अनुज सोनीमंडलेचा, राजेंद्र गांधी, राजेंद्र काळे, विलास पोखरणा, राजेंद्र बोथरा, अजित कर्नावट, रवींद्र शेलोत, अध्यक्ष राजेंद्र तातेड, किरण पोखरणा, अजय गुगळे, प्रीतम पोखरणा, अतुल शेटीया, रुपेश भंडारी, प्रफुल्ल मुथा, डॉ. सचिन बोरा, अमित पितळे, लक्ष्मीकांत शेटिया, प्रीतम गुंदेचा, उमेश मंत्री, निलेश मंत्री, आनंद पितळे, वर्धमान मुनोत, राहुल शिंदे, राहुल शेटिया, अभी कोके, सुयोग लुनिया, मयूर पितळे, सी.ए आनंद गांधी, आनंद कटारिया, रुपेश कटारिया, सचिन कटारिया, रितेश बोरा, आनंद नाहाटा, अनिल दुग्गड, बापू गांधी, वर्धमान मुनोत, किरण पोखरणा, पावन पोखरणा, निखील गुगळे, सचिन कटारिया, विकास सुराणा, प्रवीण शिंगवी, अजय कांबळे आदी उपस्थित होते.

डॉ. विलास गुंदेचा म्हणाले, महावीर चषक ही क्रीडा स्पर्धा नसून युवकांना प्रेरणा देणारी ठरत आहे, खेळाच्या माध्यमातून मनुष्य सुदृढ निरोगी राहत असतो त्या माध्यमातून आनंदीमय जीवन जगता येत असते, मैदानी खेळाच्या माध्यमातून तरुणांना शिस्तीचे धडे मिळत असतात विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षण घेत असताना क्रीडा स्पर्धेत भाग घेतला पाहिजे हार–जीत पेक्षा खेळांमध्ये सहभाग घेणे गरजेचे आहे या माध्यमातून आपल्यामध्ये ऊर्जा निर्माण होत असते असे डॉ. गुंदेचा यांनी केले.

संजय चोपडा म्हणाले की १६ वर्षापासून महावीर चषक क्रिकेट स्पर्धेची परंपरा सुरू आहे, ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्वांचेच सहकार्य लाभत असते, त्यामुळे या स्पर्धेचे कौतुक होते, या स्पर्धेच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात, याचबरोबर भगवान महावीर चषक परिवाराशी अनेक युवक जोडले जातात या माध्यमातून समाजाप्रती चांगले काम उभे राहत असते असे ते म्हणाले,

सूत्रसंचालन उद्धव काळापहाड यांनी केले. राजेंद्र गांधी यांनी आभार मानले.

# ५० साधु–साध्वीजींच्या सानिध्यात ३० एप्रिलला आनंदधाम येथे शेकडो वर्षीतप पारणा महोत्सव



नगर – तप, हा साधनेचा अविभाज्य भाग आहे तर दान, हा मानव संस्कृती चा गाभा आहे. साधना आणि संस्कृती मुळे धर्म परंपरेची जोपासना होते. अत्यंत प्राचीनतम असलेल्या जैन दर्शन मध्ये प्रथम तीर्थंकर ऋषभदेव भगवान पासून प्रचलित, सुदीर्घ परंपरा प्राप्त वर्षीतप व श्रेयांसकुमार, यांच्या पासून प्रारंभ झालेली सुपात्र दान, अशा तप व दान मुळे महत्व प्राप्त झालेला अक्षय तृतीया हा दिवस पर्व दिवस म्हणून साजरा केला जातो. कारण दान व तप हे मोक्ष प्राप्ती साठी प्रमुख मार्ग सांगितले आहेत.

राष्ट्रसंत आचार्य सम्राट श्री आनंदऋषिजी म सा यांच्यापासून आनंदधाम च्या पवित्र धरा वर अक्षय तृतीयेच्या दिवशी वर्षीतप पारणा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. या वर्षी ३० एप्रिल रोजी महाराष्ट्र प्रवर्तक श्री कुंदनऋषिजी म सा, प्रबुद्ध विचारक श्री आदर्शऋषिजी म सा, संस्कार दिवाकर श्री आलोकऋषिजी म सा इत्यादी ५० साधु – साध्वीजींच्या पावन सानिध्यात जवळ – जवळ १०० तपस्वींचा पारणा महोत्सव होणार आहे. सादगीमय वातावरणात, आडम्बर, प्रदर्शन रहित कार्यक्रम संपन्न करण्याची आनंदधाम ची विशेषता आहे. तसेच पहलगाम येथिल दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर हा कार्यक्रम शांततेत होणार आहेत.

११ साध्वीजीना उपवास, एकासना इत्यादि चे वर्षितप पारणा आहेत.

सकाळी ८ वाजता भक्त निवास येथे वर्षीतप आराधकांचे स्वागत करुन आनंदधाम येथे धर्मसभेत साधु – साध्वीजींचे प्रवचन, तपस्वींचा सत्कार, भावा व नंतर पारणा कार्यक्रम होईल.

श्रावक – श्राविकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून गुरु दर्शन, प्रवचन चा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री वर्धमान स्था. जैन श्रावक संघ, श्री तिलोकरत्न जैन धार्मिक परीक्षा बोर्ड व जैन कॉन्फ्रेन्स चतुर्थ झोन प्रांतीय महिला शाखा यांच्या वतीने करण्यात आले आहे.



तपोवन रोडवरील श्री स्वामी समर्थ केंद्रात पुण्यतिथी सप्ताहाची सांगता महाआरती होऊन महाप्रसादाने करण्यात आली. यावेळी ज्येष्ठ सेवेकरी श्री. एकनाथ व सौ. कौशल्या खिलारी यांचे हस्ते आरती करण्यात आली. भाविक उपस्थित होते. (छाया – विजय मते)

# तपोवन रोडला श्री स्वामी समर्थ केंद्रात पुण्यतिथीला भाविकांची गर्दी

नगर – अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठाचे दिंडोरी प्रणित सावेडी उपनगरात तपोवन रोडवरील श्री स्वामी समर्थ केंद्रात पुण्यतिथी उत्सवाची सांगता उत्साहात, भक्तिमय वातावरणात भाविकांच्या उपस्थितीत महाआरती होऊन महाप्रसादाने झाली.

नाशिक जिल्ह्यातील श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरचे दिंडोरी प्रणित श्री स्वामी समर्थ सेवा अध्यात्मिक विकास व बाल संस्कार केंद्र तपोवन येथे स्थापन झाले असून दरवर्षीप्रमाणे श्री स्वामी समर्थ महाराजांची पुण्यतिथी उत्सवानिमित्त अखंड नाम, जप, यज्ञ सप्ताहाचे आयोजन केंद्राच्या वतीने करण्यात आले होते.

या सप्ताह मध्ये केंद्राचे सर्व सेवेकरी पुण्यतिथी निमित्त एकत्रितपणे येऊन सेवेचे व्रत जोपासले होते. पहाटे महाअभिषेक, सकाळी औदुंबर प्रदक्षिणा, भूपाळी आरती, पारायण सोहळा, नैवेद्य आरती असे कार्यक्रम पार पडले. सामूहिक श्री. गुरुचरित्र वाचन नित्यस्वाहाकार मध्ये १७४ महिलांनी सहभाग घेतला होता.

सप्ताहाची सांगता श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी ला उत्साहात झाली. यावेळी नगरसेवक सुनील त्रिंबके यांनी उपस्थित राहुन या केंद्राने सुरु केलेल्या बालसंस्कार वर्गामुळे मुला मुलींवर होणारे आध्यात्मिक संस्कार भविष्यात उपयोगी पडतील. धार्मिक कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सर्व सेवेकरी एकनिष्ठेने करतात हे कौतुकास्पद आहे. असे सांगितले. दुपारी नैवेद्य आरती झाल्यानंतर भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. ज्येष्ठ सेवेकरी श्री व सौ. एकनाथ कौशल्या खिलारी यांचे हस्ते स्वामी समर्थ यांची आरती करण्यात आली. तपोवन रोडवरील हे स्वामी समर्थ केंद्र अहिल्यानगर मध्ये एक नंबरचे आध्यात्मिक कार्य करत आहे त्यामुळे भाविकांची मोठी गर्दी येथे होत असल्याचे सांगण्यात आले.

# गृहिणी

## आरोग्य

### योग्य वेळेस प्या लिंबूपाणी

उन्हाळ्यात लिंबू पाणी पिणे शरीरासाठी फायदेशीर असते. परंतु लिंबू पाण्यापासून तुम्हाला सर्वाधिक फायदे मिळवायचे असतील तर हे पेय योग्य वेळेस पिणे आवश्यक आहे. सकाळी रिकाम्या पोटी लिंबू पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर मानले जाते. लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी असते ज्यामुळे पचनशक्ती सुधारते. शरीराला ऊर्जा मिळते. शरीर डिटॉक्स होते आणि रोगप्रतिकारकशक्ती देखील वाढते. यात चवीसाठी थोडेसे मध आणि काळे मीठ मिक्स करावे. लिंबूपाणी तयार झाल्यावर लवकर प्यावे. लिंबू पाणी हे सर्वात स्वस्त आणि मस्त डिटॉक्स वॉटर मानले जाते.

## पाककला

### शिमला मिर्च आलू फ्रॉड

**साहित्य :** ३ सिमला मिरची, ३ बटाटे, २ टोमॅटो, ३ मिरच्या, १ सर्व्हिंग स्पून तेल घाला, हिंग, १ टिस्पून जिरे, १ टिस्पून मोहरी आणि ३ हिरवी मिरची, ६, ७ कढीपत्ता, १/२ टिस्पून हळ्द, १ टिस्पून धणेपूड, मीठ चवीनुसार, १/२ टिस्पून किचन किंग गरम मसाला

**कृती :** प्रथम तीन सिमला मिरची, तीन बटाटे, दोन टोमॅटो, तीन मिरच्या चिरून घ्या. नंतर तळण्याचे पॅन गरम करा आणि एक सर्व्हिंग स्पून तेल घाला, नंतर त्यात हिंग, जिरे, मोहरी आणि हिरवी मिरची घाला, कढीपत्ता घाला नंतर हळद आणि धणेपूड घाला, नीट ढवळून घ्या. नंतर चिरलेल्या भाज्या घाला आणि मीठ टाकावे, चांगले मिक्स करा. नंतर किचन - किंग गरम मसाला टाका आणि एकदा ढवळून घ्या. आणि झाकण लावा. मंद आचेवर शिजवा. चार मिनिटांनंतर, ढवळून पुन्हा पाच मिनिटे मंद आचेवर शिजवा. नंतर झाकण उघडा आणि दोन मिनिटे मोकळ्या स्थितीत ठेवा आणि गॅस बंद करा आणि करी, पराठा बरोबर सर्व्ह करा.

## सौंदर्य

### केस बांधून झोपावे का?

जर केस लांब असतील आणि मोकळे करुन झोपत असाल तर केस गुंतण्याचा, तुटण्याचा आणि खरखरीत होण्याचा धोका होऊ शकतो. केस गळती आणि केस तुटण्याच्या समस्येने महिला ग्रस्त असतात. केस बांधून झोपण्याचे आणि केस मोकळे ठेवून झोपण्याचे दोन्हींचे वेगवेगळे फायदे आहेत. जर केस फार लांब नसतील तर ते मोकळे सोडूनच झोपू शकता जर केस लांब असतील तर ते बांधूनच झोपावे. परंतु केस मोकळे सोडून झोपताना कॉटनऐवजी सिल्कच्या उशीचा वापर करावा.

## सल्ला

तमालपत्राची चव वाढविण्यासोबतच ते झुरळांना पळवून लावण्यासाठी देखील उपयुक्त आहे. त्याच्या उग्र वासाने झुरळे पळून जातात.

## वास्तू

काळ्या मुंग्या शनीदेवाचे प्रतीक मानल्या जातात. असे मानले जाते की जेव्हा आपण मुंग्यांना पीठ भरवतो तेव्हा ते एक प्रकारची सेवा असते. मुग्यांना पीठ खायला दिल्याने आपल्या घरात पसरलेली नकारात्मक ऊर्जा दूर होते. मुग्यांना नियमीतपणे पीठ खायला दिल्याने अडकलेली कामे मार्गी लागतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५

**अक्षय्य तृतीया, श्री बसवेश्वर जयंती, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, वैशाख शुक्लपक्ष, रोहिणी १६|१८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील. राजकीय कार्ये पूर्ण होतील. संततीसौख्य लाभेल. दिवस आनंदात जाईल.

**वृषभ** : साहित्यिकांच्या लेखन कार्यातील अडचणी दूर होतील. अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण होण्यासाठी चांगला काळ आहे. हितशत्रूंवर मात कराल. स्त्री पक्षाचा आधार मिळेल.

**मिथुन** : आरोग्य बरे राहील. सर्जनशील व्यक्तींना वाव मिळेल. मागील उधारी उसनवारी वसूल होईल. राजकीय व्यक्तींची कार्ये पूर्ण होतील.

**कर्क** : मानसिक स्थिरता वाढेल. मान-सन्मानात वाढ होईल. पुर्वसुकृत फळास येवून अर्धवट राहिलेली सरकारी कामे पूर्ण होतील. आरोग्य उत्तम राहील.

**सिंह** : ध्येय साध्य करण्यात पूर्ण यश मिळेल. जुन्या मित्र-मैत्रिणींची भेट होईल. किरकोळ वाहन अपघात होण्याचे योग आहेत. महत्वपूर्ण कामे यशस्वीरित्या पूर्ण होतील.

**कन्या** : आरोग्य उत्तम राहील. काहीकाळ कठीण गेल्यानंतर यश मिळेल. नोकरीत चांगला काळ राहिल. उत्तम खरेदी कराल. विद्यार्थी करियरबद्दल हट्ट धरू शकतात.

**तूळ** : पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजना प्रत्यक्षात येतील. नोकरदार व्यक्तींसाठी स्थिती अनुकूल राहील.

**वृश्चिक** : आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वोत्तम आहे. आर्थिक नुकसानीची शक्यता आहे.

**धनु** : दिवस संमिश्र जाईल. अडीअडचणीत असलेल्यांना मदत केल्यास तुमचे काम लवकर पूर्ण होईल. कलाक्षेत्रात यश मिळेल.

**मकर** : जर आपणास आपले निवासस्थान बदलण्याची इच्छा असेल तर आजचा दिवस उत्तम आहे. आपल्यासाठी अनुकूल वेळ आहे व महत्त्वाच्या कार्यांमध्ये यश मिळेल.

**कुंभ** : व्यापाऱ्यांसाठी परिस्थिती साधारण. जोडीदाराशी वादविवाद होतील.भातृचिंता सतावेल. ज्येष्ठ अधिकाऱ्यांकडून आपणास समर्थन मिळेल.

**मीन** : आपल्या कार्यातील अडचणी दूर होतील. अधिकाऱ्यांकडून कामे करवू शकाल. महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यासाठी दिवस चांगला नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**


## शब्दगंध क्र. ७१६६ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) अरिष्ट; आपत्ती; बलामत ५) राग; त्वेष; खोपटी ७) जीवित; आयुष्य; पाणी ८) विष्णूचे एक नाव १०) अमर्यादित; असंख्य; अगणित ११) टापटीप; साफसूफ १४) कालवा; नहर १५) पेटी; ट्रंक १७) वाटोळा; गरगरीत १८) समुद्र; रत्नाकार १९) उतार; उताराची जागा २१) जिचा पती जिवंत आहे अशी स्त्री २२) नाजूक; सुकुमार; कोमल

**उभे शब्द :-** १) हनुमानाने या वनस्पतीसाठी चक्क द्रोणागिरी पर्वतच उचलून आणला २) मिठी; आलिंगन ३) दहा क्विंटल किंवा एक हजार किलो वजनाचे माप ४) पाच बोटांपैकी करंगळीजवळचे बोट ५) आंब्याचे बी; बाठा ६) एक चर्मवाद्य; मृदंग; पखवाज ९) रात्र (उर्दू) १०) शर्त; पण १२) मेल; पोस्ट; डाक १३) बळ; दम; भार; निकड; तगादा १५) मराठी कॉम्प्युटर १६) लांब अंतरावर १७) गायीचे दूध १८) एक पक्षी; भारद्वाज १९) गरम; तापलेले २०) दुष्मनी; शत्रुत्व

### शब्दगंध क्र. ७१६५ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : दिवा जळत असताना त्याला तूप लागते, तो विझल्यानंतर तूप घालणे व्यर्थ आहे तसेच वेळेवर माणसाचा आदर करा वेळ गेल्यावर पश्चात्ताप करणे व्यर्थ आहे.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## डॉक्टरांकडे गेल्यावर ते म्हणतात या गोळ्यांनी नाही बरे वाटले तर पुढच्या वेळेस या गोळ्या बदलून देतो मग ते पहिल्या वेळेसच त्या गोळ्या का देत नाही?

प्रत्येकाला आवश्यक असलेली औषधे आणि त्यांचे प्रमाण ही व्यक्तीपरत्वे वेगवेगळी असू शकतात तसेच प्रत्येक रुग्णाला त्रास व त्याचे दृष्य परिणाम हे वेगवेगळे असतात. तसेच व्यक्ती तश्या प्रकृती आणि औषधांचे परिणाम ही व्यक्तीपरत्वे वेगवेगळे असतात. त्यामुळे त्यानुसार औषधोपचार केले जातात.

तसेच आधी प्राथमिक नंतर दुय्यम किंवा त्यापुढील असेच उपचार करायचे असल्याने ते तसेच केले जातात. उदाहरणादाखल ... एखाद्याला डोकेदुखी असेल तर नुसती झोप काढली किंवा आराम केला तरीही त्याचा त्रास कमी होईल ...

नसल्यास डोके दाबल्यास / डोक्याचा मसाज केल्यास किंवा चहा - कॉफी घेतल्यास ही त्रास कमी होईल.

त्याहीपुढे त्रास कमी न झाल्यास मग क्रोसीन व पित्तनाशक सारखी सर्वसामान्यपणे देण्यात येणारी औषधे .... मग पुढे ... याप्रकारे उपाय केला जातो. सर्वात आधी रुग्णाने दिलेल्या माहीतीनुसार व रेग्युलर तपासणीने औषधोपचार केले जातात. उदा डोकेदुखी ही पित्त झालय किंवा झोप झाली नाही यामुळे होतय असे लक्षात आल्यास त्याप्रमाणे औषधोपचार ... मग त्यानेही नाही झाल्यास परत खोलात जावून अधिक माहीती व अधिक तपासण्या .... त्यानुसार रक्त लघवी, डोळे तपासणी, एक्सरे, सीटी स्कॅन किंवा एम आर आय अश्या टप्प्याटप्प्याने तपासण्या व औषधोपचार केले जातात. जर प्राथमिक स्वरुपाचा त्रास असल्यास तो थोडक्यात कमी होईल. इंजेक्शन किंवा गोळ्या (औषधे) देण्याचा निर्णय रुग्णाच्या आजाराच्या स्वरूपावर, गंभीरतेवर आणि औषधाच्या आवश्यकतेवर अवलंबून असतो. यासाठी डॉक्टरांचे वैद्यकीय ज्ञान आणि अनुभव महत्त्वाचे असते. डॉक्टर देव नाहीत. म्हणजे अंतर्ज्ञानी नव्हेत. रोगी जी लक्षणं सांगतो किंवा रोग्यामधे जी लक्षणं आढळतात त्या अनुषंगाने निदान व उपचार सुरु होतात. बरेचदा अनेक रोगांची प्राथमिक लक्षणं सारखीच असतात. उदाहरणार्थ ताप - साधा ताप, मलेरिया, टॉयफाईड, कोव्हिड इतर कुठल्याही आजाराचा असु शकतो. प्राथमिक उपचारांना मिळणारा प्रतिसाद पाहुनच उपचार करावे लागतात. याशिवाय रोग्याची स्वतःची प्रतिसाद क्षमता आणि मानसिकता यावरही उपचार अवलंबुन असतात.

## विचार

एका मोठ्या तळ्यात दोन बेडूक रहात असत. एके वर्षी उन्हाळा इतका कडक पडला की, त्यामुळे त्या तळ्यातले सगळे पाणी आटून गेले. मग ते दोघे बेडूक दुसरीकडे कोठे तरी पाणी मिळेल तर पहावे, म्हणून निघाले.

जाता जाता त्यास एक मोठी खोल अशी विहीर लागली तीत पाणी भरपूर होते. ते पाहून, एक बेडूक दुसऱ्यास म्हणतो, 'गड्या'

आपणास राहण्यास ही जागा फार चांगली आहे, तर चल आपण खाली उड्या टाकू.' दुसरा बेडूक शहाणा होता, तो म्हणाला, 'अरे, तू म्हणतोस ते खरे, पण आपण एकदा या विहीरीत उतरल्यावर, त्यातील पाणी आटले, तर पुन्हा आपणास वर कसे येता येईल?'

तात्पर्य : पूर्ण विचार केल्याशिवाय कोणतीही गोष्ट करू नये.

# रहमते दर्शन (भाग - १)



हम आश्रम में महाराज जी के पास गये तो सेवादारों ने हमें अन्दर जाने से रोक दिया । इतनी देर में महाराज जी एक विदेशी को छोड़ने बाहर आये। हमें देखकर महाराज जी ने सेवादारों को आदेश दिया कि महेंद्रसिंह (मेरे पति) को अन्दर भेज दो। हम अन्दर चले गये, तो मेरे पति महेंद्रसिंह, महाराज जी के चरणों में गिर पड़े और आँसुओं से उनके चरण धो दिये। महाराज जी ने पूछा, बोलो क्या चाहते हो आदमी, पैसे या कुछ और? मेरे पतिदेव ने कहा, महाराज जी हमें कुछ नहीं चाहिये। हमें केवल आप चाहिये। महाराज जी ने कहा, अब चिंता न करो, जो होना था हो गया। अब और कुछ नहीं होगा । महाराज जी ने बहुत सारा प्रसाद देकर हमें विदा किया ।

कुछ दिन पश्चात ही यह गम्भीर मामला इस तरह रफा-दफा हो गया, जैसे कुछ हुआ ही न हो।

### वे हमारे सब कुछ थे

यह सब उनकी कृपा से ही सम्भव हो सका। इस मामले में महाराज जी ने क़दम क़दम पर हमारी सहायता की। घर से कोर्ट तक जाते हुए हमें ख़तरा बना रहता था। परन्तु वे किसी न किसी रूप में हमारे अंग-संग रहते थे। एक बार तो मुझे चार-पाँच आदमियों ने कोर्ट जाते हुए घेर लिया, परन्तु उसी समय महाराज जी ने प्रकट होकर मेरी सहायता की।

### वे सब पर दया करते थे

महाराज कृपालसिंह जी ने विलिंडन अस्पताल में चोला छोड़ा। उस समय सरदार बेअंतसिंह के साथ मैं भी वहाँ मौजूद था। हमने महाराज जी के कपड़े बदले और सावन आश्रम ले आये। जब महाराज जी के पार्थिव शरीर का संस्कार करने की बात चली तो सभी प्रबन्धकर्त्ताओं ने निगम बोध घाट पर जाने की सलाह की । रेडियो से भी प्रसारित करा दिया गया कि महाराज जी का अंतिम संस्कार निगम बोध घाट पर ही होगा। तभी मुझे महाराज कृपालसिंह जी के साक्षात दर्शन हुए जो बार-बार संत दर्शनसिंह जी महाराज में तब्दील जाते थे। उन्होंने कहा, संस्कार निगम बोध घाट पर नहीं, बल्कि पम्बारी रोड़ (जहाँ अब कृपाल बाग़ है) पर होगा । मैंने सभी प्रबन्धकर्त्ताओं को फ़ौरन महाराज जी का यह आदेश सुनाया, परन्तु कोई भी इस बात को मानने के लिए राज़ी नहीं हुआ । मैंने कहा, जिसने महाराज जी के बाद रूहानियत का काम करना है, आप उन्हीं से पूछ लो। उन्होंने कहा, हमने नहीं पूछना है। मैंने कहा, महाराज जी के सम्बन्धी कहाँ हैं, उनसे पूछ लेते हैं। थोड़ी देर में मुझे दर्शनसिंह जी मिल गये । जब मैंने महाराज जी का आदेश उन्हें सुनाया, तो उन्होंने कहा, चिंता न करो, महाराज जी के आदेशानुसार ही संस्कार के कार्य होंगे, और यही हुआ कि संत कृपालसिंह जी महाराज का अन्तिम संस्कार कृपाल

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

इस चक्र को बैलेंस करने के लिए सन्दल वुड आयल (Sandal Wood Oil), य्लांग य्लांग तेल (Ylang Ylang Oil), कलेरी सेग आयल (Clary Sage Oil), जस्मीन आयल (Jasmine Oil), ऑरेंज आयल (Orange Oil), बेरिगामोट आयल (Bergamot Oil), रोजेवूड आयल (Rosewood Oil) से मालिश करनी चाहिए। ये आयल ऑन लाइन (Online) मिल जाते हैं। पॉजिटिव स्वीकृतियां (Positive ffirmations)

सदा मन में साकारात्मक विचार खुद से बोलते रहने से यह चक्र जागृत होता है। जैसे मेरी भावनाएं सदा दूसरो के प्रति श्रेष्ट रहती हैं, मैं रचनात्मक कार्यों में वयस्त रहता हूं, मेरा खानपान सदा सात्विक है, मैं पवित्र आत्मा हूं। ऐसे और भी साकारात्मक विचार अपने मन में रिपीट करते रहें।

मुद्रा - राजयोग या साधना का अभ्यास करते समय हाथों को अपनी गोद में रखें। बायें हाथ की हथेली पर दाये हाथ की हथेली को रखें।

### स्वाधिष्ठान चक्र

हथेलियों के मुख आकाश की तरफ होने चाहिए।

एक्युप्रेशर - सबसे छोटी उंगली के पहले जोड़ से पहले उसका एक्युप्रेशर पाइंट होता है। ये दोनों हाथों की छोटी उगलियों पर होता है। हर रोज ५-१० मिनट एक्युप्रेशर ले सकते हैं।

रंग - इस चक्र का रंग संतरी होता है। संतरी रंग के कपड़े पहनें। संतरी रंग की बोतल में पानी डालकर धूप में रखे और पानी पीएं। अपने घर में संतरी रंग की चीजें और पर्दे लगाएं। उगते सूर्य और डूबते सूर्य को देखने से भी यह चक्र जागृत हो जाता है। आप डूबते या उगते सूर्य को कल्पना में भी देख सकते हैं। नर्तक के पोज को मन में देखते रहने से भी यह चक्र जागता है। संतरा, शहद, नारंगी, खरबूजा व बादाम खाने से भी यह चक्र संतुलित होता है।

एक्सरसाइज - वज्र आसन, फ्रॉग पोज (Frog Pose), गारलैंड पोज (Garland Pose), वारियर पोज (Warrior Pose), कोबरस पोज (Cobrs Pose), बो पोज (Bow Pose), इन का शरीर से अभ्यास करें या इन्हें मन में देखते रहें। इन को मन में देखने से यह चक्र संतुलित हो जाता है। ये सभी आसनों वाली बुक्स में मिल जाते हैं या गूगल पर मिल जाते हैं।

खानपान - गुलाबी रंग वाले फल फ्रूट जैसे संतरा, मक्का की रोटी आदि खाएं।

संकल्प - जीभ को स्वाद लेने से रोक नहीं सकते, दिल को धड़कने से नहीं रोक सकते, नसों में बहते खून को रोक नहीं सकते, ऐसे दिमाग में आने वाले विचारो को रोक नहीं सकते, परन्तु इन्हें बदल सकते हैं। बुरे विचार की बजाए अच्छा सोच सकते हैं। अच्छा सोचने से यह चक्र अच्छे निर्माण करता रहता है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बंड्या : माझी बायको हरवली आहे...

कर्मचारी : हे पोस्ट ऑफीस आहे पोलिस स्टेशन नाही तक्रार पोलिसांकडे द्या...

बंड्या : च्यायला, आनंदाच्या भरात कुठे जावे तेच कळत नाही...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ जगातील सर्वात उंच वाळवंट कोणते?

- सहारा वाळवंट

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

त्यामुळेच आई चिडचिड करीत असताना, रडत असताना स्तनपान करीत असेल, त्या वेळी बाळ अस्वस्थ होऊन दूध घेत नाही, असा अनुभव बऱ्याच वेळेला येतो. याकरिता स्त्रीला कोणत्याही प्रकारचा मानसिक ताण-तणाव येणार नाही, याची काळजी घ्यावी.

**स्तन्यवृद्धीसाठी उपाययोजना :**

१) स्तन्याची उत्पत्ती चांगली व भरपूर व्हावी, म्हणून दुर्वांकुर शतावरीकल्प' एक ग्लासभर दुधातून दोन-दोन चमचे दोन वेळा द्यावा.

२) अश्वगंधा, मुसळी ही द्रव्ये व कार्पास बीज, आळीव, खसखस, गोडांबी, चारोळी यांच्यापासून बनविलेल्या खिरी भरपूर दूध, केशर घालून सेवन कराव्यात.

३) स्तन्यशद्धीकरिता आहारामध्ये ओली हळद, हिंग, जिरे यांचा फोडणीसाठी वापर करावा. तसेच मधुरगुणात्मक स्निग्ध भोजन करावे व

### स्तनपानाचे महत्त्व

त्यानंतर द्राक्षासव दोन चमचे घ्यावे.

४) एक लिटर स्वच्छ पाण्यात रात्री ५० ग्रॅम बाळतशेपा उकळून गाळून घ्यावे व त्यात थोडे तूप घालून प्यावे, त्यामुळे स्तन्य (दूध) वाढविण्यास मदत होते.

५) बाळाला अंगावर पाजण्यापूर्वी थोडेसे फुटाणे, शेंगदाणे किंवा कपभर कोमट दूध अथवा प्यावे. याने दूध सुटण्यास मदत होते.

६) सकाळी व संध्याकाळी आळिवाची खीर किंवा आळिवाचा लाडू खावा.

७) पिंपळी, संठ, हिरडा, विदारी कंद चूर्ण एक चमचा घेऊन, त्यात अर्धा चमचा गूळ व चमचा तूप हे मिश्रण दुधाबरोबर घ्यावे. याने स्तन्य वाढण्यास मदत होते. मेथीची पातळ भाजी, तसेच खसखशीची आमटी, ओल्या नारळाची आमटी जेवणामध्ये वापरावी.

९) सकाळ-संध्याकाळ लेपटॅडीन गोळी डॉक्टरांच्या सल्ल्याने घ्यावी.

१०) स्तनांवर हलक्या हाताने नियमित मालीश करावे. याने स्तन्यवृद्धीस मदत होते, तसेच स्तनांमध्ये दुधाच्या गाठीदेखील राहत नाहीत.

११) आहारामध्ये घरचे बनविलेले लोणी, गोड ताक, तूप यांचा वापर करावा.

१२) भरपूर विश्रांती घ्यावी. मनाला क्लेशदायक विचारांपासून दूर ठेवावे व रोज रात्री नियमितपणे लवकर झोपावे.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



# चटपटीत आणि कुरकुरीत कॉर्न

झटपट रेसिपी

दोस्तांनो, येता-जाता तोंडात टाकण्यासाठी काही तरी लागतं. संध्याकाळी एखादा कुरकुरीत खमंग पदार्थ चहाची लज्जत वाढवतो. अशा वेळी तुम्ही झटपट तयार होणारे क्रिस्पी कॉर्न बनवू शकता. चला तर, करु या.

**सामग्री:** पाणी, एक कप कॉर्न, लाल तिखट, प्रत्येकी एक चमचा जिरे पूड, अर्धा चमचा चाट मसाला, मीठ, दोन ते तीन चमचे कॉर्न फ्लोर, तेल, चिरलेला कांदा आणि कोथिंबिर

**कृती:** एका भांड्यात पाणी उकळून घ्या. त्यात कॉर्न घालून पाच मिनिटे शिजवून घ्या. पाणी काढून कॉर्न थंड करायला ठेवा. थंड झाल्यावर कॉर्नमध्ये कॉर्न फ्लोर आणि मीठ घाला. नीट मिक्स करून घ्या. आता कढईत तेल तापवा. तेल गरम झाल्यावर त्यात कॉर्न घाला. सोनेरी रंगावर तळून घ्या. भांड्यात काढून घ्या. दुसऱ्या भांड्यात लाल तिखट, जिरेपूड, चाट मसाला आणि थोडं मीठ एकत्र करा. तळलेल्या कॉर्नवर आपल्या चवीनुसार हा मसाला घाला. त्यावर चिरलेला कांदा आणि कोथिंबिर घालून हलवून घ्या. थोडं लिंबू पिळा.

# युवा मानस

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

# समजूतदार होणे गरजेचे

मॅच मेकिंग

मी एका मुलाच्या प्रेमात आहे. गेल्या आठ वर्षांपासून आम्ही एकमेकांना ओळखतो. मला तो आवडत असला तरी तो मात्र मला फक्त चांगली मैत्रीण मानतो. मी अनेकदा त्याच्याकडे प्रेमाची कबुली दिली. समजावण्याचा प्रयत्न केला. पण तो माझ्यावर प्रेम करत नाही. मी त्याला खूप मिस करते. माझ्या मनातून त्याचे विचार जात नाहीत. मी त्याला मेसेज करत असते. सारखी त्याच्या मागे लागते. हे माझ्या स्वत्त्वाच्या विरोधात आहे. पण त्याच्यासाठी मी ही तडजोड करायला तयार आहे. पण यामुळे माझ्या आयुष्यातली भावनिक गुंतागुंत खूप वाढली आहे. मी काय करू?



**उत्तर :** तुझ्यापुढे सध्या भावनिक आव्हान आहे. पण आपली मतं दुसऱ्यावर लादता येत नाही. आपलं प्रेम समोरच्यावर जबरदस्तीने लादता येत नाही. तू या मुलाला समजावण्याचे खूप प्रयत्न केले. पण काहीच साधलं नाही. मला वाटतं की तुला स्वत:विषयी प्रेम वाटत नाही. तसंच तू अजूनही स्वत:ला स्वीकारलेलं नाही. त्यामुळे सर्वात आधी तू स्वत:चा विचार कर. तू भावनिकदृष्ट्या समजूतदार होणं गरजेचं आहे. दुसरं म्हणजे या भावनिक गुंतागुंतीतून तुला समुपदेशक बाहेर काढू शकेल. त्याची मदत घे. तुला आयुष्यात नेमकं काय हवं आहे हे आधी समजून घे. या मुलासोबत तुला दीर्घकाळ नात्यात राहायची इच्छा आहे का, तू त्याचा नकार पचवू शकत नाहीस, हे जाणून घे. तुला नक्की मार्ग मिळेल.

# भाजी विकणारा बनला डीएसपी!

अचिव्हर



**कठोर परिश्रम आणि जिद्दीने आयुष्य बदलता येते. त्यासाठी महाराष्ट्राचे आयपीएस अधिकारी नितीन बगाटे यांचे उदाहरण समर्पक आहे. पोलिस अधीक्षक कार्यालयाबाहेर भाजी विकणाऱ्या तरुणाचा त्याच ऑफिसमध्ये पोलिस अधीक्षक पदापर्यंत पोहोचण्याचा हा प्रवास प्रेरणादायी आहे...**

बगाटे यांचा जन्म गरीब कुटुंबात झाला. गरीबीमुळे नितीनने आपल्या कुटुंबाला मदत करण्यासाठी गावातील पोलिस अधीक्षक कार्यालयाजवळ भाजीपाला विकण्यास सुरुवात केली. बिकट परिस्थितीतही नितीनने आपले स्वप्न सोडले नाही. कुटुंबाचे भविष्य चांगले घडवणे हे त्याचे ध्येय होते. नितीनने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्याचे ठरवले. हा प्रवास त्याच्यासाठी अजिबात सोपा नव्हता. त्याने अनेक वर्षे कष्ट केले. तो तीनदा मुलाखतीच्या फेरीपर्यंत पोहोचला; पण परीक्षा उत्तीर्ण होऊ शकला नाही. तरीही नितीनने हार मानली नाही.

अपयशातून धडे

अपयशातून शिकून तो प्रयत्न करत राहिला. अखेर मेहनतीचे फळ मिळाले आणि नितीन आयपीएस अधिकारी झाला. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करणाऱ्यांसाठी नितीनने काही महत्त्वाच्या टिप्स शेअर केल्या आहेत. त्याने तीन मुख्य मुद्द्यांवर जोर दिला आहे.

✽ मूलभूत गोष्टींवर लक्ष केंद्रित करा : मूलभूत संकल्पना चांगल्या प्रकारे समजून घ्या आणि मजबूत पाया तयार करा.

✽ चालू घडामोडींवर लक्ष ठेवा: चांगली वर्तमानपत्रे नियमित वाचा आणि देश आणि जगाच्या घडामोडींबाबत अपडेट राहा.

✽ समाज समजून घ्या: समाजाच्या समस्या आणि त्यांचे परिणाम समजून घेण्याचा प्रयत्न करा. नितीनच्या मते, शिस्त आणि सातत्य हा कोणत्याही स्पर्धा परीक्षेतील यशाचा कणा असतो.

## टेक अपडेटस्


### 'सोशल मीडिया'चा नवीन प्लॅटफॉर्म

सर्वांना एकमेकांशी जोडून ठेवण्यासाठी आज सोशल मीडिया आहे. फेसबुक आणि इन्स्टाग्रामने जगाला एकत्र आणले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे तुम्ही जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात राहणाऱ्या लोकांशी संपर्क साधू शकता. मात्र आता एक नवीन अहवाल समोर आला असून त्यानुसार 'एआय' लवकरच लोकांना फेसबुक आणि इन्स्टाग्राम व्यतिरिक्त नवीन सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचा पर्याय देणार असल्याचे स्पष्ट होत आहे. 'द वर्ज' मधील एका अहवालात हे स्पष्टीकरण देताना म्हटले आहे की, ओपन एआय 'एक्स'सारखे सोशल नेटवर्क तयार करण्याच्या योजनेवर काम करत आहे. ओपन एआयने आपल्या ॲपचा प्रोटोटाइप तयार केला असून त्यात 'चॅटजीपीटी'ची क्षमता असेल.



## टेक टॉक

### व्हॉट्सॲपवर टाका मोठा व्हिडीओ



व्हॉट्सॲपवर व्हिडीओ स्टेटसचे तुकडे अपलोड करून तुम्हीही कंटाळले असाल तर आता दिलासा मिळणार आहे. व्हॉट्सॲपने वापरकर्त्यांसाठी एक नवीन आणि उपयुक्त फीचर आणण्याची तयारी केली आहे. त्यामुळे आता स्टेटसमध्ये मोठा व्हिडीओ टाकणे सोपे होणार आहे. आता व्हिडीओची स्थिती एक मिनिटाची नाही तर ९० सेकंदांची राहणार आहे. यापूर्वी तुम्ही एकावेळी फक्त ६० सेकंद पर्यंतचा व्हिडीओ अपलोड करू शकत होता. म्हणजेच आता ही मर्यादा ३० सेकंदांनी वाढवली जाणार आहे. याचा थेट फायदा मोठे व्हिडीओ स्टेटस शेअर करणाऱ्यांना होऊ शकतो. अर्थात सध्या हे फीचर फक्त व्हॉट्सॲप च्या बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. याचा अर्थ असा आहे की ॲपची चाचणी आवृत्ती वापरतात तेच हे फीचर वापरू शकतात. लवकरच हे फीचर सर्व वापरकर्त्यांसाठी जारी केले जाईल. हे नवीन फीचर व्हॉट्सॲप अँड्रॉइड व्हर्जन २.२५.१२.९ मध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे.

# ब्रंचचा आनंद लुटा

फॅशन पॅशन



उन्हाळ्यात मित्रमंडळींसोबत ब्रंचला जाताना आपला फॅशन सेंस अवश्य जपा. तुमच्या ब्रंच सेशनसाठी या काही खास फॅशन टिप्स...

✽ कूल लूक मिळवायचा असेल तर ट्रेंडी टी शर्टवर एखादा ब्लेझर घाला. खूप उकडत असेल तर ब्लेझर काढूनही ठेवता येईल. एसीमध्ये ब्लेझर घाला.

✽ या दिवसात शॉर्टसपेक्षा फॅन्सी किंवा आरामदायी दुसरं काहीच असू शकत नाही. उन्हाळ्यात गारव्याची अनुभूती घ्यायची असेल तर पेस्टल शेड्सच्या शॉर्टस ट्राय करा. कॅमॉफ्लेज रंगही चालून जातील.

✽ कॅज्युअल लूकसाठी लोफर्स कॅरी करा. यामुळे तुम्हाला खूप आरामदायी वाटेल. रस्ट रेड, ऑलिव्ह ग्रीन तसंच पिवळ्या रंगातल्या शेड्स तुमचा लूक खुलवतील.

✽ उन्हाळ्यात गॉगल मस्ट आहे. चेहऱ्याला साजेसा गॉगल घाला. हटके रंगाच्या ऑफ बीट फ्रेम्स निवडताना अजिबात घाबरू नका. ट्रेंडी डिझाइन्सवर भर द्या.

✽ डोक्यावर छानशी टोपी घाला आणि गप्पाटप्पा करत ब्रंचचा आनंद लुटा.

# चला पुरुषवाडीला

भटकंती

निसर्गाची किमया आपल्याला थक्क करते. आपण अनेक नैसर्गिक चमत्कार भान हरपून बघत रहातो. आसपासचा निसर्ग सतत खुणावत असतो. वसंतातल्या कोकीळेच्या कूजनाने कान सुखावतात. प्रत्येक ऋतू निसर्गाचे वेगवेगळे रंग दाखवत असतो. असंच एक दृश्य पुरुषवाडीतही पहायला मिळतं. मे आणि जून महिन्यातल्या रात्री पुरुषवाडी काजव्यांच्या प्रकाशाने उजळून निघालेल्या असतात. हा काजव्यांच्या प्रजननाचा काळ असल्यामुळे इथे काजवा महोत्सवाचं आयोजन केलं जातं. या महोत्सवात सहभागी होणाऱ्यांना काजव्यांचं मनोहारी जग अनुभवायला मिळतं. तुम्हीही काहीतरी वेगळं, भन्नाट करायच्या विचारात असाल



तर पुरुषवाडीची ट्रिप प्लॅन करा.

पुरुषवाडी हे अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातलं छोटंसं गाव. रेल्वे किंवा वाहनाने या ठिकाणी जाता येतं. नाशिकजवळच्या इगतपुरी स्थानकावर उतरून पुरुषवाडीला जाता येईल. नाशिक, पुणे, शिरडीवरूनही पुरुषवाडीला जाण्याची सोय आहे. २५ मे ते २३ जून या काळात इथे काजवा महोत्सवाचं आयोजन केलं जातं. त्यातही जूनच्या पहिल्या दोन आठवड्यांमध्ये लाखोंच्या संख्येने काजवे पहायला मिळतात. तसंच पावसाला नुकतीच सुरूवात होत असल्याने इथला परिसर हिरवागार झालेला असतो. काजवा महोत्सवासोबतच इथे बऱ्याच ॲक्टिव्हिटीज करता येतात. तुम्ही इथे तंबूत राहण्याचा आनंद तुम्ही लुटू शकता. नदीत डुंबू शकता. ग्रामीण जीवन अनुभवू शकता.चुलीवरच्या अस्सल ग्रामीण भोजनाचा आनंद घेऊ शकता. पुरुषवाडीत दोन दिवस अगदी मजेत जातील. त्यामुळे मे-जूनमध्ये छोटी ट्रिप काढायची असेल तर पुरुषवाडीला नक्की जा.

## नवे काय?

### 'व्हिओ'चा सर्वात स्लिम मोबाईल

'व्हिओ टी ४ फाईव्ह जी' लवकरच भारतात लॉन्च होणार आहे. देशात लॉन्च होण्यापूर्वी कंपनीने आगामी हँडसेटची बॅटरी आणि चार्जिंग तपशील उघड केले आहेत. स्मार्टफोनची जाडी आणि वजन याचीही पुष्टी झाली आहे. यात क्वाड-वक्र डिस्प्ले आणि स्नॅपड्रॅगन चिपसेट असल्याचे सांगितले जाते.

फोनची प्रमुख वैशिष्ट्ये तसेच फोनची संभाव्य किंमत आधीच ऑनलाइन उघड झाली आहे. 'व्हिओ टी ४ फाईव्ह जी' मार्चमध्ये भारतात लाँच झालेल्या 'व्हिओ टी ४ एक्स फाईव्ह जी' सह-अस्तित्वात असण्याची अपेक्षा आहे. कंपनीने एक्स-पोस्टमध्ये पुष्टी केली आहे की 'व्हिओ टी ४ फाईव्ह जी' ७,३०० एमएच बॅटरी पॅक करेल. फोन ब्लूव्होल्ट बॅटरी एनोड मटेरियल आणि थर्ड-जनरेशन सिलिकॉन वापरेल. हा फोन त्याच्या मागील मॉडेलच्या तुलनेत १५.७ टक्के ऊर्जा घनता सुधारेल असे म्हटले जाते. कंपनीने पुढे दावा केला की, फोनची बॅटरी कार्बन नॅनोट्यूब कंडक्शन, इलेक्ट्रोड रीशेपिंग आणि नॅनो केज स्ट्रक्चर तंत्रज्ञानाचा वापर करेल. ते वेळेनुसार बॅटरीचे आरोग्य राखण्यास मदत करते.




हा फोन फ्लॅशचार्ज तसेच रिव्हर्स आणि बायपास चार्जिंगला सपोर्ट करेल. बायपास चार्जिंग फोनला बॅटरी बायपास करण्यास आणि चार्जरमधून थेट पॉवर वापरण्यास सक्षम करेल. 'व्हिओ' च्या मते, हा फोन देशातील सर्वात पातळ स्मार्टफोन असेल. आधी उल्लेख केल्याप्रमाणे त्यात ७,३००एमएच बॅटरी असेल. व्हिओ टी ४ फाईव्ह जी' ची एमरल्ड ब्लाझे आवृत्ती ७.८९ एमएम जाडी आणि १९९ ग्रॅम वजनाची असेल. फोन फँटम ग्रे शेडमध्ये येण्याची अपेक्षा आहे. याची किंमत २०,००० ते २५,००० रुपयांदरम्यान असण्याची शक्यता आहे.

# ट्रेकिंगसाठी तयार?

स्टे फिट



दोस्तांनो, ट्रेकला जायचं तर फिटनेस हवा. चलता है... हा ॲटिट्यूड अशावेळी उपयोगाचा नाही. फक्त जास्त उंचीवरच्या, कठीण ट्रेक्ससाठी तयारी करून भागत नाही. सोपे आणि साधे ट्रेक्स आणि ट्रेल्सही आपल्या फिटनेसची परीक्षा बघत असतात. त्यामुळे ट्रेक कोणताही असला तरी तंदुरूस्ती राखणं गरजेचं असतं. यासाठी अगदी साधे व्यायाम करता येतील.✽ धावण्याला परिपूर्ण व्यायाम म्हटलं जातं. संपूर्ण शरीराला याचे लाभ होतात. हा कार्डिओ व्यायामप्रकार आहे. यामुळे तुमचं शरीर हायकिंगसाठी तयार होतं. स्नायू बळकट होतात. स्टॅमिना वाढतो.

✽ स्क्वॉट्समुळे पायांची क्षमता वाढते. ट्रेकिंग करायचं तर पाय बळकट हवे. ही बळकटी स्क्वॉट्समुळे मिळते. स्क्वॉट्सचे अनेक प्रकार आहेत. त्यांचं मिश्रण करून तुम्ही पायांना शक्ती देऊ शकता. स्क्वॉट्समुळे हृदय बळकट होतं. रक्तदाब नियंत्रणात रहातो आणि रक्तातल्या साखरेचं प्रमाणही वाढत नाही.

✽ स्नायूंना बळकटी मिळवून देण्यासाठी लंजेस करा. फॉरवर्ड आणि बॅकवर्ड लंजेसच्या मिश्रणातून पायांचे स्नायू बळकट होतात. इतकंच नाही तर वेड्यावाकड्या वळणांवर शरीराचा समतोल साधणंही यामुळे शक्य होतं.

✽ लेग लिफ्ट्समुळे पायांचे स्नायू ताणले जातात. लवचिकता वाढते. या व्यायामामुळे चालताना किंवा चढण्यामुळे येणारा अतिरिक्त ताण झेलण्यासाठी पाय सक्षम होतात.

✽ नवख्या ट्रेकर्सनी जिने चढण्यापासून व्यायामाला सुरूवात करावी. हा अगदी साधा आणि कुठेही करता येण्यासारखा व्यायाम आहे. जिने चढल्याने जॉगिंगपेक्षाही जास्त कॅलरी खर्च होतात. हृदय, मज्जासंस्थेचं आरोग्य सुधारतं.

# लॅपटॉप स्लो झालाय?

स्टडी टॉक



अनेकजण ऑफिसच्या कामासाठी लॅपटॉप वापरतात. मात्र लॅपटॉपच्या स्लो स्पीडमुळे त्रस्त असणाऱ्यांचे प्रमाणही बरेच मोठे आहे. म्हणजेच लॅपटॉपवर गेम खेळणाऱ्यांपासून ऑफिसची कामे करणाऱ्यांपर्यंत लोक लॅपटॉपच्या मंदगतीने हैराण झाले आहेत. पण चांगली बातमी अशी आहे की, काही सोप्या आणि किफायतशीर युक्तीचा अवलंबून करुन तुम्ही लॅपटॉपचा वेग वाढवू शकता. स्मार्टफोन जुने होते तसतसे लॅपटॉपची कार्यगतीही कालांतराने हळू होते. पण काही सोप्या बदलांमुळे तुम्ही ही जुनी यंत्रणा कार्यक्षम बनवू शकता.

✽ लॅपटॉप हार्ड डिस्क ड्राइव्ह (एचडीडी) वर चालत असेल तर तो 'एसएसडी'मध्ये बदला. 'एसएसडी'मुळे डेटा ट्रान्सफरचा वेग लक्षणीय वाढतो. त्यामुळे संपूर्ण प्रणाली वेगवान होते.

✽ लॅपटॉपमध्ये फक्त चार जीबी रॅम असेल तर ते आठ जीबी किंवा १६ जीबीपर्यंत वाढवा. यामुळे लॅपटॉपची एकाच वेळी अनेक कामे करण्याची क्षमता वाढेल. रॅम वाढल्याने लॅपटॉपचा वेग मोठ्या प्रमाणात वाढतो आणि एकाच वेळी अनेक कामे करण्यात कोणतीही अडचण येत नाही.

✽ अनावश्यक फाइल्स, सॉफ्टवेअर आणि प्रोग्राम डिलीट करा. स्टोरेज मोकळे केल्यास सिस्टमचे कार्य अधिक वेगवान होईल.

✽ विंडोज आणि इतर सॉफ्टवेअरच्या नवीनतम व्हर्जनमध्ये अनेकदा दोष निराकरणे आणि कार्यप्रदर्शन सुधारणा असतात. त्यामुळे वेळोवेळी सिस्टम अपडेट करत रहा. याशिवाय व्हायरस आणि मालवेअरही सिस्टीम मंदावू शकतात. अशा परिस्थितीत चांगले अँटीव्हायरस वापरुन प्रणाली सुरक्षित आणि प्रभावी ठेवू शकता.

✽ लॅपटॉप सुरू होताच आपोआप सुरू होणारे प्रोग्राम बंद करा. यासाठी टास्क मॅनेजर उघडा आणि स्टार्टअप टॅबवर जाऊन अनावश्यक ॲप्स बंद करा.

# डिजिटल मार्केटिंगमध्ये घडवा भविष्य

भविष्यवेध

आजच्या काळात प्रत्येकाला आवडीचे काम करायचे आहेच खेरीज त्यातून भविष्यात स्थिरता आणि चांगले उत्पन्नदेखील मिळण्याची अपेक्षा आहे. अशांनी डिजिटल मार्केटिंगमध्ये करिअर करण्याचा निर्णय घेणे योग्य ठरेल.

इंटरनेटचा वाढता वापर आणि ऑनलाइन शॉपिंगचा ट्रेंड यामुळे हे क्षेत्र झपाट्याने प्रगत झाले आहे. डिजिटल मार्केटिंग ही एक प्रक्रिया असून त्यामध्ये कंपन्या सोशल मीडिया, ईमेल, ब्लॉग आणि डिजिटल जाहिरातींद्वारे आपली उत्पादने आणि सेवांचा प्रचार करतात. यामध्ये ऑनलाइन ओळख निर्माण करुन अपेक्षित प्रेक्षकांपर्यंत पोहोचण्यासाठी मोहिमा चालवण्याचा समावेश असतो. अलिकडे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म उदयास येत आहेत, तसतसे त्यांचा वापरदेखील बदलतो आहे. तेव्हा नवीन ट्रेंड समजून घेणे आणि ते ब्रँडच्या ऑनलाइन ओळखीवर कसा परिणाम करतात हे जाणून घेणे, हे डिजिटल मार्केटिंग व्यवस्थापकाचे काम आहे. 'गुगल' सारखे सर्च इंजिन कोणतेही अपडेट आणते, तेव्हा मार्केटिंग टीमला त्यांची रणनीती पुन्हा तयार करावी लागते. यामुळे हे करिअर आव्हानात्मक आहेच खेरीज ते बरेच काही शिकवून जाते.



**भविष्याचा उत्तम मार्ग**

आज पारंपरिक विपणन अस्तित्वात असले तरी अचूकता आणि कमी किमतीमुळे डिजिटल मार्केटिंगने वेगाने लोकप्रियता मिळवली आहे. यामध्ये लोक कुठून येत आहेत, वेबसाइटवर काय करत आहेत आणि कोणते तंत्र उत्तम परिणाम देत आहे हे तुम्ही सहज पाहू शकता.

**नोकऱ्यांना जास्त मागणी का?**

२०२८ पर्यंत डिजिटल मार्केटिंगचा आकार सुमारे २४.१ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचेल आणि तो ३२.१ टक्के दराने वाढेल असा अंदाज आहे. २०२७ पर्यंत सुमारे सहा अब्ज लोक इंटरनेट वापरतील. याचा सरळ अर्थ असा की, कुशल डिजिटल मार्केटर्सची गरज आणखी वाढेल. 'लिंक्ड इन' च्या मते, डिजिटल मार्केटिंग स्पेशालिस्ट आज सर्वात जास्त मागणी असणाऱ्या नोकऱ्यांपैकी एक आहे. ८.६ लाखांहून अधिक नोकऱ्या उपलब्ध झाल्या आहेत.

**काय भूमिका?**

डिजिटल मार्केटिंगमध्ये ईमेल मार्केटिंग, सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन (एसईओ), कॉपीरायटिंग, कंटेंट रायटिंग, सोशल मीडिया मॅनेजमेंट, डिजिटल जाहिरात आणि सर्च इंजिन मार्केटिंग (एसईएम) यासारख्या विविध भूमिकांचा समावेश होतो. प्रत्येक भूमिकेसाठी वेगवेगळी कौशल्ये आवश्यक असतात.

**किती पगार?**

डिजिटल मार्केटिंगमधील तुमचा पगार अनुभवावर, कौशल्यांवर आणि स्थानावर अवलंबून असतो. भारतातील डिजिटल मार्केटिंग मॅनेजरचे सरासरी वार्षिक वेतन सुमारे ६.४ लाख रुपये आहे तर अमेरिकेत ते १,२२,११८ डॉलर; ऑस्ट्रेलियामध्ये १,०९,८५७ डॉलर, ब्रिटनमध्ये ५०,६८३ आहे.

# घटस्फोटीत, पारित्यक्ता या सवलतीखाली बदलीचा लाभ घेणाऱ्या शिक्षकांच्या अर्जांना स्थगिती, खोट्या शिक्षकांवर कारवाई होणार

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाला यश : चंद्रशेखर पंचमुख



नगर – घटस्फोटीत, पारित्यक्ता या सवलती खाली संवर्ग एक मध्ये बदलीचा लाभ घेण्याकरिता अर्ज करणाऱ्या सर्व शिक्षकांची सत्यता तपासणी शिक्षकांची माहिती नोंद सेवा पुस्तकात घ्यावी व खोट्या शिक्षकांवरती कारवाई करण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने सामाजिक न्याय विभाग तालुका अध्यक्ष चंद्रशेखर रावसाहेब पंचमुख यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची दखल घेऊन सर्व शिक्षकांच्या अर्जांना स्थगिती देण्यात आली असून जे दोषी शिक्षक असतील त्यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात येईल व पारित्यक्ता प्रधान क्रमांक करिता बदलीने लाभ घेणारे प्राथमिक शिक्षकांबाबत पारित्यक्ता त्याबाबत निश्चित कोणता दस्त पुरावा ग्राह्य धरावा याबाबत पुढील मार्गदर्शन होणार असल्याचे पत्रात पाठवले असल्याचे पत्र जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी यांनी दिले आहे.

पुढे निवेदनात म्हटले होते की, अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक महिला शिक्षकांनी संवर्ग एक मध्ये घटस्फोटीत व पारित्यक्ता या सवलतीचा लाभ मिळावा म्हणून त्यांनी फक्त नोटरीच्या आधारे बदलीमध्ये लाभ घेण्याकरिता खोट्या नोटरी करून प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. फक्त नोटरीच्या आधारे बदलीचा लाभ यापूर्वी घेतला असून आत्ताही अशाच प्रकारचा लाभ घेण्याचा प्रयत्न करत आहे. बदली करिता सोपा पर्याय म्हणून हा मार्ग सरोस निवडला जातो तसेच आता होणाऱ्या बदल्या करिता मोठ्या प्रमाणात असे अनेक शिक्षकांनी नोटरी करून दिल्या आहेत या सर्वांची चौकशी करणे गरजेचे आहे. या सर्वांनी फक्त बदली लाभा करिता घटस्फोटीत व पारित्यक्ता असल्याचे वकीलमार्फत पैसे देऊन खोटी माहिती पुरून नोटरी केली आहे. घटस्फोटीत व पारित्यक्ता म्हणून बदलीसाठी लाभ घेण्याचा अनेक शिक्षिका बदलीसाठी असा वापर करतात परंतु ज्या घटस्फोटीत आहेत व पतीने सोडून दिले असे दाखवतात प्रत्यक्ष त्याच शिक्षिका पतीबरोबर राहतात पैशाचा आर्थिक व्यवहार होतो पती–पत्नीला सोडायला व घ्यायला येतो दोघेही सोबत राहतात याचे बँकेचे खातेही पतीच्या नावानेच आहेत अशा सर्व घटस्फोटीत व पारित्यक्ता ची कसून चौकशी व्हावी त्यांची शहानिशा व्हावी या शिक्षिका अशा प्रकारे धाकटशाहीने हक्क दाखवून लाभ घेतात तर निश्चित यामागे अधिकारी वर्गाचा त्यांना आशीर्वाद आहे जर अशा प्रकारे फक्त नोटरी वरून बदल्या होऊ लागल्या तर संवर्ग एक मधील मोडणाऱ्या खऱ्या लाभधारकांवर अन्याय होईल. या महिला शिक्षिका शासनाची फसवणूक करतात याकरिता या सर्वांची निपक्षपातीपणे चौकशी करून कागदपत्र पाहून दोषीवर तात्काळ गुन्हे दाखल करावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली होती.

# अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर गृहसजावटीची 'अरिहंत होम डेकोर' येथे मोठी व्हरायटी



नगर – अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर मौल्यवान खरेदीला अतिशय शुभ मानले जाते. सोने, चांदीप्रमाणेच आपले घरही लखलखीत ऐश्वर्यसंपन्न असावे यासाठी गृह सजावट महत्वाची असते. हीच बाब लक्षात घेवून नगरमधील सावेडी पंकज स्टील कंपाउंड येथील अरिहंत होम डेकोर येथे घराचे सौंदर्य वाढवणारी मोठी व्हरायटी उपलब्ध करून देण्यात आली आहे, अशी माहिती दिवांशु मुनोत व पंकज मुनोत यांनी दिली.

घरातील किचन, हॉल, बेडरूम सर्वत्र आकर्षक व दिमाखदार फर्निचर नक्कीच केले जाते. या फर्निचरला अनुरुप कारपेट, मॅट्रेस, सोफा, पडद्यांची जोड मिळाल्यास घराच्या सौंदर्यात भर पडते. येथे गृहसजावटीसाठी लागणारे पडदे, वॉलपेपर, मॅट्रेस, कारपेट, सोफा विविध व्हरायटीत उपलब्ध आहेत. मॅट्रेसच्या अनेक ब्रॅण्डेड व्हरायटी दालनात आहेत. आरामदायी आणि दिसायलाही तितक्याच सुंदर अशा सजावटीमुळे घरात एक प्रकारची प्रसन्नता लाभते. मनात आपुसकच आनंदाच्या लहरी तयार होतात. घरातील रूमला असलेल्या रंगाला अनुरुप पडदेही येथे आकर्षक व्हरायटीत उपलब्ध आहेत. भिंतीवर लावण्यासाठीचे वॉलपेपर घराची शोभा वाढवतात. कारपेटचीही दर्जेदार अशी मोठी रेंज याठिकाणी आहे. आपल्या पसंतीनुसार ग्राहकांना चोखंदळपणे खरेदीला भरपूर वाव याठिकाणी मिळतो. अक्षय्य तृतीयेला अरिहंत होम डेकोरला भेट देवून मनपसंत गृहसजावटीची इच्छा पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ८४८४८३२५७७/ ९०२८२८५०५०.

# २ ते १० मे या कालावधीत जिल्हा वाचनालयामध्ये 'व्यक्तिमत्व विकास शिबीर

नगर – जिल्हा वाचनालयाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी तिसरी ते आठवीच्या मुलामुलींसाठी सुट्टीत म्हणजेच २ ते १० मे या कालावधीत व्यक्तिमत्व विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. २ मे पासून रोज सकाळी ९:३० ते ११:३० या वेळेत हे शिबिर वाचनालयाचे लोकमान्य टिळक सभागृह येथे होणार आहे. तज्ञ प्रा. सौ ज्योती कुलकर्णी या श्लोक व स्तोत्रे, बौद्धिक खेळ, कथाकथन, वक्तृत्व, बुद्धी आणि मनाचे एकाग्रता, आहार आणि आरोग्य व व्यायाम हस्तकला, सुखी जीवनाचा मंत्र इ. याविषयी सारख्या जीवनात उपयोगी पडणाऱ्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

तसेच अमोल बागुल, अशोक डोळसे, शिवाजी नाईकवाडी, सौ. साधना महानूर, सौ. आरती पटवर्धन, सौ. नलिनी भालेराव, सौ. आरती सप्तर्षी, इ. मुलांना मार्गदर्शन करणार आहेत.

लहान वयात आवडीच्या कलागुणांना वाव देऊन त्यात योग्य ते मार्गदर्शन मिळाल्याने लहानपणा पासून संस्कारक्षम पाया मजबूत व्हावा. या हेतूने हा उपक्रम वाचनालयाने राबविण्याचे योजले आहे. शिबीरात मुलांसाठी गोष्टी, गाणी, इ. या बरोबर सुखी जीवनाचे धडे देण्यात येणार आहेत.

वाचनालयाच्या वतीने होणाऱ्या या उपक्रमात आपल्या पाल्याला सहभागी करण्यात यावे, असे आवाहन वाचनालयाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड, उपाध्यक्ष आनंद देसाई, दिलीप पांढरे तसेच सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख किरण आगरवाल, शिल्पा रसाळ, सदस्य, निमंत्रित सदस्य यांनी केले आहे. संपर्कासाठी ग्रंथपाल ९५९५६६६७७० सहा. ग्रंथपाल ग्रंथपाल ८१४९१०६३८



बारामती येथे नुकत्याच पार पडलेल्या ५ व्या महाराष्ट्र चॅम्पियन कराटे शरयू चषक लिगमध्ये अचीवर्स स्पोर्टस् ॲकॅडमी ठरली सांघिक व कुमिते ट्रॉफीची मानकरी ठरली.

# महाराष्ट्र चॅम्पियन कराटे शरयू चषक लिगमध्ये 'अचीवर्स' ठरली सांघिक व कुमिते ट्रॉफीची मानकरी

नगर – बारामती येथे नुकत्याच पार पडलेल्या ५ व्या महाराष्ट्र कराटे चॅम्पियन लिग स्पर्धेमध्ये अचीवर्स स्पोर्टस् ॲकॅडमीच्या ५० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून चि.अथर्व निलेश बेदरे या खेळाडूला रु. १० हजार किमतीची (अरवजा) कुमिते किट बक्षीस स्वरुपात देण्यात आली.

तसेच ॲकॅडमीतील बेस्ट प्लेयर ऑफ द चॅम्पियनशिप म्हणून समर्थ सूर्यवंशी, रेहान पटेल, ऋषिकेश खेडकर व आदेश चव्हाण या चार खेळाडूंना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. त्याच प्रमाणे या स्पर्धेत (सुवर्णपदक) विजेते खेळाडू जोया शेख, जिया पटेल, श्रुती भैस, स्वरांजली गाडेकर, अदिती होल, रेहान पटेल, राजवीर सारवान, अथर्व बेदरे, समर्थ सूर्यवंशी, प्रणव दराडे, आशिष थोरात, नबील पटेल, सुमित खेडकर, ऋषिकेश खेडकर, विराज गांगुर्डे, आदेश चव्हाण, अविनाश गोल्हार, हरी बांगर, सोहेल सय्यद यांनी फरक पटकावले तर (कास्य) पदक विजेते– सना शेख, अदिती आदमाने, आदिती थोरात, मेबल सदाफुले, हुमैरा अन्सारी, अरमान शेख, आदित्य घुमरे, ईश्वर आघाव, रोहन दुशिंग, रुद्र अकोलकर यांनी फरक पटकावले तर (रौप्य) पदक विजेते खेळाडू– श्रद्धा मुळे, अभिरुची अनोळे, ओवी यादव, भूमी यादव, प्रणिती इघे, प्रज्वल अनोळे, तैमूर सय्यद, शौर्य झावरे, मृत्युंजय शिंदे, अथर्व जाधव, आदित्य पुजारी या सर्व खेळाडूंना अचीवर्स स्पोर्टस् ॲकॅडमीचे अध्यक्ष व मुख्य प्रशिक्षक सेन्सेई आदित्य क्षिरसागर, सचिव सेन्सेई आशिष केदारी, उपाध्यक्ष सेन्सेई कुशल मेस्त्री, सहप्रशिक्षक आदिती होले, प्रसाद निर्मल, ओंकार नऱ्हे, कृतिशा बोर्डे या प्रशिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# श्रुती संगीत निकेतनतर्फे कौशलवाणी एक सुरेल श्रुती संवाद कार्यक्रमाचे ४ मे रोजी आयोजन

नगर – संगीतकार कौशल इनामदार यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम ४ मे रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृह येथे आयोजित केला आहे. पुणेचे अभय नरहर जोशी आणि अहिल्यानगर येथील गायिका आणि संगीत नाट्य दिग्दर्शिका डॉ. धनश्री खरवंडीकर हे त्यांच्याशी संवाद साधतील.

या कार्यक्रमा दरम्यान कौशल इनामदार त्यांचा सांगीतिक प्रवास उलगडतील आणि आपले सांगीतिक विचारही प्रकट करतील. त्याचप्रमाणे त्यांनी संगीत दिलेली काही गीतेही ते सादर करतील. त्यांना नगर येथील तबला वादक शेखर दरवडे हे तबल्यावर साथसंगत करतील. कौशल इनामदार यांनी अनेक चित्रपटांना, लोकप्रिय मालिका आणि नाटकांना संगीत दिले आहे. त्यांनी संगीत दिलेले विशेष लोकप्रिय चित्रपट म्हणजे, बालगंधर्व, उबंटू, रंगा पतंगा, पितृऋण, लोकप्रिय मालिका म्हणजे, चार दिवस सासूचे, भटकंती, एका लग्नाची दुसरी गोष्ट, दिल्या घरी तू सुखी रहा, मराठी पाऊल पडते पुढे. त्यांनी संगीत दिलेले विशेष लोकप्रिय झालेले गीत म्हणजे मराठी अभिमान गीत. या सुरेश भटांच्या समर्थ लेखणीतून उतरलेल्या गीताला तेवढेच उचित संगीत कौशल इनामदार यांनी दिले आहे. नगरचे कलाकार या प्रसंगी हे गीत सादर करणार आहेत. आजपर्यंत संस्थेच्या वतीने श्रुती संवाद या उपक्रमा अंतर्गत ज्येष्ठ निर्मात्या दिग्दर्शिका सुमित्रा भावे, ज्येष्ठ रंगकर्मी प्रवीण (P.D.) कुलकर्णी, ज्येष्ठ हार्मोनियम व ऑर्गन वादक डॉ. मधुसूदन बोपर्डीकर इत्यादींच्या मुलाखती घेतल्या होत्या. सदर कार्यक्रम विनामूल्य असून या कार्यक्रमासाठी हेमंत काळे, सौ.सविता काळे, सौ.दीपा पारनाईक, सौ.माधुरी माचवे यांचे सहकार्य लाभले आहे.

या कार्यक्रमाला रसिक, विद्यार्थी, गुरू यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेच्या वतीने मकरंद खरवंडीकर यांनी केले आहे.





दिलीपदादा सातपुते मित्र मंडळाच्यावतीने आयोजित श्रीकृष्ण कथा वाचन कार्यक्रमास प्रारंभ केला.

# दिलीपदादा सातपुते मित्र मंडळ आयोजित श्रीकृष्ण कथा वाचन कार्यक्रमास प्रारंभ

नगर – केडगाव, भूषणनगर या ठिकाणी शिवसेना संपर्कप्रमुख दिलीप सातपुते मित्र मंडळाच्या वतीने श्रीकृष्ण कथा वाचन कार्यक्रमाचा शुभारंभ उत्साहात झाला. कार्यक्रमाची सुरुवात मंगल वाद्यांच्या गजरात आणि दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी केडगाव येथील पत्रकार संघाच्यावतीने महाआरती करण्यात आली. याप्रसंगी श्री व सौ. शिर्के महाराज, श्री व सौ. बबनराव मेहेत्रे, श्री व सौ. योगेश गुंड, श्री व सौ. नागेश सोनवणे, श्री व सौ. प्रसाद शिंदे, श्री व सौ. मकरंद घोडके, श्री व सौ. सूर्यवंशी गोवर्धन, श्री व सौ. संजय गारुडकर, श्री व सौ. विजयकुमार बोरुडे, श्री व सौ. घोडके गुरुजी, श्री व सौ. विजय साळुंखे, पाराजी सातपुते, उमेश रासकर, निलेश पाचपिंड, कोकरे, इंगळे, शिरसागर महाराज आरतीसाठी उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध भागांतील भक्तांनी सहभाग घेतला. श्रीकृष्ण लीला कथा वाचन महाराष्ट्रातील वैराग्यमूर्ती केशव महाराज उखळीकर यांच्या सुश्राव्य वाणीतून प्रारंभ झाला. यावेळी श्रीकृष्णाच्या जीवनातील विविध प्रसंग, त्याची लीला आणि उपदेश यांचे वाचन भावपूर्ण वातावरणात करण्यात आले. कथा वाचनामध्ये बाल्यलीला, गोवर्धन पूजन, गीता उपदेश यांसारख्या प्रसंगांना महत्त्व देण्यात आले.

संयोजकांनी सांगितले की, हा कार्यक्रम १४ दिवस चालणार असून दररोज संध्याकाळी विविध कथांचे वाचन आणि चिंतन होईल. तसेच दररोज महाप्रसाद वाटप होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

तसेच कार्यक्रमात ६ दिवस अर्पण ब्लड बँक यांच्यावतीने रक्तदान शिबिराचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

# पुणे येथील महाराष्ट्र चेस फेस्टिव्हल बुद्धिबळ स्पर्धेत अहिल्यानगर येथील आयुष ठरला 'बेस्ट महाराष्ट्र'

नगर – नुकत्याच पुणे येथे आयोजित केलेल्या महाराष्ट्र चेस फेस्टिव्हल बुद्धिबळ स्पर्धेत १८०० मानांकन खालील गटात अहिल्यानगरच्या (तिसगाव, ता. पाथर्डी) आयुष अय्या याने उत्कृष्ट कामगिरी करत बेस्ट महाराष्ट्रचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक रुपये ११००० आणि ट्रॉफी मिळवली.

या स्पर्धेत जवळपास ३५० खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. आयुष याने ९ सामन्यात ६.५ गुण मिळवले. आयुष यास आई आणि वडिलांचे प्रोत्साहन, नियमित सराव तसेच प्रशिक्षक विशाल गुजराथी व प्रकाश गुजराथी यांचे मार्गदर्शन लाभले.



पुणे येथील महाराष्ट्र चेस फेस्टिव्हल बुद्धिबळ स्पर्धेत नगरचा आयुष बेस्ट महाराष्ट्र ठरला.

त्याच्या या यशाबद्दल जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव यशवंत बापट यांनी त्याचे अभिनंदन केले.



सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमधील प्री प्रायमरी विभागाच्या समर कॅम्पला प्रतिसाद मिळाला.

# सेंट विवेकानंद स्कूलमध्ये समर कॅम्प उत्साहात

नगर – तारकपूरच्या सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलमधील प्री प्रायमरी विभागाच्यावतीने आयोजित समर कॅम्पला प्रतिसाद मिळाला. नगर शहरातील प्री प्रायमरीचे विद्यार्थी यात सहभागी झाले होते. लहान मुलांचा कल लक्षात घेवून आणि त्यांच्या आवडीनिवडीनुसार कॅम्पमध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. नृत्याविष्कार, कला, कार्यानुभव, योगा व फिटनेस, भाषण कला, कथाकथन, आउटिंग, विविध मनोरंजनात्मक खेळ अशा गोष्टींचा मुलांनी मनमुराद आनंद लुटला. प्री प्रायमरीच्या प्राचार्या कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली व संकल्पनेतून कॅम्प घेण्यात आला.

समर कॅम्प समारोपप्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, प्री प्रायमरीच्या प्राचार्या कांचन पापडेजा, प्राचार्या गीता तांबे, मुख्याध्यापिका गोदावरी किर्तानी, प्री प्रायमरीच्या शिक्षिका प्रिती कटारिया, दीपा आहुजा, गुंजन पंजवानी, कानन शिरवानी, अमृता कारमुंगे आदी उपस्थित होते. रूपचंद मोटवानी म्हणाले, लहान मुले ही फुलासारखी नाजूक असतात. त्यांना फुलवण्यासाठी तितक्याच आत्मियतेने प्रयत्न करावे लागतात. हा समर कॅम्प मुलांना नवी ऊर्जा देणारा ठरला आहे. सध्या कडक उन्हाळा असून मुलांनी उन्हात जाणे टाळावे तसेच पुरेसे पाणी पिऊन स्वत:ला ताजेतवाने ठेवावे. जंक फूडपासून दूर रहावे. नगरमध्ये सेंट विवेकानंद स्कूल एकमेव शाळा आहे ज्या शाळेने मुलांसाठी मोफत कॅम्प घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

या कॅम्पमध्ये दररोज मुलांना पौष्टिक नाष्टा देण्यात आला. तसेच सांगतेप्रसंगी मुलांनी गंगा उद्यानाला भेट देवून धमाल मस्ती केली. ट्रेन राईडसह विविध खेळण्याचा आनंद मुलांनी लुटला. एकत्र फोटो सेशन करून कॅम्पच्या आठवणी संस्मरणीय केल्या. यावेळी मुलांना आकर्षक गिफ्ट देण्यात आले. सर्व पालकांनी समर कॅम्पच्या उपक्रमासाठी शाळेचे कौतुक केले. या कॅम्पच्या सुंदर नियोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष रामचंद मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सेक्रेटरी गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर मखिजा, ट्रस्टी राजकुमार गुरनानी, सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, हरेश मध्यान यांनी शिक्षकांचे व मुलांचे कौतुक केले आहे.

# दादा चौधरी विद्यालयास क्रीडा केंद्र मंजूर होण्यासाठी सहकार्य करू

## जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांचे प्रतिपादन; क्रीडा भारतीच्या मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिरास उत्साहात प्रारंभ



क्रीडा भारती, जिल्हा क्रीडा कार्यालय व दादा चौधरी विद्यालय आयोजित विविध मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन करताना जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे.

नगर – उन्हाळी सुट्टी सुरु झाली आहे. शालेय विद्यार्थ्यांनी या सुट्टीचा विनियोग चांगल्या प्रकारे घालवण्यासाठी क्रीडा भारतीचा मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिराचा उपक्रम स्तुत्य आहे. चांगले खेळाडू घडण्यासाठी योग्य मार्गदर्शनसह चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. यासाठी दादा चौधरी विद्यालयाने मागणी केल्याप्रमाणे येथे क्रीडा केंद्र मंजूर होण्यासाठी तसेच स्वच्छता गृह, व्यायामशाळा आदी कामांसाठीही निधी मंजूर होण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन जिल्हा क्रीडाधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे यांनी केले.

खास उन्हाळ्याच्या सुट्टीनिमित्त आहील्यानगर क्रीडा भारती शाखा, जिल्हा क्रीडा कार्यालय व दादा चौधरी विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन ज्ञानेश्वर खुरांगे यांच्या हस्ते झाले. यावेळी हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, क्रीडा भारतीचे अध्यक्ष सुधीर चपळगावकर, प्रमुख मार्गदर्शक अनंत देसाई, मंत्री अमोल धोपावकर, संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री नन्नवरे, सुनील सुसरे आदींसह सहभागी विद्याथी उपस्थित होते.

प्रा.शिरीष मोडक म्हणाले, अहिल्यानगर शहरात क्रीडा भारतीचे उत्कृष्ट काम सुरु आहे. मोबाईल व इंटरनेटपासून मुलामुलींनी लांब राहण्यासाठी व त्यांची शारीरिक तंदुरुस्ती वाढून त्यांचे मैदानाशी नाते जोडण्यासाठीचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे, असे सांगून सुधीर चपळगावकर व अनंत देसाई यांचे कौतुक केले.

अनंत देसाई यांनी दादा चौधरी विद्यालयात मोठे क्रीडांगण उपलब्ध आहे. त्यामुळे येथे क्रीडा केंद्रास जिल्हा क्रीडा कार्यालयाने मंजुरी द्यावी, अशी मागणी केली. प्रास्ताविकात अमोल धोपावकर यांनी क्रीडा भारतीच्या उपक्रमांची माहिती दिली. मनीषा पुंड यांनी सूत्रसंचालन केले, कीर्ती धोपावकर यांनी आभार मानले. क्रीडा भारतीच्या स्फूर्ती गीताने सुरवात झालेल्या कार्यक्रमाची सांगता इतनी शक्ती हमे दे दाता... या प्रार्थनेने झाली.

१० मे पर्यंत दादा चौधरी विद्यालयाच्या मैदानावर चालणाऱ्या या क्रीडा शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना दैनंदिन करावयाचे व्यायामप्रकार, योगा, मल्लखांब, लाठीकाठी, ज्युडो, क्रिकेट, मर्दानी खेळ व युद्धकला तसेच लेझीमचे प्रशिक्षण तज्ज्ञ प्रशिक्षक व आंतरराष्ट्रीय खेळाडू शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या मनीषा पुंड, भारत श्री शशिकांत खिस्ती, श्रीकांत निंबाळकर, यश सानप, उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, गणेश वाळुंजकर, चंद्रहास कुलकर्णी, रुपेश पासफुल, भरत औटी आदी देत आहेत.

# जिल्ह्यातील १६ केंद्रांवर ४ मे रोजी नीट परीक्षेचे आयोजन; केंद्राच्या परिसरामध्ये प्रतिबंधात्मक आदेश

नगर – राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत नीट परीक्षा २०२५ (NEET) ४ मे रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ या वेळेत १६ केंद्रावर घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या परिसरात कोणताही गैरप्रकार होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी उपविभागीय दंडाधिकारी सुधीर पाटील यांनी अहिल्यानगर उपविभागाच्या महसूल स्थळसीमेच्या हद्दीतील परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरामध्ये वरील दिनांकास सकाळी १० ते सायंकाळी ८ या वेळेत प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरामधील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी. आय.एस.डी, फॅक्स केंद्र, ध्वनीक्षेपक, झेरॉक्स मशिन, स्कॅनिंग मशिन, मोबाईल फोन व इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमे, वस्तु कार्यान्वित ठेवण्यात येऊ नयेत. परीक्षा उपकेंद्राच्या परिघामध्ये परिक्षार्थी म्हणून घोषित केलेले उमेदवार व परीक्षा पार पाडण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीशिवाय इतर व्यक्तींना वाहनांने अथवा पायी फिरण्यास, उभे राहण्यास प्रतिबंध करण्यात आला असल्याचेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# मुठभर धान्य, घोटभर पाणी : लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचा उपक्रम

**उन्हाच्या तीव्र झळांतही पक्षी वाचविण्यासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार, विद्यार्थ्यांनी रुजवले संवेदनशीलतेचे बीज**

नगर – शहरातील कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याच्या वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या पक्ष्यांना आधार देण्यासाठी मुठभर धान्य आणि घोटभर पाणी! हा उपक्रम राबविला आहे. उन्हाळ्याच्या तीव्रतेने ४० अंशाच्यावर तापमान वाढत चाललेले असताना पक्ष्यांना जगणे सुसह्य होण्याच्या दृष्टीकोनान हा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाअंतर्गत शाळेच्या परिसरासह प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःच्या घरी झाडांखाली, अंगणात, गच्चीवर आणि परिसरातील उद्यानांमध्ये धान्य व पाण्याची व्यवस्था केली आहे. तसेच विद्यार्थ्यांनी मुठभर चार प्रकारचे धान्य शाळेत आणून दिले. जमा झालेल्या धान्याच्या पोत्यातून दररोज धान्य शालेय परिसरातील झाडे व उद्यानात टाकून पक्ष्यांची भूक भागवली जात आहे. तसेच पाण्यासाठी खाऊच्या पैशातून विद्यार्थ्यांनी छोटे भांडे विकत घेऊन पाण्याची सोय केली आहे.



लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याच्या वाढत्या तापमानामुळे त्रस्त झालेल्या पक्ष्यांना आधार देण्यासाठी मुठभर धान्य आणि घोटभर पाणी! हा उपक्रम राबविला.

उन्हाळ्यात पाणी व अन्नाच्या अभावामुळे अनेक पक्ष्यांचा मृत्यू होत असल्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देत मुख्याध्यापक शिवाजी लंके यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला. यासाठी शाळेतील शिक्षिका उर्मिला साळुंके, मीनाक्षी खोडदे, सुजाता दोमल, शितल रोहकले, शिल्पा कानडे, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, रूपाली वाबळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, पुनम धाडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी सांगितले की, पशुसेवा ही ईश्वरसेवा आहे. मुक्या प्राण्यांप्रती दया व करुणा या मानवी मूल्यांचे बीज विद्यार्थी वयात रुजविणे अत्यंत महत्त्वाचे आहे. मुठभर धान्य व घोटभर पाणी या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये निसर्गप्रेमाची भावना विकसित होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, अभिषेक कळमकर, अर्जुनराव पोकळे, अंबादास गारुडकर, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सहविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे यांनी शाळेच्या उपक्रमाचे व विद्यार्थ्यांच्या संवेदनशीलतेचे विशेष कौतुक केले आहे. हा उपक्रम संपूर्ण उन्हाळ्याच्या सुट्टीत अविरत सुरू राहणार असून, विद्यार्थी पक्ष्यांसाठी धान्य व पाण्याची सोय करणार आहेत.

# पहिलीच्या स्वरालीची पक्ष्यांसाठी धडपड

नगर – टाकाऊ व प्लास्टिकच्या बाटल्यांचा पुनर्वापर करुन उन्हाच्या तीव्रतेने अन्न व पाण्याशिवाय पक्षांचे हाल होऊ नये. या उद्देशाने कांबळे वस्ती, केडगाव जि. प. प्राथमिक शाळेची स्वराली आनंद आंग्रे या पहिलीच्या विद्यार्थीनीने आपल्या घराजवळील झाडांवर पक्ष्यांसाठी अन्न व पाण्याची सोय केली आहे.



एप्रिल अखेरीस पुढील हे महिन्यात उन्हाची तव्रता अधिक वाढते. या उष्णतेने पक्षी पाण्यासह भुकेने कासावीस होतात. ही होणारी घालमेल पाहून या चिमुरडीने बाटली व टाकाऊ प्लास्टिकच्या वस्तू झाडांना लटकवुन नित्यनियमाने त्यात थंड पाणी, गहु, तांदूळ यासारखे पदार्थ टाकत आहे. निसर्गाचा समतोल राखण्यास मदत करणाऱ्या चिमण्यासह इतर पक्षी गर्दी करत आहेत. शुन्य खर्चात राबविलेल्या व इतरांसाठी प्रेरणादायी उपक्रमाचे स्वराली हिचे कौतुक होत आहे.



जागतिक पुस्तक दिन निमित्त मख़दुम सोसायटी तर्फे पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले.

# मख़दुम सोसायटीतर्फे मोफत पुस्तके वाटप

**पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांची पुस्तकांशी जवळीक निर्माण करावी : आबीद खान**

नगर – मखदूम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने सावित्रीबाई फुले उर्दू प्राथमिक कन्या शाळेत जागतिक पुस्तक दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबिद दुल्हेखान यांनी उद्‌घाटनपर भाषण केले. आणि शालेय विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके वाटली आणि विद्यार्थ्यांना पुस्तकांचे महत्त्व, पुस्तके वाचण्याची उपयुक्तता आणि सध्याच्या युगात विद्यार्थ्यांचे पुस्तकांपासूनचे अंतर या विषयांवर मार्गदर्शन केले. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात पण पुस्तकांना महत्त्व आहे. त्यामुळे पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकांशी जवळीक निर्माण केली पाहिजे असे सांगितले. यावेळी स्त्री शिक्षणाचे जनक महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक नौशाद सय्यद, असलम पटेल, यास्मिन शेख, फरजाना शेख, शाहीन शेख, काझी मुमताज, शेख सुलताना, शेख हीना यांनी सहभाग घेतला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन असलम पटेल यांनी केले. नौशाद सैय्यद यांनी आभार मानले.

# पोलिओ निर्मूलनात रोटरीचे ऐतिहासिक योगदान

**डिस्ट्रिक्ट ३१३२ चा गौरवशाली वाटा**

Rotary
RID 3132

नगर – १९८५ साली रोटरीने पोलिओ प्लस या मोहिमेची सुरुवात करून जागतिक आरोग्य संघटना, यूनीसेफ आणि बिल अँड मेलिंडा गेट्स फाउंडेशन यांच्यासोबत भागीदारीतून ही लढाई सुरू केली. त्यातून आज जगातील ९९.९ टक्के पोलिओच्या केसेस संपुष्टात आल्या आहेत. भारताने २०१४ साली पोलिओमुक्त देश म्हणून युनोच्या मान्यतेसह इतिहास घडवला, आणि त्यामध्ये रोटरी क्लबसनी घरोघरी जाऊन लसीकरण जनजागृतीपासून ते पोलिओ ड्रॉप्स देण्यापर्यंत अमूल्य कार्य केले.

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२, ज्यामध्ये संपूर्ण मराठवाडा तसेच सोलापूर, सातारा व अहिल्यानगर जिल्ह्यातील ९७ क्लब्स कार्यरत आहेत, यांनीही पोलिओ निर्मूलन मोहिमेत उल्लेखनीय योगदान दिले आहे. दरवर्षी राष्ट्रीय लसीकरण दिवस निमित्ताने क्लब सदस्य स्वयंसेवक म्हणून लसीकरण केंद्रांवर काम करतात. यासोबतच रोटरी क्लबसकडून शाळा, गावांमध्ये जनजागृती मोहीमा राबवून पालकांमध्ये जागरूकता वाढवण्याचे कार्य केले जाते.

रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रल आणि इतर अनेक क्लबसनी गेल्या काळात हजारो मुलांना पोलिओ ड्रॉप्स देण्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे. यावर्षी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत विविध क्लबसनी रस्त्यावर जनजागृती रॅली, पोस्टर प्रदर्शन, तसेच सोशल मीडियावर पोलिओ जनजागृती मोहिमा देखील राबवल्या.

डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू यांच्या नेतृत्वाखाली आणि डिस्ट्रिक्ट पब्लिक इमेज संचालक रविंद्र बनकर व संपूर्ण टीमच्या सक्रिय सहभागातून पोलिओ निर्मूलनाबाबत रोटरीचे योगदान अधिक व्यापक पातळीवर पोहोचवण्याचे कार्य सुरू आहे अशी माहिती क्लब अध्यक्ष डॉ. कुणाल कोल्हे यांनी दिली. रोटरीचा हा सामाजिक बदल घडवणारा इतिहास भावी पिढीला आरोग्यदायी जीवनाचा वारसा देणारा आहे.



सकल ब्राम्हण समाज बांधवांच्या वतीने भार्गव दर्शन यात्रेचे स्वागत करण्यात आले.

# सकल ब्राम्हण समाज बांधवांच्यावतीने नगर शहरात भार्गव दर्शन यात्रेचे स्वागत

नगर – सकल ब्राह्मण समाज सेवा संस्था व परशुराम प्रतिष्ठानच्या वतीने भगवान परशुराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त २१ ते २६ एप्रिल या कालावधीमध्ये निघालेल्या अहिल्यानगर ते जाणापाव (इंदोर, मध्य प्रदेश) या ६ दिवसीय भार्गव दर्शन यात्रेचे २६ एप्रिल रोजी रात्री ९ वा. देशमुख प्लाझा, सावेडी नाका, अहिल्यानगर येथे आगमन झाले. यावेळी यात्रेचे फटाक्यांची आतिषबाजी करून स्वागत केले.

भगवान परशुरामांचे जन्मस्थान असलेल्या जाणापाव येथून परशुरामांच्या पादुका आणण्यात आल्या. या पादुकांचे व भगवान परशुराम यांच्या उत्सव मूर्तीचे पूजन व औक्षण करण्यात आले. यात्रेत सहभागी झालेल्या सिद्धेश्वर निसळ गुरुजी, संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ पोतदार, सचिव विजय देशपांडे, श्रिया देशमुख व यांचा यावेळी पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. भगवान परशुरामांची आरती करण्यात आली.

यावेळी कालिंदी केसकर, अतुल शुक्ल, सोनाली शुक्ल, अनंत शुक्ल, मोहिनीराज गटणे, प्रशांत भालेराव, राघव देशमुख यांच्यासह ब्राह्मण समाज बंधू भगिनी उपस्थित होत्या. यात्रेच्या कालावधीत परशुराम भक्तांनी जाणा पाव दर्शन, श्री बालाजी दर्शन, ओंकारेश्वर, सोमेश्वर दर्शन त्याचबरोबर नर्मदा परिक्रमा करून नर्मदा नदीमध्ये पवित्र स्नान केले. या यात्रेत सहभागी झालेल्या अनेक ब्रह्म वृंदांनी भार्गव दर्शन यात्रेतील आपले अनुभव कथन केले. राजाभाऊ पोतदार यांनी प्रास्ताविक केले. विजय देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रमोद कुलकर्णी यांनी आभार मानले.



रामकृष्ण अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या नवनिर्वाचित संचालकांचा वाडिया पार्क येथे सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

# महावीर चषक स्पर्धेने मानाचे स्थान प्राप्त केले

**अनुराग धूत यांचे प्रतिपादन; रामकृष्ण अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार**

नगर – वाडिया पार्क येथे भगवान महावीर चषक परिवाराच्या वतीने रामकृष्ण अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या निवडणुकीतील नवनिर्वाचित संचालक मंडळाचा सत्कार सोहळा झाला.

यावेळी भगवान महावीर चषक परिवाराचे विविध सामाजिक व क्रीडा उपक्रमांतील योगदान अधोरेखित करण्यात आले. भगवान महावीर चषक क्रिडा स्पर्धेची सुरुवात सुमारे १६ वर्षांपूर्वी झाली असून आज या स्पर्धेने एक मानाचे स्थान प्राप्त केले आहे. खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देत त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करणे, ही या परिवाराची प्रमुख भूमिका राहिली आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत सकारात्मक दृष्टिकोनातून वर्षभर विविध उपक्रम राबवले जातात, असे प्रतिपादन संचालक अनुराग धूत यांनी यावेळी केले.

सत्कार सोहळ्यात अनुराग धूत, राजेंद्र गुजराती, सुधीर झालानी, लक्ष्मीकांत झवर, मधुसूदन सारडा, ओम प्रकाश चांडक, राजेंद्र कंत्रोड, देवराम साठे, प्रदीप पंजाबी, साईनाथ कावट, राजकमल मणियार आणि शोभा राठी यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला माजी नगरसेवक संजय चोपडा, राजेंद्र तातेड, लक्ष्मीकांत शेटिया, डॉ. सचिन बोरा, प्रफुल्ल मुथा, प्रवीण शिंगवी, मनीष नहाटा, मयूर पितळे, अजय गुगळे, डॉ. आशिष भंडारी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या दरम्यान सनातनी वॉरियर्स संघातील खेळाडू रोहन कटारिया याला मॅन ऑफ द मॅच पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# आय.एस.डी.टी. सारख्या शिक्षण संस्था अहिल्यानगरचे भूषण

**आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन**

नगर – व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करणाऱ्या आय.एस.डी.टी. सारख्या संस्था या अहिल्यानगरचे भूषण आहेत, अशा शब्दात महापालिकेचे आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे यांनी गौरव उद्‌गार काढले.

येथील इन्स्टिट्यूट फॉर स्टडीज इन डिझाईन अँड टेक्नॉलॉजी (आय.एस.डी.टी.) या संस्थेच्या द्विदशकपूर्ती वर्षाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात आयुक्त श्री.डांगे बोलत होते. व्यासपीठावर जिल्ह्याचे अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, आय.एस.डी.टी. या संस्थेचे संस्थापक विनायक देशमुख, संचालिका पूजा देशमुख, प्राचार्य अरुण गावडे, फॅशन डिझाइनिंग विभागप्रमुख पूजा पतंगे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्री. डांगे म्हणाले, ९७ टक्के आर्थिक सत्ता ही पुरुषांच्या हातात असून ग्रामीण भागाचा विचार करता आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार केवळ ३ टक्के महिलांकडे आहे. त्यामुळे आय.एस.डी.टी. या संस्थेने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी हाती घेतलेले काम विशेष उल्लेखनीय आहे. या कामात अहिल्यानगर महानगरपालिका त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करील, अशी ग्वाही श्री. डांगे यांनी दिली.



आय.एस.डी.टी. या संस्थेच्या ब्लॉसम: २०२५ या फॅशन शो चा शुभारंभ करताना महापालिका आयुक्त व प्रशासक यशवंत डांगे, अपर जिल्हा पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, विनायक देशमुख, पूजा देशमुख, प्राचार्य अरुण गावडे व पूजा पतंगे दिसत आहेत.

प्रशांत खैरे यावेळी बोलताना म्हणाले, वीस वर्षांपूर्वी विनायक देशमुख यांच्या पुढाकाराने लावलेल्या या रोपट्याचा आता वटवृक्ष होत आहे. शहरातील आणि जिल्ह्यातील महिलांसाठी अत्यंत माफक शुल्क आकारून दर्जेदार शिक्षण देण्याचा संस्थेचा प्रयत्न प्रशंसनीय असून महिला आणि विद्यार्थिनींनी या उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा आणि स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावे.

विनायक देशमुख यांनी संस्थेची भूमिका स्पष्ट करताना सांगितले, आय.एस.डी.टी. ही केवळ एक शिक्षण संस्था नसून संस्थेमार्फत सातत्याने सामाजिक बांधिलकीचे विविध उपक्रम राबविले जातात. जिल्ह्यातील एकल महिलांना प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी प्रशासनाच्या सहकार्याने संस्थेने विशेष पुढाकार घेतला आहे.

प्रास्ताविकात पूजा देशमुख म्हणाल्या, २००४ साली स्थापन झालेल्या या संस्थेतून आतापर्यंत ५००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत. आगामी काळात ज्वेलरी डिझाईन, इव्हेंट मॅनेजमेंट, मेकअप आर्टिस्ट याबाबतचे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत.

यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या ब्लॉसम :२०२५ या फॅशन शोमध्ये ३५ पेक्षा जास्त डिझायनर्स व २५ मॉडेल्सनी सहभाग घेतला. विशेष म्हणजे लहान मुलांसाठी डिझाईन केलेल्या कपड्यांचे सादरीकरण करण्यासाठी आयोजित केलेल्या राऊंडमध्ये २५ बालकांनी सहभाग घेतला.

बेस्ट डिझायनर म्हणून कविता चव्हाण, श्रुतिका कानगुडे, बेस्ट एफ.ओ.टी. अश्विनी कांडेकर, बेस्ट ॲक्सेसरीज तन्मयी बोरुडे, ज्युरी प्रिसिएशन रक्षा जठार यांची निवड करण्यात आली. तर बेस्ट थीम पुरस्कार इथरिका– ओशन या ग्रुपला देण्यात आला.

प्रारंभी मागील वर्षीचे गुणवंत विद्यार्थी साक्षी उगले, आकांशा गाडे, कल्याणी नगरकर, निकिता मासुरे यांचा पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याशिवाय प्राचार्य अरुण गावडे व फॅशन डिझायनिंग विभाग प्रमुख पूजा पतंगे यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.



तालुक्यातील निंबळक येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय इसळक–निंबळक येथे २५ एप्रिल रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात विद्यालयाचा माजी विद्यार्थी ओंकार खुंटाळे याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त केल्याबद्दल त्याला शाळेच्यावतीने गौरविण्यात आले. (छायाचित्र – संदीप बांगर)

# निंबळक विद्यालयातील शिक्षक किशोर झावरे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**विद्यालयाचा माजी विद्यार्थी ओंकार खुंटाळेचाही सन्मान**

नगर – तालुक्यातील निंबळक येथील ग्रामविकास विद्या प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक विद्यालय इसळक–निंबळक येथे २५ एप्रिल रोजी आयोजित केलेल्या कार्यक्रमात विद्यालयाचा माजी विद्यार्थी ओंकार खुंटाळे याने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश प्राप्त करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा उभारल्याबद्दल संस्था व शाळेच्या वतीने त्याला गौरविण्यात आले. या प्रसंगी बोलताना खुटांळेनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत सर्व शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. त्याबरोबरच विद्यालयातील कलाशिक्षक किशोर झावरे हे ३३ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याबद्दल त्यांनाही संस्था व शाळेच्या वतीने सपत्नीक गौरविण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष नितीन कोतकर हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

याप्रसंगी बोलताना नितीन कोतकर म्हणाले की ओंकार खुंटाळे यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेले यश नेत्रदीपक असून हे यश ग्रामीण भागातील मुलांसाठी प्रेरणादायक आहे. या मुळे शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. तसेच विद्यालयातील कलाशिक्षक किशोर झावरे यांनी आपल्या ३३ वर्ष सेवेतून शाळेसाठी दिलेल्या योगदानाचे कौतुक केले. त्यांची उणीव शाळेला यापुढील काळात जाणवेल असेही प्रांजळ पणे कबूल केले.

याप्रसंगी शिक्षक विलास कोतकर, ज्योतिषशास्त्र अभ्यासक संतोष घोलप, ह.भ.प. संदीप कळसे यांनीही मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला हिंगणगावचे सरपंच पोपटराव ढगे, संस्थेचे सहसचिव अविनाश कोतकर, माधवराव कोतकर, डॉ.दिलीप पवार, विक्रम कासार, भाऊसाहेब कोतकर, पंढरीनाथ लामखडे, किसन कोतकर, बाबासाहेब रहाटळ, हबीब मन्यार, बापू कोतकर, राजेंद्र खुंटाळे, मिनाक्षी खुंटाळे, संगीता कोतकर, महादेव गवळी, मच्छिंद्रनाथ म्हस्के, आदिंसह ग्रामस्थ, नातेवाईक, मित्र परिवार, सेवकवृंद, विद्यार्थी, उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या पर्यवेक्षिका संगीता जाजगे यांनी केले. मुख्याध्यापक विनायक मगर यांनी आभार मानले.

# महाराष्ट्र राज्य एअर पिस्तुल शुटिंग स्पर्धेत इन्फिनिटी ॲकॅडमीच्या अथर्व पुंड याचे यश

नगर – नगरमधील इन्फिनिटी शुटिंग ॲकॅडमी येथे प्रशिक्षण घेणाऱ्या अथर्व पुंड याने महाराष्ट्र राज्य १० मीटर्स एअर पिस्तूल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नागपूर येथे नुकतीच ही स्पर्धा पार पडली. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल–मध्ये इयत्ता दहावीत शिकणाऱ्या अथर्व पुंड याने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याची राज्यस्तरीय तसेच प्री नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्याला ॲकॅडमीचे सागर फाटके, महाराष्ट्र रायफल असोसिएशनचे सचिव छबुराव काळे यांचे मार्गदर्शन लाभले.



नगरमधील इन्फिनिटी शुटिंग ॲकॅडमी येथे प्रशिक्षण घेणाऱ्या अथर्व पुंड याने महाराष्ट्र राज्य १० मीटर्स एअर पिस्तूल शूटिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी केली

नगर–पाथर्डी रोडवरील भिंगार येथील इन्फिनिटी शुटिंग ॲकॅडमीत एअर रायफल व पिस्तूल शुटिंगचे परिपूर्ण प्रशिक्षण दिले जाते. आठ वर्षावरील मुलामुलींना ॲकॅडमीत प्रवेश खुला आहे. याठिकाणी अचूक नेमबाजीसाठी आवश्यक कौशल्ये शिकवणारे अनुभवी प्रशिक्षक उपलब्ध आहेत. खेळाडूंना ऑलिम्पिक खेळांचा परिचय करून देत मोठी झेप घेण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. अथर्वने चारच महिन्यांच्या प्रशिक्षणादरम्यान कठोर परिश्रम घेत प्री नॅशनल स्पर्धेपर्यंत मजल मारली आहे.

प्रवेश व अधिक माहितीसाठी संपर्क : ८९७५१११५१, ९४२१६८१३९६, ९०११९००६५३.

# नागरिकांना तत्पर सेवा देण्यासाठी महानगरपालिका कटीबद्ध, सेवा हक्क दिनानिमित्ताने अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ

## व्हॉट्सअप चॅनेलद्वारे लवकरच नगरकरांना सेवा उपलब्ध होणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – चांगल्या दर्जाच्या व तत्पर सेवा हा नागरिकांचा अधिकार आहे. महानगरपालिकेच्या सेवा अधिक तत्पर व ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मालमत्ता कर व पाणीपट्टी आता ऑनलाईन भरता येते. महानगरपालिकेच्या सोशल मीडियावर असलेल्या अधिकृत पेजवर सूचना, तक्रारी प्राप्त होतात व त्याची दखलही घेतली जाते. नागरिकांच्या अर्जावर, कामांच्या फायलींवर जलद कार्यवाही व्हावी, यासाठी ई ऑफीस प्रणाली सुरू करण्यात आली आहे. नागरिकांना तत्पर सेवा व सुविधा पुरवण्यासाठी महानगरपालिका कार्यक्षम असल्याचे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या मुख्यालयासह सर्व प्रभाग समिती कार्यालयात सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा हक्क शपथ घेतली. नागरिकांना अधिक चांगल्या प्रकारे सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार करून सेवा हक्क दिवस साजरा करण्यात आला.


सेवा हक्क दिनाच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या मुख्यालयासह सर्व प्रभाग समिती कार्यालयात सर्व कर्मचाऱ्यांनी सेवा हक्क शपथ घेतली.

यावेळी उपायुक्त विजयकुमार मुंडे, संतोष टेंगळे, सहाय्यक आयुक्त सपना वसावा, आस्थापना विभाग प्रमुख मेहेर लहारे, प्रभाग अधिकारी निखिल फराटे, एस. बी. तडवी, राकेश कोतकर, शाम गोडळकर आदींसह कर्मचारी उपस्थित होते. प्रत्येक नागरिकाला त्यांच्या हक्काच्या दर्जेदार सेवा देणे, प्रशासन आणि जनता यांच्यात समन्वय वाढवून प्रशासनाप्रती नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करणे, या उद्देशाने सेवा हक्क दिवस साजरा करण्यात आला.

यशवंत डांगे यांनी सांगितले की, नागरिकांना अधिक तत्पर व चांगल्या सुविधा देणे हे प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्याचे कर्तव्य आहे. वेळेत सुविधा व सेवा मिळणे हा नागरिकांचा अधिकार आहे. प्रशासनस्तरावर जलद सेवा देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. महानगरपालिकेने संकेतस्थळावर सेवा, सुविधांची माहिती दिली आहे. व्हॉट्स ॲप चॅनेल सुरू करण्यात आले असून, लवकरच त्याद्वारे नागरिकांना सूचना, तक्रारीबाबत सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार हमाल पंचायतचे अध्यक्ष अविनाश घुले यांना जाहीर



नगर – नेवासा तालुक्यातील गोंडेगाव जनकल्याण फाऊंडेशनच्या सन २०२५ चे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आदर्श समाजभूषण पुरस्कारसाठी अहिल्यानगर जिल्हा हमाल पंचायत चे जिल्हाध्यक्ष अविनाश घुले यांची निवड करण्यात आली असल्याची माहिती फाउंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे यांनी दिली. पुरस्कार वितरण सोहळा ३० एप्रिल रोजी साय. ६ वाजता आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते गोंडेगाव येथे होणार असल्याचे सचिव सुरेश रोडगे व रामदास नजन यांनी सांगितले

अविनाश घुले यांचे जिल्हा हमाल पंचायतीच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हाभर काम सुरु असून डॉ. बाबा आढाव यांच्या मार्गदर्शनानुसार राज्याच्या कार्यकारणीवर सुद्धा ते काम पाहतात तसेच अहिल्यानगर येथे सर्व कामगार संघटनांचे अध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांचे काम सुरु आहे. रिक्षा पंचायत, वेगवेगळ्या कामगार संघटना आदी च्या माध्यमातून त्यांनी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी विविध आंदोलने केली आहेत या त्यांच्या कामाची दखल घेऊनच त्यांना समाज भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे

## नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या आणखी चार शाखा २३ मे पासून बंद

नगर – रिझर्व बँकेने नगर अर्बन बँकेचा व्यवसाय परवाना रद्द केल्यानंतर अवसायनात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या आणखी चार शाखा २३ मे पासून बंद करण्यात येणार आहेत. दैनंदिन खर्चात बचत करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली. बंद होणाऱ्या शाखांमध्ये संगमनेर, बेलापूर, नगर मार्केट यार्ड व केडगाव (इंडस्ट्रीयल इस्टेट) या चार शाखांचा समावेश असून या सर्व शाखांचे कामकाज नगर – मुख्य शाखेतून होणार आहे.

बंद होणाऱ्या शाखांमधील खातेदार लॉकर धारकांनी आपल्या लॉकर मधील वस्तू काढून घेऊन लॉकरच्या चाव्या बँक प्रशासनाकडे सुपूर्द कराव्यात असे आवाहन देखील बँक प्रशासनाकडून करण्यात आले आहे. यापूर्वीही काही शाखा बंद करण्यात आल्या आहेत.

बँकेतील सर्व ठेवीदारांचे पैसे सुरक्षित असून डी आय सी जी सी व केंद्रीय निबंधक नवी दिल्ली यांच्या नियमानुसार व आदेशानुसार वितरण करण्याची प्रक्रिया सुरू असून सर्व ठेवीदारांनी केवायसीची पूर्तता करून आपले क्लेम फॉर्म नजीकच्या शाखेमध्ये लवकरात लवकर भरून द्यावेत असे आवाहन अवसायक गणेश गायकवाड यांनी केले आहे.

## सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचावर रंगली 'स्वरांची चैत्रांगण'

नगर – चैत्राच्या तप्त वातावरणात रसिक श्रोत्यांच्या मनावर सप्तस्वरांनी गारुड केले. सदाबहार गीतांच्या सादरीकरणातून तयार झालेल्या आल्हाददायक व शीतल स्वर वर्षात श्रोते न्हाहून निघाले. निमित्त होते सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या वतीने आयोजित 'स्वर चैत्रांगण' या मैफलीचे.

ज्येष्ठ नागरिक मंच सावेडीच्या सभागृहात रंगलेल्या संगीत मैफिलीत श्रुती संगीत कलानिकेत च्या अध्यक्ष डॉ. धनश्री खरवंडीकर, मकरंद खरवंडीकर व सह कलाकारांनी गाजलेली विविध मराठी गीते सादर केली. यावेळी मंचचे अध्यक्ष शरद कुलकर्णी, मोरेश्वर मुळे, आदिनाथ जोशी बलभीम पांडव, शुभदा जहागीरदार, स्नेहल वेलणकर, ज्योती केसकर बापूसाहेब सोमणी, कुमुदिनी बोपर्डीकर आधी उपस्थित होते.


सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचच्या 'स्वर चैत्रांगण' या मराठी गीतांच्या कार्यक्रमात मकरंद खरवंडीकर व सौ. धनश्री खरवंडीकर यांनी मराठी गीते सादर केली. समवेत (तबला) सुपर्ण प्रताप तर साथ संगत शौनक कुलकर्णी आदी. (छाया – हेमंत ढाकेफळकर)

गणेश पूजनाने मैफिलीचा प्रारंभ झाला. ऊस डोंगा परी या नाटकातील देवीप्रसाद खरवंडीकर यांनी लिहिलेल्या तू गणनायक सिद्धिविनायक तू भवतारक या नांदीने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

धनश्री खरवंडीकर यांनी संगीत स्वयंवर नाटकातील 'मम आत्मा गमला' संगीत सौभद्र मधील 'वध जाऊ कुणाला शरण', हे बंध रेशमाचे मधील शांत शेळके यांचे 'काटा रुते कोणाला' आदी नाट्यगीते सादर केली.

शब्द वाचून कळले सारे, मन लाभले मन मोहले, गोमू माहेरला जाते हो नाखवा आदी गीते मकरंद खरवंडीकर यांनी सादर केले. तर शौनक कुलकर्णी यांनी राम होऊनी राम गा रे व जनविजन झाले आता. हे अभंग सादर केले 'सजल नयन नितधार बरसती' या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाचे निवेदन रेणुका मुळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय स्नेहल वेलणकर यांनी केला. बलभीम पांडव यांनी सूत्रसंचालन केले. शुभदा जहागीरदार यांनी आभार मानले.

## ज्येष्ठ नागरिकांसाठी ४ मे रोजी मोफत आरोग्य कार्यशाळा

नगर – आरोग्य सदन नॅचरल हेल्थ केअर सेंटर, शेंडी, अहिल्यानगर आयोजित ज्येष्ठ नागरिकांसाठी तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत मोफत आरोग्य तपासणी व आरोग्य विषयक व्याख्यान, आयुर्वेदिक पंचकर्माचे प्रात्यक्षिक कार्यशाळेचे आयोजन ४ मे रोजी सकाळी ९ ते सायं. ५ पर्यंत केले आहे. सदर आरोग्य कार्यशाळेचे उद्घाटन शेंडी येथील महिला सरपंच सौ. प्रयागा प्रकाश लोंढे यांच्या हस्ते होईल.

आरोग्य कार्यशाळेच्या रुपरेषा बदल सविस्तर माहिती देताना डॉ. पद्माकर रासवे यांनी सांगितले की आरोग्य कार्यशाळेमध्ये सकाळी १० पर्यंत नाष्टा नाडी परीक्षाद्वारे प्रकृती निदान व वात-पित्त-कफ प्रकृती संतुलन मार्गदर्शन. गुडघे दुखी, सांधेदुखी, मणके विकार, फ्रोझन शोल्डर, संधीवात, कॅल्शियमची कमतरता इत्यादी आजारांवर विनाऔषधी उपचार व्याख्यान. १२ ते १ चुलीवरचे ऑरगॅनिक सात्त्विक जेवण. शरीर शुध्दीकरण व निसर्गोपचाराचे महत्त्व. तसेच २७ नक्षत्र वनस्पतींची ओळख. पंचगव्य चिकित्सा व उपचार तसेच देशी गावरान गायीचे आरोग्य विषयी महत्त्व. आयुर्वेदिक पंचकर्म मसाज, स्टिमबाथ, कास्यस्थाळी, नस्य, शिरोधारा, फिजिओथेरपी इ. पैकी प्रात्यक्षिके. वैयक्तिक आजाराप्रमाणे योगा व सात्त्विक डायट प्रोग्राम मार्गदर्शन. मडलेपन, भस्मलेपन, गोमय लेपन, सुर्यकिरण स्नानाचे महत्त्व व प्रात्यक्षिक. प्राणायाम, ध्यानयोग साधनेतुन मनशांती. सायंकाळी ४ वाजता हर्बल तुलसी काढा.

३ मे पर्यंत नांव नोदणी आवश्यक आहे.

नांव नोदणीसाठी डॉ. पद्माकर रासवे यांच्याशी साधावा संपर्क – मो. ९४२२२२८६८८.

## अहिल्यानगरला १ मे रोजी हरे माधव सत्संग कार्यक्रम

### सद्गुरु बाबा ईश्वर शाह साहिब यांच्या दर्शनाची भाविकांसाठी पर्वणी




नगर – कटनी (म.प्र) येथील हरे माधव परमार्थ सत्संग समितीच्या वतीने सद्गुरु बाबा ईश्वर शाह साहिब यांचे अमृततुल्य प्रवचन व सत्संग कार्यक्रमाचे १ मे रोजी सायंकाळी ६ वाजता वृंदावन लॉन्स, संजोग हॉटेल जवळ, नगर- मनमाड रोड येथे आयोजन केले आहे.

त्यांच्या स्वागतासाठी व सत्संग कार्यक्रमाची जय्यत तयारी आयोजकांच्या वतीने करण्यात येत आहे.

सद्गुरु बाबा ईश्वर शाह साहिब यांचे दुःख भंजन दर्शन आणि त्यांच्या पवित्र वचनांमधून आध्यात्मिक मार्गदर्शन घ्यावे असे आवाहन समस्त सिंधी समाज, अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आली आहे. येथील कार्यक्रमानंतर त्यांचे २ मे सोलापूर व ४ मे रोजी कोल्हापूर येथे सत्संग कार्यक्रम होतील.

## अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर श्री क्षेत्र धरमपुरीत ३० एप्रिलला भगवंताचे सहपारिवारिक आगमन

नगर – श्री क्षेत्र धरमपुरीत ३० एप्रिल रोजी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर विठ्ठल भगवंत आणि राही रुक्मिणीचे आगमन होणार आहे. हा योग म्हणजे अक्षय तृतीया आणि धरमपुरीचे रौप्यमहोत्सवी वर्ष असा दुग्धशर्करायोग असणार आहे. गजानन महाराज व प्रभू श्रीरामचंद्रांचे असलेले मंदीर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनलेले असतानाच विठ्ठल भगवंत आणि राही रुक्मिणीच्या सहपारिवारिक आगमनाने श्री क्षेत्र धरमपुरी हे अधिकच मोठे भव्यदिव्य तीर्थक्षेत्र होणार आहे. त्यासाठी मंदिरे उभारणीचे काम सुरू आहे.

अक्षय तृतीयेला संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत श्री क्षेत्र धरमपुरी ते निंबळक- ईसळक क्षेत्रापर्यंत मूर्तींची शोभायात्रा निघणार आहे. मंगलकलश, धर्मध्वज, हत्ती, घोडे, ढोल, नगारे आणि टाळ मृदुंगाच्या गजरात निघणाऱ्या शोभायात्रेत दूरवरून भाविक भक्त सहभागी होणार आहेत. यावेळी विठ्ठल आणि राही रुक्मिणीच्या विशाल, मनमोहक, भव्यदिव्य अशा मूर्त्या भाविकांचे आकर्षण ठरणार आहेत.

या शोभायात्रेत सहभागी होऊन कार्यक्रमाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन श्री क्षेत्र धरमपुरी परिवाराकडून करण्यात येत आहे.


कल्याण रोड येथील गणेशनगर येथे म्हसोबा यात्रेनिमित्त श्री पावन म्हसोबा मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात येऊन भाविकांना (भंडारा) महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## गणेशनगर येथे म्हसोबा यात्रेनिमित्त भाविकांना महाप्रसादाचे वाटप

नगर – कल्याण रोड येथील गणेशनगर येथे म्हसोबा यात्रेनिमित्त श्री पावन म्हसोबा मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली होती. तसेच आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. सकाळी मंदिरात महा अभिषेक करण्यात आला. दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती.

सायंकाळी श्री पावन म्हसोबा मंदिरात माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी नगरसेवक सचिन शिंदे, राम नळकांडे, ॲड. सुरेश लगड, चेअरमन गणेश शिंदे, सुरेश मिसाळ (मामा) यांच्या हस्ते महाआरती करून महाप्रसादाचे (भंडारा) वाटप करण्यात आले. याप्रसंगी गणेशनगर येथील नाना देवतरसे, विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अमोल भांबरकर, सुबोध कुलकर्णी, उमेश गोरे, राजू तेल्ला, विशाल माने, सोमनाथ गीते, राहुल गीते, चेमटे गुरुजी, राहुल अस्तगांवकर, राहुल पिसाळ, सुधीर जगताप, गंगाधर वाकचौरे, संभाजी गरड, महेश रसाळ, सचिन डागवाले, कोडम आण्णा, मनोज मिसाळ, सचिन झोंड, पोपट शेळके, पोपट रासकर, गणेश खंडागळे, अनिल सोनवणे, सतीश भांबरकर, दयानंद मोरे, बाला कोकणे, रुपेश लोखंडे, गणेश मंचिकटला, संजय ढेरे, संतोष लयचेट्टी, विठ्ठल अलवाल, जंगम आण्णा, राजु वाळके, आशुतोष वाघमारे, संजय वाघस्कर, सौ.मयुरी गोरे, सौ.ज्योती रासकर, सौ. जयश्री देवतरसे, सौ.निता घोडके, सौ.सोनवणे, सौ.वाघस्कर, सौ.मोरे, सौ.माने, जयश्री ढेरे, विजया भांबरकर, मनीषा भांबरकर, वंदना वाघमारे आदींसह गणेशनगर येथील नागरिक उपस्थित होते.

## विवाहितेच्या आत्महत्येप्रकरणी पतीसह पाच जणांची निर्दोष मुक्तता



नगर – मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून विवाहितेने विहिरीत उडी मारून आत्महत्या केल्याप्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात तिचा पती व अन्य नातेवाईकांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. ही सुनावणी श्रीगोंदा येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. पी. शिंगाडे यांच्या न्यायालयात पार पडली.

श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळी येथील रंजना अरुण पालेकर यांची मुलगी अर्चना हिचा विवाह शैनेश्वर मच्छिंद्र नवले याच्याशी झाला होता. सासरी नांदत असताना अर्चनाने शैनेश्वर नवले, मीराबाई नवले, माणिक तुळशीराम नवले, सरस्वती माणिक नवले व सोनाली अतुल पिसाळ या आरोपींवर मानसिक आणि शारीरिक त्रास दिल्याचा आरोप करत आत्महत्या केली. आत्महत्येपूर्वी तिने आपल्या आईला फोन करून याची माहिती दिली होती. त्यामुळे अर्चनाची आई रंजना पालेकर यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात आरोपींविरोधात भादंवि कलम ३०६, ४९८अ, ३४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणात सरकार पक्षातर्फे एकूण पाच साक्षीदार तपासण्यात आले. मात्र, सुनावणी दरम्यान आरोपींविरुद्ध कोणताही ठोस व सबळ पुरावा सादर करण्यात आला नाही. आरोपीचे वकील ॲड. आकाश राजेश कावरे यांनी केलेल्या युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपींची सदर गुन्ह्यातून अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश यांनी निर्दोष मुक्ततेचे आदेश दिले आहेत.

आरोपीच्या वतीने ॲड.आकाश राजेश कावरे, ॲड.भाऊसाहेब पालवे यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. राहुल मते व ॲड.राजेश कावरे यांनी सहाय्य केले.



आयपीएल स्पर्धेतील मुंबई इंडियन संघातील खेळाडू रायन रिकल्टन यांना सुपर सिक्सची ट्रॉफी प्रदान करताना अहिल्यानगरचे रोनक मुनोत.

## मुंबई इंडियनचा खेळाडू रायन रिकल्टनला नगर येथील रोनक मुनोत यांच्या हस्ते ट्रॉफी

नगर – अहिल्यानगरचे रहिवासी रोनक मुनोत यांच्या हस्ते इंडियन प्रीमियर लीगमध्ये रविवारी झालेल्या सामन्यात सुपर सिक्स मारणाऱ्या खेळाडूला बक्षीसाची ट्रॉफी देण्यात आली.

स्पर्धेत मुंबई इंडियन ने लखनऊ संघावर विजय संपादन केला. या सामन्यात सर्वाधिक षटकार मारणारा खेळाडूची ट्रॉफी मुंबई संघातील रायन रिकल्टन यांना अहिल्यानगरच्या रोनक मुनोत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. रोनक मुनोत यांनी एंजल वन या इन्शुरन्स कंपनीतर्फे विशेष कामगिरी केल्याने त्यांना कंपनीतर्फे ट्रॉफी देण्याचा हा बहुमान मिळाला.

## 'राज्यस्तरीय एक्सलंट ऑलिम्पियाड'मध्ये 'जय बजरंग'चे १९ विद्यार्थी जिल्हा, केंद्र आणि विशेष गुणवत्ता यादीत

नगर – आशा एज्युकेशन फाउंडेशन संचलित जय बजरंग प्राथमिक विद्यालयाचे राज्यस्तरीय एक्सलंट ऑलिंपियाड परीक्षेत १९ विद्यार्थी जिल्हा, केंद्र आणि विशेष गुणवत्ता यादीत चमकले आहेत.

यादीतील विद्यार्थी पुढीलप्रमाणे – चि. ईशान दीपक घुले याने इ. १ ली मध्ये २०० पैकी १६६ गुण मिळवून जिल्ह्यात १२ वा क्रमांक पटकावला, तर कु. आयुश्री दीपक ढवळशंख हिने इ. २री मध्ये २०० पैकी १७८ गुण मिळवून जिल्ह्यात ११ वा क्रमांक पटकावला, कु. आराध्या कैलास मेहेत्रे हिने इ. २री मध्ये २०० पैकी १७६ गुण मिळवून जिल्ह्यात १२ वा क्रमांक पटकावला तर कु.श्रावणी संतोष पानकडे हिने इ. चौथी मध्ये २०० पैकी १७४ गुण मिळवून जिल्ह्यात १२ क्रमांक पटकावला. तर केंद्र यादीत प्रावीण्य मिळविलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे – इ. पहिली कु. अंजली रवींद्र आव्हाड २०० पैकी १५०, स्वरा रविंद्र आव्हाड २०० पैकी १४४, चि. प्रथमेश अशोक वारे २०० पैकी ११२, कु. कार्तिकी ज्ञानेश्वर सोमवंशी २०० पैकी ११२, इ.२ री मध्ये कु. शिवन्या गणेश कुसाळकर २०० पैकी १५४, इयत्ता तिसरी कु.प्रेरणा प्रवीण बरबडे २०० पैकी ११६, इयत्ता चौथी श्रीलेखा गणेश अडसरे २०० पैकी १५०, चि.कृष्णा कैलास मेहत्रे २०० पैकी १४०, कु.अनुष्का अमित साळवे २०० पैकी ११४. तर विशेष प्राविण्यामध्ये चि. विराज अमोल चोभे २०० पैकी ८८. चि.अक्षित कालिदास मोकाशी २०० पैकी ७४, कु. तन्वी विकास गोलवड २०० पैकी ६. कु. श्रेया राहुल दाणी २०० पैकी ७०, चि. गौरव अशोक शिंदे २०० पैकी ६६, कु. विश्वजा गणेश बोठे २०० पैकी ६६ गुण मिळवून या सर्व विद्यार्थ्यांना श्रीमती सुरेखा दुधाडे, श्रीमती आशा घुले, श्रीमती कल्पना मिसाळ, श्रीमती छाया क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले.


राज्यस्तरीय एक्सलंट ऑलिम्पियाड परीक्षेत यशस्वी झालेले जय बजरंग विद्यालयाचे विद्यार्थी. समवेत मुख्याध्यापक अमोल क्षीरसागर आदी.


एस बुऱ्हाडे सराफ या नवीन दालनाच्या उद्घाटन प्रसंगी श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी), सुभाष कायगावकर, संतोष बुऱ्हाडे, प्रशांत बुऱ्हाडे आदी.

## प्रामाणिकपणे सुवर्णपेढी चालवून आदर्श निर्माण केला

### राजाभाऊ कोठारी यांचे प्रतिपादन

नगर – कलेचा वारसा जपत संतोष बुऱ्हाडे व प्रशांत बुऱ्हाडे यांनी ग्राहकांचा विश्वास संपादन करून प्रामाणिकपणे सुवर्णपेढी चालवून आदर्श निर्माण केला असल्याचे गौरवोद्गार श्री विश्वेश्वर स्वामी महाराज (राजाभाऊ कोठारी) यांनी काढले.

चितळे रोडवर लोढा हाइट्स मध्ये नवीन वातानुकूलित एस. बुऱ्हाडे सराफ पेढीच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून सुभाष कायगावकर उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की या पेढीने ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून, जुन्या ग्राहकाबरोबरच पुढील नवीन पिढी ही ग्राहक म्हणून जोडली गेली आहे. या उद्घाटन प्रसंगी या पेढीने ऑफर ठेवली आहे. स्वागत संचालक संतोष बुऱ्हाडे यांनी केले. प्रशांत बुऱ्हाडे यांनी आभार मानले. कार्यक्रमास प्रमोद बुऱ्हाडे, प्रकाश डहाळे, वैजनाथ चिंतामणी, राहुल कुलथे, उमेश बेद्रे आदी उपस्थित होते.

# कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून इमारतींच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण व पूर्वानुमान शक्य : प्रा. डॉ. कल्पना विधाते




दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राद्वारे १७ एप्रिल रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यायातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. कल्पना विधाते यांचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निवासी इमारतींचे ऊर्जा वापर विश्लेषण व पूर्वानुमान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

नगर – कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून निवासी इमारतींच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण व पूर्वानुमान शक्य, असे प्रतिपादन इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया) आयोजित व्याख्यानात प्रा. डॉ. कल्पना विधाते यांनी केले.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहिल्यानगर स्थानिक केंद्राद्वारे १७ एप्रिल रोजी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यायातील विद्युत अभियांत्रिकी विभागाच्या सहाय्यक प्राध्यापिका डॉ. कल्पना विधाते यांचे कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निवासी इमारतींचे ऊर्जा वापर विश्लेषण व पूर्वानुमान या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

आपल्या व्याख्यानात त्यांनी नमूद केले की स्मार्ट ग्रिड ऑपरेशनसाठी अक्षय ऊर्जा (RE) निर्मिती आणि वीज भार अंदाज (Voltage Prediction) हे महत्त्वाचे आहे. तथापि, अक्षय ऊर्जा स्रोतांच्या अधूनमधून आणि गोंधळलेल्या स्वरूपामुळे, तसेच वापरकर्त्यांच्या विविध वर्तनामुळे आणि वीज ग्राहकांमुळे, भविष्यातील वीज वापराचा अंदाज करणे कठीण जाते. यंत्र शिक्षण (मशीन लर्निंग) पद्धतींनी अलीकडेच ऊर्जा वापरासाठी वापरल्या जाणाऱ्या भाकित मॉडेल्सच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हा अभ्यास सामान्य ऊर्जा वापराच्या अनुप्रयोगांमध्ये वापरल्या जाणाऱ्या मशीन लर्निंग मॉडेल्समधील अत्याधुनिकतेचा शोध घेतो. अनेक संशोधनांनी ऊर्जेच्या वापराचे विश्लेषण करण्यासाठी आणि वापरकर्त्यांसाठी ते ऑप्टिमाइझ करण्यासाठी अत्याधुनिक मशीन लर्निंग–आधारित तंत्रांचा वापर केला आहे. शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि ऊर्जेच्या वापराचे ऑप्टिमाइझ करण्यासाठी निवासी क्षेत्रे आणि इमारतींमध्ये कार्यक्षम ऊर्जा वापर विश्लेषण आणि अंदाज आवश्यक आहेत. इमारतीची वैशिष्ट्ये, हवामान परिस्थिती आणि रहिवाशांचे वर्तन यासारख्या संबंधित वैशिष्ट्यांसह ऐतिहासिक ऊर्जा डेटा समाविष्ट करून, प्रस्तावित मॉडेल निवासी सेटिंग्जमध्ये ऊर्जेचा वापर परिपूर्ण करण्यासाठी मौल्यवान अंतर्दृष्टी आणि अंदाज प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

यावेळी मुख्य अतिथी म्हणून बोलताना, इटामॅक्स एनर्जी सोल्युशन प्रा. लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी, अभियंता दिलीप जोशी यांनी ऊर्जा क्षेत्रात मशीन लर्निंगचा वापर मोठ्या प्रमाणावर झाल्यास क्रांतिकारक बदल होतील व त्यामुळे वहन व नियंत्रण सहज शक्य होईल, असे भाकीत वर्तवले. तसेच त्यांनी वीज उपकरणांचा आढावा घेऊन, कमीत कमी वीज वापरतील अशा उपकरणांच्या संशोधनावर व निर्मितीवर भर दिला.

यावेळी प्रा. डॉ. कल्पना विधाते यांचा कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे निवासी इमारतींचे ऊर्जा वापर विश्लेषण व पूर्वानुमान शोध प्रबंधावर विद्यावाचस्पती (पीएचडी) पदवी मिळाल्याबद्दल, दिलीप जोशी व संस्थेचे अध्यक्ष भारतभूषण भागवत यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स, अहिल्यानगर केंद्राचे अध्यक्ष भारतभूषण भागवत यांनी संस्थेच्या कार्याबद्दल व संस्था राबवत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. मानद सचिव डॉ. दीपक विधाते यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. माजी मानद सचिव डॉ. अतुल अत्रे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला संस्थेचे रामनाथ वायकर, हरिश्चंद्र थिगळे, राजकुमार मुनोत, डॉ. दादासाहेब करंजुले, जी. सी. मोटगी, प्रदीप तांदळे, तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी उपस्थित होते.

# स्पर्धा परीक्षेतील यशात 'स्नेहालय'ची भूमिका महत्त्वाची

## ओंकार खुंटाळे यांचे प्रतिपादन



केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात निंबळक (तालुका जिल्हा अहिल्यानगर) येथील ओंकार याचा ६७३ वा क्रमांक आला त्याबद्दल त्याचा सत्कार करताना स्नेहालयचे डॉ. गिरीश कुलकर्णी आदी.

नगर – स्पर्धा परीक्षेतील अंतिम मुलाखतीत उमेदवाराची सामाजिक प्रश्नांची जाणीव, सामाजिक कामाची अनुभूती आणि प्रगल्भता परीक्षक अन्य मुद्द्यांप्रमाणेच जोखतात. स्नेहालय संस्थेच्या सहवासात सामाजिक दृष्टी विकसित झाल्याने स्वतःला सहजतेने सिद्ध करता आल्याचे प्रतिपादन ओंकार खुंटाळे यांनी केले.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात निंबळक (तालुका जिल्हा अहिल्यानगर) येथील ओंकार याचा ६७३ वा क्रमांक आला. स्नेहालय संचलित युवा निर्माण प्रकल्पातर्फे त्याचा गौरव करण्यात आला. शिबिरात आणि अन्य उपक्रमात वर्ष २०१५ – १६ पासून ओंकार सक्रिय होता.

ओंकार म्हणाला की, गेली सहा वर्षे अविरत ध्यास घेऊन स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला. अभ्यासातील सातत्य, वेळेचे व्यवस्थापन आणि आत्मविश्वास ही शिदोरी सोबत असली तरी यश मिळाल्याशिवाय प्रयत्न थांबवायचेच नाहीत, हा निर्धार यशाला कारण ठरला. स्पर्धा परीक्षा देण्यामागील नैतिक उद्देश प्रयत्नांना बळ देतो, असे नमूद करून ओंकार म्हणाला की, सरकारी सोयी सुविधांचे, अधिकार आणि प्रतिष्ठेचे आकर्षण आपल्याला कधीच वाटले नाही तर देशप्रेम आणि सामाजिक जाणीव व्यापक स्वरूपात व्यक्त करण्याची संधी म्हणून आपण सनदी सेवांकडे पाहिले.

यावेळी स्नेहालयचे कार्यकर्ते डॉ. मार्शिया वॉरन, डॉ. तेजस्विनी सोनवणे, डॉ. गिरीश कुलकर्णी, अनिल गावडे, हनिफ शेख, युवा निर्माण प्रकल्पाचे माजी संचालक नितीन वावरे आणि विद्यमान समन्वयक विकास सुतार, सहसंचालक अजित जगताप, ओंकारचे युवा निर्माण मधील मित्र मैत्रिणी, स्पर्धा परीक्षा देणारे नगर मधील काही विद्यार्थी उपस्थित होते.

# रस्त्यात वाहतुकीस अडथळा करणाऱ्या ५ जणांवर कारवाई

नगर – रस्त्याच्या मधोमध वाहने उभी करत तसेच टपरी टाकून वाहतुकीस अडथळा होऊन अपघात होण्याची परिस्थिती निर्माण करणाऱ्या ५ जणांच्या विरुद्ध कोतवाली पोलिसांनी २८ एप्रिल रोजी कापडबाजार येथील भिंगारवाला चौक व माळीवाडा येथील जिल्हा परिषद कार्यालय कारवाई केली.

रस्त्यामध्ये रिक्षा, हातगाडी व टपरी लावून वाहतुकीस अडथळा करणाऱ्यांवर कोतवाली पोलिसांनी केलेल्या कारवाईत भिंगारवाला चौक येथे रस्त्याच्या मध्ये बजाज कंपनीची ऑटो रिक्षा (क्र. एम एच १६ डी सी ५३४) रस्त्याच्या मध्ये उभी करणाऱ्या रिक्षा चालक इरफान इसहाक शेख (वय ४०, रा. ड्रीम लेन्स सोसायटी, बॉम्बे हॉस्पिटल शेजारी, मुकुंदनगर ) आणि बजाज कंपनीची ऑटो रिक्षा (क्र. एम एच १६ सी ई २७ २५) रस्त्याच्या मध्ये उभी करणारा रिक्षा चालक संतोष सुरेश इंगळे (वय ३९, रा. पारगल्ली, कौठीची तालीम मागे, माळीवाडा) यांच्यावर कारवाई केली.

तसेच माळीवाडा येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर मोबाईल रिपेरिंग करण्याची टपरी रस्त्याच्या मध्ये उभी करणाऱ्या अरुण आसाराम गोरे (वय ३८, रा. औसरकर मळा, सारसनगर) आणि जावेद गुलाब शेख (वय ३५, रा. नारायणडोह, ता.नगर) तसेच रस्त्याच्या मध्ये बँगल स्टॉल लावणारा अनिल ताराचंद कटारिया (वय ५५, रा. तारकपूर, अ. नगर) यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत हिंदसेवाचे १८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले



गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत चमकलेले हिंदसेवाचे विद्यार्थी मार्गदर्शक शिक्षकांसह.

नगर – गुरुकुल एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर आयोजित गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक शाळेचे १८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले. गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षेत इयत्ता दुसरी मधील सर्वेश लाड व सेजल शेळके १०० पैकी १०० गुण मिळवत राज्यात प्रथम आले. तर इयत्ता दुसरी मधील विश्वजित गंगावणे राज्यात चौथा व श्रावणी जाधव राज्यात पाचवी आली. इयत्ता पहिली मधील गीत जपे (जिल्ह्यात प्रथम), अमृता बेरड (जिल्ह्यात आठवी), समृध्दी पठारे (जिल्ह्यात नववी), अम्मारा शेख (जिल्ह्यात दहावी), अल्तमश शेख (जिल्ह्यात अकरावा) यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळविले. इयत्ता दुसरी मधील अरसलान शेख (जिल्ह्यात आठवा), तन्वी कलंके (जिल्ह्यात दहावी), मुस्कान शेख (जिल्ह्यात दहावी), इयत्ता तिसरी चिन्मय म्हस्के (जिल्ह्यात प्रथम), राजकुमार निसाद (जिल्ह्यात नववा), आदिती खेडकर (जिल्ह्यात बारावी), जिविका ताकपिरे (जिल्ह्यात सोळावी), इयत्ता चौथी मधील श्लोक दोमल (जिल्ह्यात सातवा), संचेती जपे (जिल्ह्यात आठवी) आली.

या सर्व विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक सौ. पोतदार विद्या, सौ. परभणे अर्चना, सौ. धाडगे अरुणा, श्रीमती जंगम मनिषा, सौ. साळी मनिषा, पठाण मुदस्सिर, सौ. सासवडकर अंजली यांनी मार्गदर्शन केले.

स्पर्धा परीक्षेत सातत्यपूर्ण यश मिळवत शाळेने आपली परंपरा राखली. दरवर्षीप्रमाणे शाळेतील विद्यार्थी मंथन प्रज्ञाशोध परीक्षा, गुरुकुल प्रज्ञाशोध परीक्षा, स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षा या सर्व स्पर्धा परीक्षेत सातत्यपूर्ण कामगिरी केल्याने शाळेच्या नावलौकिकात भर पडली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे व शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांचा मोठा वाटा आहे, असे गौरवोद्गार संस्थेचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक यांनी काढले.

या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. रमेश झरकर, शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा, संस्थेचे पदाधिकारी अजित बोरा, डॉ.पारस कोठारी, प्रा.ज्योती कुलकर्णी, सौ. अनुरीता झगडे, शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे आदी उपस्थित होते.



मुख्याध्यापिका चंद्रकला ठोकळ–कातोरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सन्मान करताना खा.निलेश लंके.

# मुख्याध्यापिका चंद्रकला ठोकळ यांचे शैक्षणिक कार्य इतरांसाठी प्रेरणादायी

## खा. निलेश लंके यांचे प्रतिपादन; सेवानिवृत्तीनिमित्त सेवापुर्ती कृतज्ञता सोहळा साजरा

नगर – शाळेची उच्च प्रतीची गुणवत्ता व शैक्षणिक दर्जाचा आलेख उंचावण्यासाठी नारायण गव्हाण (तालुका पारनेर) या शाळेने केलेले प्रयत्न जिल्ह्यासाठी प्रेरणादायी आहेत त्यासाठी मुख्याध्यापिका चंद्रकला ठोकळ– कातोरे यांचे योगदान निश्चित महत्वाचे आहे त्यांचे अनुकरण इतरांनी करावे, असे आवाहन खा.निलेश लंके यांनी केले

पारनेर तालुक्यातील नारायणगव्हाण शाळेच्या मुख्याध्यापिका चंद्रकला ठोकळ – कातोरे या सेवानिवृत्त झाल्या त्यानिमित्त त्यांचा सेवापुर्ती कृतज्ञता सोहळा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी अशोकराव कडूस होते

प्रारंभिक उपसरपंच राजेश शेळके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. प्रस्तावविक भाषणात पंढरीनाथ रेपाळे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचा हेतू स्पष्ट केला. या शाळेचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झाले व तीन विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीत स्थान मिळाले त्यामुळे त्यांचा व मार्गदर्शक शिक्षक संजय रासकर यांचा खा.लंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला अध्यक्षीय भाषणात शिक्षण अधिकारी कडूस म्हणाले की सध्या ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत चांगली कामगिरी करत असून उद्याच्या भविष्यासाठी हे एक आशावादी चित्र आहे

यावेळी विस्तार अधिकारी कांतीलाल ढवळे, शिक्षक नेते गोकुळ कळमकर, रावसाहेब रोहकले, शिक्षक बँकेचे संचालक सूर्यकांत काळे, सरपंच मनीषा जाधव, सुपेचे सरपंच मनीषा रोकडे, सरपंच संदीप ढवळे, सुदामराव ठोकळ, माजी सरपंच गणेश साठे, हायस्कूलच्या मुख्याध्यापिका सुमन शेळके, केंद्रप्रमुख चांगदेव गवळी, मंदा साबळे, अनिल जाधव, डॉ. प्रिया भालसिंग, शामराव आंधळे, प्रा. संजीवनी भालसिंग यांचे सह शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रीमती ठोकळ यांच्या कार्याचा गुण गौरव केला

व्यासपीठावर सरपंच मनीषा जाधव, उपसरपंच राजेश शेळके, मनीषा रोकडे, तुकाराम कातोरे, लक्ष्मण ठोकळ, ज्ञानेश्वर इंगळे, भरत शेळके, पुष्पा पारधे, सुमन अलमाले, पंढरीनाथ रेपाळे, सुनिता गवारे, दादाभाऊ कोल्हे, गोकुळ कळमकर, संदीप ढवळे, रावसाहेब रोहकले, माजी सरपंच सुरेश बोरुडे, राजेंद्र शिंदे, राम नाणेकर, बबनराव मते, वसंतराव दिवटे, राजेंद्र पोटे, बाळासाहेब गवळी, शिवाजी साठे, बबनराव सांगळे, दादा झरेकर, उपसरपंच संदीप लष्करे, गोरख साठे, वाडेगव्हाण केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सुनिता गवारे यांनी केले. गणेश कोहकडे यांनी आभार मानले.

### शाळेच्या प्रति सद्भावना

सेवा निवृत्तीनंतर शाळेला आपली व आपल्याला शाळेची आठवण राहावी यासाठी चंद्रकला ठोकळ यांनी शाळेच्या आवारात विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी २० हजार रुपये खर्च करून बोरवेलसाठी नवीन वीज पंप व पाईपलाईन करून दिली तसेच शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांच्या प्रयत्नातून बांधलेल्या एका वर्ग खोलीचे उद्घाटन खा. लंके यांच्या हस्ते करण्यात आले.

### आई–वडिलांचा सत्कार

सेवानिवृत्ती कार्यक्रमात श्रीमती ठोकळ यांचे वृद्ध आई वडील उपस्थित होते. आपल्या डोळ्यासमोर लेकीचा झालेला गौरव सोहळा पाहून त्यांच्या डोळ्याच्या कडा पाणवल्या यावेळी शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# पार्किंगमध्ये लावलेल्या मोटारसायकलची चोरी; गुन्हा दाखल

नगर – पार्किंग मध्ये लावलेली मोटारसायकल (क्र. एम एच १६ डी आर ३०१५) तसेच डिकीतील मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना नागापूर एमआयडीसी मधील एल अँड टी कंपनीच्या पार्किंग मध्ये घडली. याप्रकरणी महेश नामदेव बेल्हेकर (वय २१, रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन एमआयडीसी पोलिसांनी चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना दिलासा

## रवींद्र बारस्कर यांचे प्रतिपादन; श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचा तिसरा वर्धापन दिन उत्साहाने साजरा



श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचा तिसरा वर्धापन दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

नगर – भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वर्षभर विविध आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून अनेक ज्येष्ठ नागरिकांना दिलासा मिळाला आहे. नेत्र तपासणी शिबिर, दंतरोग तपासणी शिबिर, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस, स्नेह मेळावा, सर्व रोग निदान शिबिर अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. ज्येष्ठ नागरिकांसाठी संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन माजी नगरसेवक रवींद्र बारस्कर यांनी केले आहे.

संघाच्या तिसरा वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पद संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे यांनी भूषविले. यावेळी प्रमुख उपस्थितीत रवींद्र बारस्कर, विलासराव ताठे, विजय महादर, हरिभाऊ टकले, विश्वनाथ जाधव, संभाजीराव काळे, मणिराम सावरकर, सचिव अप्पा बेद्रे, कोकाटे, सचिव गणपतराव हिंगे, चंद्रशेखर सत्रे, सुनंदा सत्रे, संघाचे संचालक सौ. रत्नमाला लांडे, चंपाताई जगताप, रमेश मुसळे, सुनील काळे, दत्तात्रय भगत, रघुनाथ कोतकर, दिनकर देशमुख आदी उपस्थित होते.

भीमाशंकर लांडे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षात ज्यष्ठ नागरिकांसाठी विविध आरोग्य शिबिरे, धार्मिक कार्यक्रम तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य, निरोगी, सुदृढ व कार्यक्षम राहावे यासाठी जेष्ठ नागरिक संघ प्रयत्नशील असतो.

शेवटी ८० वयाच्या पुढच्या चार जेष्ट मंडळीच्या हस्ते वर्धापन दिनाचा केक कापण्यात आला होता. या कार्यक्रमात सर्व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ नागरिकांना स्नेहभोजन देण्यात आले. सुत्रसंचलन विश्वनाथ जाधव यांनी केले. तर आभार गणपतराव हिंगे यांनी आभार मानले. या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

# जयवर्धनजी म.सा. यांचे ३० एप्रिलला तापीदास गल्ली येथे 'महामंगलिक'



नगर – मंगलजापसाठी प्रसिद्ध असलेले जयवर्धनजी (पियुष) म.सा. यांची अक्षयतृतीया निमित्त ३० एप्रिल रोजी दुपारी ११.३० वाजता महामंगलिक तापीदास गल्ली केवल अगरबत्ती महावीर कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जय जीन जाप भक्ती मंडळ संदिप लोढा यांनी केले.

# ड्राईंग आणि रंगभरण स्पर्धेत युवराज सूर्यवंशी प्रथम



नगर – प्रीतीज पाठशाला आणि कॅम्ब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्रीस्कूलच्यावतीने २७ एप्रिल रोजी ड्राईंग आणि रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. नगरमधील सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना सदर स्पर्धा खुली होती. उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा म्हणून दरवर्षी अशा स्पर्धा घेण्यात येतात.

'पाणी हेच जीवन' विषयाच्या स्पर्धेत युवराज प्रमोद सूर्यवंशी याने प्रथम क्रमांक मिळवला. रेसिडेन्शिअल हायस्कूलमध्ये इ. ५ वीत शिकत असून, त्याला आई उज्वला सूर्यवंशी, शिक्षिका गुगळे हायस्कूल यांचे विशेष मार्गदर्शन देत असतात.





श्री संत शिरोमणी गोरोबा काका समाधी सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. यावेळी रक्तदान शिबीर, महाप्रसाद, मंदिरात धार्मिक कार्यक्रम पार पडले.

# श्री संत शिरोमणी गोरोबा काका समाधी सोहळा उत्साहात

नगर – श्री संत गोरोबा काका समाधी सोहळा दरवर्षीप्रमाणे यावर्षी येथील संत गोरोबा काका समाधी सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी दरवर्षीप्रमाणे विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. तसेच रक्तदान शिबिर, महिलांसाठी विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या बक्षिस म्हणून ४३ इंच टीव्ही असे अनेक बक्षिसे देण्यात आले, तसेच समाजप्रबोधन भारुड राष्ट्रीय भारुडकार ह.भ.प. हमीद सय्यद महाराज यांचे भारुडचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता तसेच समाधी सोहळ्याचे दिवशी अभिषेक व महाआरती तसेच माजी आमदार अरुण काका जगताप यांच्या तब्येतीची सुधारणा व्हावी व त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना करण्यात आली व संध्याकाळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते व सर्व भाविकांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला.

यावेळी प्रमुख उपस्थिती औघडपीर तैमीनाथजी महाराज व मस्तनाथजी महाराज यांनी भेट दिली.

यावेळी सर्व मंडळाचेवतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मंडाळाचे अध्यक्ष जयकुमार सुसरे उपाध्यक्ष, राहुल देवतरसे सचिव, नितीन राजापुरे खजिनदार, अमित देवतरसे, अजिंक्य देवतरसे, विनायक सुसरे, रोहित देवतरसे, सागर राजापुरे, सार्थक राजापुरे, अक्षय राजापुरे, किरण कदम, आकाश देवतरसे, आदित्य सुसरे, पृथ्वी सुसरे, शामभाऊ सुसरे, अंकित देवतरसे, अतुल देवतरसे, दिपक राजापुरे, अमोल राजापुरे, राजू राजापूरे, अनिल राजापुरे, मयूरेश दळे, स्वप्निल दळे, युवराज देवतरसे, अथर्व मुरकुटे, निलेश दुसा, संदीप सुसरे शुभम घोडे, सुरव शहाणे, अनिल पाटील, प्रेम दळवी व सर्व महिलावर्ग उपस्थित होते.

**गाळा भाड्याने अथवा विकणे**
कोहिनूर प्लाझा पत्रकार चौक, सावेडी रोड येथे ३५० स्क्वे. फूट दोन दुकाने विकणे/भाड्याने देणे.
9225300400

**बंगलो विकणे**
सारसनगर मध्ये आंबेकर मळा येथे २०७० स्क्वे. फुट प्लॉट, ८०० स्क्वे. फुट बांधकाम बंगलो विकणे आहे
9422226615
7020164737

**1 RK फ्लॅट विकणे आहे**
तपोवनरोड नरहरी मल्टिस्टेट बँकेच्या आतमध्ये, गणेश चौक,अ.नगर
किंमत ८ लाख
9881112286
9822803014

**पाहिजेत**
सावेडी भागात टेलीकॉलिंग साठी महिला पाहिजेत तसेच गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर (वयस्कर व निर्व्यसनी) पाहिजे.
9545445050

**पाहिजेत**
मेडिकलमध्ये कामासाठी अनुभवी फार्मासिस्ट पाहिजे व साफ सफाईसाठी मुले पाहिजे
सावेडी अहिल्यानगर
9146151515

**पाहिजेत**
शर्ट मेकर व पँट मेकर रेडिमेड कारखान्यासाठी टेलर पाहिजे.
:- संपर्क :-
9028905790 / 9890414800

**सेल्सगर्ल पाहिजे जागा : ४**
सावेडी एरियामध्ये कापड दुकानातील शोरुमकरिता सेल्सगर्ल पाहिजे.
9518390392

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी मुलगा - 1
- संपर्क -
मोहित आगरबत्ती
आडते बाजार, अहमदनगर.
9423793008

**2 BHK फ्लॅट भाड्याने देणे**
दिल्लीगेट, बागरोजा हडको, दुसरा मजला २ बीएचके, २४ तास पाणी, पार्किंग सुविधा असलेला फ्लॅट भाड्याने देणे.
9960357019

**1000/2000 स्क्वे.फूट गाळा भाड्याने देणे आहे**
(ग्राऊंड फ्लोअर)
(प्रोफेसर चौक)
बिझनेस सेंटर, प्राईम लोकेशन
9923603959

**जमिन विकणे**
मौजे-इमामपूर, ता.नगर, जि. अहिल्यानगर येथील गट नं.३० व गट नं.२५ मधील ७५ गुंठे क्षेत्र विकणे
नगर-औरंगाबाद हायवे पासून १ कि.मी. अंतरावर, इमामपूर गाव, डांबरी रोडटच
9763044529

**१ वर्षाच्या बाळाला सांभाळण्यासाठी बाई/मुलगी पाहिजे**
सारसनगर येथे सावी हॉस्पिटलजवळ (वय १८ ते ४५)
वेळ : सकाळी ९ ते संध्या. ९
8888576576

**पाहिजेत**
टाटा झीप टेम्पोसाठी निर्व्यसनी अनुभवी ड्रायव्हर पाहिजे.
प्रसन्न फॅब्रिकेटर्स
एल-५२, एमआयडीसी, अहिल्यानगर (संपर्क वेळ : ९ ते ५)
9822499210
9657646555

**पाहिजेत**
✽ सुपरवायझर : १
✽ जोडपे : १
✽ सफाई कामगार : १
✽ मावशी : २
बोथरा अॅग्रो कोल्ड स्टोरेज
कल्याणरोड, निमगाव वाघा, अ.नगर
8975199111

**मुली पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - जागा १
पगार-८००० + इन्सेंटिव्ह
साईरचित सर्व्हिस सेंटर
पत्रकार चौक, सावेडी, अहिल्यानगर
9822606466

**हॉटेलसाठी पाहिजेत**
अनुभवी मॅनेजर - 02
वस्ताद - 02
वेटर - 04
मोरीवाला - 02
हेल्पर - 04
9822212124

**सेल्स मॅनेजर नियुक्त करणे आहेत**
(Male / Female) (अनुभव : २ ते ३ वर्ष)
काम : फ्रेंचाईजी नेटवर्क डेव्हलपमेंट आणि सुपरव्हिजन करणे.
सेल्स एक्झिक्युटिव्ह नियुक्ती आणि सुपरव्हिजन करणे.
उद्योजक मित्रचा विविध सेवासाठी कॉर्पोरेट आणि इंडस्ट्रियल क्लायंट हॅंडलिंग करणे.
संपर्क : उद्योजक मित्र बिजनेस सोल्युशन्स, अहिल्यानगर / 9119583040

**व्यवसाईक जागा भाड्याने देणे**
✓ कमर्शियल बिल्डींग
✓ कार्पेट एरिया-६००+९०० स्क्वे. फुट
✓ लीफ्ट
✓ अॅटॅच बाथरुम
✓ पार्किंग एरिया
✓ HDFC Bank शेजारी, पाईपलाईन रोडटच, सावेडी, अहिल्यानगर
तसेच पांढरीपूल एम.आय.डी.सी. मध्ये ५६०० स्क्वे.फुट. गोडाऊन भाड्याने देणे आहे.
7768895999 / 7768894999

**सुट्ट्या लागल्या**
भाच्यांना, बहिणीला कपडे घ्यायचेत...?


चला तर मग मयुरी मॉलला
१५-१६ वर्षापर्यंतच्या मुला-मुलींसाठी
- सर्वांसाठी सर्व प्रकारचे कपडे
- असंख्य नवनवीन व्हरायटीज्
- होलसेल पेक्षाही कमी दरात

अहमदनगर जिल्ह्यातील प्रथम भव्य लेडीज मॉल **मयुरी लेडीज मॉल**
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कूलजवळ, आगरकर मळा,अहिल्यानगर. 9028201188


रयत शिक्षण संस्थेचे
**श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल व जुनिअर आर्टस् कॉलेज, भिंगार.**
ता.नगर, जि. अहिल्यानगर.

# टेंडर नोटीस

दि. २८/०४/२०२५

आमच्या विद्यालयाचे खेळाचे मैदान सपाटीकरण करणे कामा करिता मुरुम भरती करून त्यावर रोलिंग करणे व लाल माती टाकणे या कामासाठी अनुभवी कॉट्रक्टर कडून टेंडर रेट बंद लिफाफ्यामध्ये श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल व जुनिअर आर्टस् कॉलेज, भिंगार. ता.नगर, जि. अहिल्यानगर यांचे कार्यालयात दि. ०८/०५/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल व जुनिअर आर्टस् कॉलेज, भिंगार. ता.नगर, जि. अहिल्यानगर यांच्या ऑफिस मध्ये जमा करण्यात यावेत. वरील काम पूर्ण करण्याचा कालावधी १ महिना राहील. सदरचे काम हे आर्किटेक्ट ओम साई कन्सल्टंट, १/२ गोवर्धन अपार्टमेंट आंबेडकर रोड मार्केट यार्ड चौक, अहिल्यानगर यांच्या देखरेखीखाली होईल. कोणतेही टेंडर रेट मंजूर करणे अथवा कारण न देता सर्व टेंडर रेट नाकारणे याबाबत सर्व अधिकार रयत शिक्षण संस्थेने राखून ठेवले आहेत.

**मुख्याध्यापक**
श्रीमती अॅबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल व जुनिअर आर्टस् कॉलेज, भिंगार,
ता. नगर, जि. अहिल्यानगर,
मोबाईल नंबर ८०८०११२९०४

॥ उत्कट भव्य तेचि घ्यावे ॥

**श्रीसमर्थ विद्या प्रसारक मंडळ**
भिस्तबाग रस्ता, सावेडी, अहिल्यानगर.

जा.क्र. : समक्ष / २०२५ - २०२६ दि. २६/०४/२०२५.

# पवित्र प्रणाली मार्फत शिक्षक भरती २०२२ (टप्पा-२)

संस्थेचे नाव :- (272615SC060) SHRI SAMARTH VIDYA PRASARAK MANDAL (PRIMARY) – WITH INTERVIEW

SHRI SAMARTH VIDYA PRASARAK MANDAL या व्यवस्थापनाच्या **प्राथमिक** शाळेमध्ये खाली नमूद केलेल्या पदांसाठी आवश्यक शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता धारण करीत असलेल्या व पवित्र प्रणालीमध्ये नोंदणी केलेल्या पात्र उमेद्वारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागवण्यात येत आहेत.

**आरक्षणनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| अ.नं. | प्रवर्ग | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त (उर्वरित) पदे | एकूण |
|---|---|---|---|
| १ | अनु. जाती | ०१ | ०१ |
| २ | खुला | ०१ | ०१ |
| एकूण | - | - | ०२ |

**शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता, विषय व पदनिहाय रिक्त पदांचा तपशील**

| माध्यम | पद | वेतनश्रेणी / मानधन | अनुदान प्रकार | विषय | शिकविण्याचे माध्यम | आवश्यक शैक्षणिक पात्रता | आवश्यक व्यावसायिक पात्रता | TET/CTET | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| MARATHI | UNDER GRADUATE TEACHER STD (1-4/5) | CONSOLIDATED PAY - UGT (16000) | AIDED | ALL SUBJE CTS | MARATHI | HSC (STD.12th) | DIPLOMA | TET PAPER 1/ CTET PAPER 1 | 02 |
| | | | | | | | TOTAL | | 02 |

**उमेदवारांना सूचना**

पात्र उमेदवारांनी https://tait2022.mahateacherrecruitment.org.in या संकेतस्थळावर शासनाच्या निर्देशानुसार ऑनलाईन पद्धतीने (संस्था कोड 272615SC060) पसंती क्रम नोंद करावी.

वरील शिक्षण सेवक पद भरती शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या निर्णयाच्या अधिन असेल.

स्थळ :- अहिल्यानगर.
दि. २९/०४/२०२५.

सेक्रेटरीज्
श्रीसमर्थ विद्या प्रसारक मंडळ,
भिस्तबाग रस्ता, अहिल्यानगर.

# जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **काफिल मुफिद अहेमद सय्यद, रा. शहाजीनगर, शाहिद कॉलनी, मुकुंदनगर, अ. नगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसाराची रक्कम देखील स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण,दान,बक्षिस,पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - जिल्हा तुकडी अहमदनगर पो. तु. ता. नगर पैकी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **मौजे भिंगार येथील शाहीद सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मुकुंदनगर, अहमदनगर मधील ब्लॉक मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.**

| स. नं. | प्लॉट नं. | चौ. मी. |
|---|---|---|
| ३४१/३ | १५ | २१६.०० |

सदर प्लॉट मध्ये मंजुर प्लॅन प्रमाणे लोडबेरींगमध्ये बांधकाम झालेल्या शाहीद सहकारी गृहनिर्माण संस्था या सोसायटी मधील रो-हौसिंग ब्लॉक नं. ६० याचे प्लॉटचे क्षेत्रफळ ४१.९६ चौ. मी. आहे यात एक हॉल, एक किचन रुम, संडाम बाथरुम असे बांधकाम झालेले असुन सदर बांधकामाचे क्षेत्रफळ २६.२० चौ.मी. असुन बाकी मागे पुढे खुली जागा असुन सदर संपुर्ण मिळकतीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस - रो.ब्लॉक नं.६१, दक्षिणेस - रो.ब्लॉक नं. ५०,
पश्चिमेस - रो. ब्लॉक नं. ५९, उत्तरेस - रस्ता,
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. २९/०४/२०२५
अहमदनगर.

**अॅड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**अॅड. फैजान फारुक कुरेशी**
जी.पी.ओ. रोड, जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७७०९७८६३१३

# जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेली जमीनीचे विद्यमान मालक **शहेजाद खालीद शेख रा. शाहशरीफ कॉलनी, मुकुंदनगर, अहमदनगर** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर जमीन विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरवून आमच्या अशिलाकडुन विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तसेच सदर जमीन मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर जमीन मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, इक्वीटेबल मॉर्गेज, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**मिळकतीचे वर्णन** - डि. अहिल्यानगर / अहमदनगर सब. डि. ता. अहिल्यानगर / अहमदनगर जिल्हा परिषद हद्दीतील मौजे **धनगरवाडी** येथील जमीनीचे वर्णन खालील प्रमाणे.

| स. नं. | हे. आर. चौ.मी. | रु.पै. |
|---|---|---|
| ७८/४/२ | २४१.३० | २.९२ |
| | ख. ० - ६५ | |
| | ३०६.३० | |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीची समाईकातील अविभक्त हिश्याची संपुर्ण ०हे. ०६ आर जमिनीबाबत.

**यांसी चतु:सिमा :**
पुर्वेस - नगर औरंगाबाद रोड
दक्षिणेस - गट नं. ७८/४/२ पैकी जाधव यांची जमीन
पश्चिमेस - श्री. चंद्रभान अग्रवाल यांची जमीन
उत्तरेस - गट नं. ७८/४/२ पैकी जमीन
येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. २९/०४/२०२५
अहमदनगर.

**अॅड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**अॅड. फैजान फारुक कुरेशी**
जी.पी.ओ. रोड, जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८


An ISO 9001:2015 Certified
**DiSHA COMPUTER INSTITUTE**
MAHA DISCOUNT offer
Any Course Just in 1800/-

MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, BD CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION

Delhi Gate Branch — 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch — 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch — Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

**फ्लेक्स प्रिंटींग**
संपर्क : 9403232323

भांड्यांवर पांढरे डाग पडत आहेत?

मग आजच घरी आणा अत्याधुनिक इलेक्ट्रोमॅग्नेटिक वॉटर कंडिशनर
जे बनवते जड व क्षारयुक्त पाण्याला शुद्ध!
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE


**अहमदनगर तालुका नागरी सहकारी पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या., अहमदनगर**
व्यापारी संकुल, पहिला मजला, गाळा नं. ४, महानगर बँक शेजारी, मार्केट यार्ड, अहमदनगर फोन नं. (०२४१) २३२८२७६

जा.क्र. २२/२०२५/फेडरेशन वसूली/स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा क्र.- १/मार्कंडेय/सन २०२५ दि. २८/०४/२०२५

# स्थावर मालमत्ता विक्रीचा जाहीरनामा क्र. - १

(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ (१) व (२) प्रमाणे तसेच (महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७(११)(ई) प्रमाणे).

ज्याअर्थी **श्री मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अ.नगर, ता.जि. अहमदनगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुद्ध महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६(१) व (२) तसेच **महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७/(११)(ई) प्रमाणे मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर** यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एन. पी. दळवी विशेष वसुली व विक्री अधिकारी** खालीलप्रमाणे जप्त केलेली स्थावर मालमत्ता थकीत कर्ज रक्कम वसुलीकरीता जाहीर लिलावाने विक्री करीत आहे. तरी स्थावर मालमत्ता लिलावात भाग घेवू इच्छिणाऱ्यांनी खालील नमुद ठिकाणी, तारखेस व वेळेस उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव | दाखला क्र. दिनांक | गांव | स्थावर मिळकत: वसुली दा. रक्कम | सि.स.नं. | क्षेत्रफळ मिळकतीचे वर्णन | आकार रुपये पै. | चतु:सिमा: पूर्व | पश्चिम | दक्षिण | उत्तर | लिलावाचे: ठिकाण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार- श्री. गाजुल रमेश गुरुपादम यांचेकरीता जामिनदार- श्री. गाजुल गुरुपादम बालय्या यांची मिळकत | २६५/२०२२ दि. ३/११/२०२२ | अ.नगर | ४५६९६२ + इतर खर्च + ५/२/२२ पासून १५% दराने व्याज येणे | - ७३९३ | - चौ.मी. ४१.३५ | - - | | मुळ नकाशाप्रमाणे | | | दिल्लीगेट, अ.नगर | ३०/५/२०२५ | दुपारी १:०० वाजता |

**लिलावातील अटी व शर्ती :-** १) कर्जदाराने कर्ज रक्कम पूर्ण भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल. २) लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाचे ठिकाणी वाचून दाखविण्यात येतील. ३) लिलावात कोणासही बोली लावता येईल. ४) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्यांनी रु. २५,०००/- अनामत म्हणून आदेश प्रसिद्ध झालेपासून ते लिलावाचे एक दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात भरावी लागेल त्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. ५) लिलाव मंजुर किंवा नामंजुर करण्याचा अधिकार सही करणार वसुली अधिकारी यांनी राखुन ठेवला आहे. ६) अन्य अटी व शर्ती लिलावाच्या वेळी वाचुन दाखवण्यात येईल. ७) लिलावाच्या सविस्तर अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात पहावयास मिळतील. ८) लिलाव स्थगित करणे, रद्द करणे, पुढे ढकलणे इ. अधिकार मे. विशेष वसुली अधिकारी यांनी राखुन ठेवलेले आहेत. ९) सदर मिळकतीवरील दाव्याविषयी अथवा इतर कोणत्याही तिऱ्हाईत इसमाने दावा केलेले हक्क, दावा अथवा हितसंबंध याबाबत कशाचाही खरेपणा बद्दल हमी दिलेले नाही.

स्थळ :- अहमदनगर
दिनांक :- २८/०४/२०२५

**(एन. पी. दळवी)**
विशेष वसुली व विक्री अधिकारी
(महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये)

# चष्मा नको?
आता चष्मा घालवा कायमचा

Contoura Vision

महाराष्ट्र दिनानिमित्त विशेष सवलत

कॉन्टूरा व्हिजन लेसर नेत्रशस्त्रक्रिया शिबीर

शिबीर शनिवार दि.३ मे २०२५ सकाळी ९ वा

स्थळ : वर्धमान, माणिक चौक, अहिल्यानगर

9112288611 | 8888982222

ASIAN EYE HOSPITAL AND LASER INSTITUTE

डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा — दृष्टी साजरी करा

www.asianeyehospital.com | www.saisuryasupervision.com

आंतरराष्ट्रीय कीर्तिचे भारतातील ४० वर्षे अनुभवी केंद्र

---

रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात

छाती (फुप्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ज्ञ

## डॉ. स्नेहा तिरपुडे
MBBS, MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine), Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)

- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 1 मे 2025 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत

जर आपणांस खालील व्याधी असल्यास
- फुप्फुसाचे सर्व आजार
- झोपे संबंधीचे सर्व विकार
- ॲलर्जी विकार
- दमा
- न्युमोनिया
- न थांबणारा खोकला

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी अहिल्यानगर भेट

स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर

अधिक माहितीसाठी संपर्क : राहुल घोतप : 98220 31800 (कॉर्डिनेटर) / 82083 78938

---

तुमच्या अक्षय्य सुखाच्या भावना..
साकार होवो याच आमच्या शुभकामना !

शुभ अक्षय तृतीया

- सृष्टी निर्माण
- परशुराम जयंती
- जैनीयांचे वर्षी तपसमापन
- या अक्षय्य दिनाच्या शुभकामना..

तसेच महाराष्ट्र दिना निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा !

त्वरीत भेट द्या.. सहकुटुंब आणि मैत्रिणींना घेऊन या..

## महावीर
किडस् ॲण्ड लेडीज वेअर

मुख्यशाखा : मोचीगल्ली, कापडबाजार, अ.नगर
द्वितीय शाखा – डी-मार्ट जवळ, पाईपलाईन रोड, अ.नगर

COSMETICS I CRAFT I KIDS I JEWELLERY I WOOLEN I FASHIONS

महावीर उद्योग समूहाची – महिलांच्या जिव्हाळ्याची व पसंतीची विविध दालने...

---

शुभ अक्षय तृतीया

आमचे सर्व ग्राहकांना व नगरकरांना अक्षयतृतीयेच्या शुभेच्छा..!

## पित्रोडा सेल्स
शॉप नं.९, रोनक गुलमोहर अपार्टमेंट, गुलमोहोर रोड, सावेडी, अ.नगर. मो : 98237 04000

लॅमिनेट | विनीयर | बीटीसी पट्टी | मोल्डिंग पट्टी

---

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात

दिनांक : 25 एप्रिल ते 2 मे 2025

| | |
|---|---|
| KESARI CHAPTER 2 | 10:15 AM I 03:00 PM<br>07:30 PM I 10:00 PM |
| JAAT | 08:30 AM I 04:30 PM |
| UNTIL DAWN | 12:45 PM I 05:30 PM |
| PHULE | 11:30 AM I 07:20 PM |
| ZAPUK ZUPUK (Marathi) | 12:30 PM I 06:15 PM |
| ANDAZ APNA APNA | 09:30 AM I 03:15 PM<br>07:00 PM |
| DEVMANUS | 02:00 PM I 09:00 PM |

- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking

Ahilyanagar First & Most Luxurious Cinematic Paradise !

AVAILABLE ON bookmyshow | CONNPLEX SMART THEATRE | AVAILABLE ON bookmyshow

3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

---

## द्वितीय पुण्यस्मरण





असा जन्म लाभावा
देहाचा चंदन व्हावा ।
गंध संपला तरी
सुगंध दरवळत रहावा ॥

श्रीमती लिलाबाई भिकचंद बोरा
स्व.दि.२९ एप्रिल २०२३

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

: दुःखांकित :

डॉ.प्रदीप बी.बोरा । रविंद्र बोरा । सौ.मंगल बोरा

डॉ.जिनेश बोरा । डॉ.सौ.सोनाली बोरा
राहुलजी गुंदेचा । डॉ.सौ.शितल गुंदेचा
श्रीमती सुषमा रतनकुमारजी बोरा
श्रीमती सुनिता अशोक गांधी
समस्त डॉ.भि.मु.बोरा परिवार
नवीपेठ, अहिल्यानगर

राहुलजी बोरा । सौ.पुनम बोरा
रमेशलालजी बोरा । सौ.शांता बोरा
श्रीमती उषा लक्ष्मीकांत नगरकर
स्व. सुमन शांतीलाल भंडारी परिवार, मुंबई
माणकचंदजी चुनीलालजी मुनोत परिवार
पनवेल

---

Ahilyanagar's 1st Dolby 7.1 & Dolby Atmos Theater

SHOW TIMING - 25 APRIL - 30 APRIL 2025

| | |
|---|---|
| केसरी 2 | 09.00AM I 11.45AM<br>05.00PM I 05.45PM<br>07.45 PM I 10.45PM |
| झापुक झुपूक | 12.15PM<br>03.00PM<br>05.30PM |
| जाट | 09.15AM<br>02.15PM<br>10.30PM |
| अंदाज अपना अपना | 02.40PM<br>08.15PM |
| देवमाणूस | 12.15PM<br>08.15PM |
| छावा | 09.30AM<br>11.00PM |

टीप: शो च्या वेळा बदलू शकतात

Book Your Tickets at Box Office | Book Your Tickets Now bookmyshow

नगर कॉलेज जवळ, जुडिओच्या वरती, अ.नगर
9881300400, 0241-2346000

Cinélife MINIPLEX

---

## अक्षय तृतीया
आपणास धन, धान्य, सुख-संपदा मिळो, रोगराईचा क्षय होऊन, अक्षय आयुरारोग्य तुम्हाला लाभो

खास अक्षय तृतीयाच्या दिवशी आंब्याचा आस्वाद घेण्यासाठी
पप्पु पमनदास आहुजा मध्ये आवश्य भेट द्या..

MANGO KING Pappu Ahuja

रत्नागिरी | देवगड हापूस | म्हैसूर
लालबाग | केशर | रत्नागिरी पायरी

सर्व प्रकारचे आंबे मिळण्याची प्रशस्त आढी..
आवश्य भेट देऊन खात्री करा (फळ आढी)

आधुनिक कुरिअर समोर, नवीपेठ, अहिल्यानगर
मो. 9552633955 / 9028248987 / 9890057353

---

## G.D. Chaukate and Accounting services
All types of Account writing work services available.

: Contact :
Goraksh Chaukate
9975960185

---

DCM SHRIRAM Growing with trust

Fenesta Better by Design

## भारताची नंबर 1 खिडक्यांचा आणि दरवाजांचा ब्रँड

uPVC | Aluminium | Doors | Façades

आता अहिल्यानगर (अहमदनगर) मध्ये आहे.

## CHANDAN GLASS
Shop No. 5, Venkatesh Prime, Near Anand Dham, Ahilya Nagar.
**Call:** 9860119223 / 9823189592

---

अक्षय राहो धनसंपदा, अक्षय राहो शांती...
अक्षय राहो आपल्यातील सुंदर निर्मळ नाती...





साडेतीन मुहूर्तापैकी एक मुहूर्त अक्षयतृतीया
या दिनी सुवर्णखरेदी अक्षय लाभ देते.

॥अक्षय्य तृतीया॥

विश्वास, परंपरा आणि गुणवत्तेचं प्रतीक

स्थापना 1937 ज्वेलर्स, अहिल्यानगर

S.G.K. एस.जी.कायगांवकर JEWELLERS

Platinum | Gold | Silver | Diamond | Moti

T&C Apply*

सराफ बाजार 2341333, 9890032323 | सावेडी 2341335, 9511902345